# माणूस

साप्ताहिक

चाळीस पैसे : २५-२-६७

माती जागवील त्याला मत





## मनीषा

'माझ्या मृत्यूनंतर माझ्या दहनस्थळी जर माझ्या नावाची शिला लावणार असाल, तर त्या शिलेवर 'स्वातंत्र्यवीर सावरकर' ह्यापेक्षा 'हिंदुसंघटक सावरकर' असा लेख कोरला गेल्यास तो मला अधिक आवडेल. कारण स्वातंत्र्यार्थ मी जे जे प्रयत्न केले, ते ते हिंदुसंघटनेसाठी होते, समर्थ-संपन्न हिंदुराष्ट्रासाठीच होते, अखंड हिंदुस्थानसाठीच होते.'

## मृत्युंजयांस

कैकदा येऊन गेलो जिंकण्या वीरा तुला
जिंकिले ना मी परंतु जिंकिले तूही मला
धुंद होतो मी सदाही शक्तिशाली मानुनी
नाहि धजलो मी परंतु पाश माझे टाकण्या
देशभक्ती, देशसेवा हीच निष्ठा अंतरी
सोशिल्या तू यातना ह्या देशकार्या लागुनी
गौरवीले ना कुणीही मुक्त होता मातृभू
परि उपेक्षा सोसुनीही मानिली ना खंत तू
शक्तिशाली राष्ट्र व्हावे रक्षिण्या ही पुण्य-भू
मान्य आता याच देशी शस्त्रशक्तीची पुजा
विजय वार्ता ऐकिल्या तू याचि देही, याचि कानी
विजयि झाले तत्त्व तव हे, जरि उपेक्षा जीवनी
धन्य झाला जन्म तूझा धन्य आहे मृत्युही
हार माझी मानितो मी तूच येता मत्प्रती

—सौ. विमल आपटे, करंझाळे—पणजी.

[ सावरकर प्रथम पुण्यतिथीनिमित्त... ]




## एक समग्र साप्ताहिक


वर्ष : सहावे
अंक : चौतिसावा
किंमत : चाळीस पैसे
वार्षिक वर्गणी : वीस रुपये

**संपादक**
श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**
अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**व्यवस्था विभाग**
अ. वा. गंधे
अ. वि. गणपत्ये

पत्ता – ४९१ नारायण, पुणे २.
दूरध्वनी – ५७३५१


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# प्रिय वाचक

हें काय 'माणूस'चं वरातीमागून घोडं ! निवडणुका तर संपल्या. मग पुन्हा माती काय, मतं काय ! काहीतरी घोटाळा दिसतोय.

काऽऽही नाही. ही पुढच्या निवडणुकीची तयारी आहे, असे समजू फार तर. या निवडणुका तर आटोपल्या. पक्षोपपक्षांच्या बलाबलात काही फरक पडतीलच. पण देशासमोरील मूलभूत आर्थिक-राजकीय कोंडीतून वाट निघणार आहे काय ? लक्षण तसे दिसत नाही. ही कोंडी फुटावी यासाठी काही वेगळयाच आरंभबिंदूपासून राजकीय पक्षांनीं, विचारवंत सुशिक्षितांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी उचल घेतली पाहिजे. श्री. बाबासाहेब आमटे यांनी या दृष्टीने बहुमोल मार्गदर्शन आपल्या नव्या पुस्तकात केले आहे. या मार्गाचा जारीने तलास व्हावा, यासाठी मुखपृष्ठाची ही ही योजना !

मुखपृष्ठावरील छायाचित्र मात्र सुपे मुक्कामाचे आहे– 'माणूस प्रतिष्ठान'च्या विहिरीवर श्रमसप्ताहात काम करीत असलेले काही विद्यार्थी. (वरून–) दिलीप कुलकर्णी, चंद्रकांत कुलकर्णी, सुभाष चौथाई, प्रशांत गायकवाड, मानवेंद्र वर्तक आणि अरुण फडके. या श्रमसप्ताहाची अधिक ओळख या अंकात प्रा. आनंद यादव यांनी करून दिलेली आहेच.

–संपादक

# त्या ख ळ ब ळ ज न क

चौथी सार्वत्रिक निवडणूक पार पडली. गेल्या वर्षभरात हिंसाचाराने एवढे थैमान घातले होते, की निवडणूक होते किंवा नाही यासंबंधी राजकीय विचारवंतांत चिंता व्यक्त केली जात होती. परंतु ठरलेल्या कार्यक्रमानुसार निवडणुका होतीलच, असे इंदिरा गांधी यांनी जाहीर केल्यानंतर यासंबंधीचे तर्ककुतर्क थांबले व निवडणुकीत अधिकाधिक यश मिळविण्याच्या दृष्टीने पक्षोपपक्ष तयारीला लागले. भुवनेश्वरच्या प्रचारसभेत इंदिरा गांधी यांच्यावर दगडफेक झाल्यामुळे विरोधी पक्षांच्या प्रचाराला गालबोट लागले तर मोंघीरजवळ मधू लिमये यांच्यावर भाल्यांनी आणि काठ्यांनी हल्ला चढवून विरोधी पक्षांप्रमाणे आपणही या तंत्रांत मागे नाही हे काँग्रेसवाल्यांनी दाखवून दिले. या दोन्ही घटनांचा सर्व राजकीय नेत्यांनी गंभीरपणाने विचार करावयास हवा; परंतु निवडणुकीच्या या धामधुमीत आठ-दहा ओळींचे पत्रक काढले की आपले काम संपले अशीच प्रत्येक नेत्याची भावना झालेली दिसते. पेकिंगमध्ये गेल्या २६ जानेवारीला लालरक्षकांचा जो मेळावा भरला होता त्यात राष्ट्राध्यक्ष लिऊ-शाओ-चि यांच्या पत्नीची व्यासपीठावर कुचेष्टा करण्यात आली. हा प्रकार जितका अधम वृत्तीचा आहे तितकीच अधम वृत्ती इंदिरा गांधींच्या रोखाने दगड फेकून किंवा मधू लिमयांसारख्या विरोधी पक्षाच्या तडफदार कार्यकर्त्यावर भाले चालवून आपल्यातील काही जणांनी प्रकट केली आहे. चीनमध्ये सध्या जे काही घडत आहे त्यावरून धडा घ्या, असे जे इंदिरा गांधी गेले काही दिवस वारंवार सांगत आहेत, त्यामागे नेमकी हीच व्यथा आहे.

## पूर्वपुण्याई संपली

आपल्या देशाचा विस्तार पाहता निवडणुकीसाठी किती अवाढव्य यंत्रणा लागते हे दिसून येते. भारताची सध्याची लोकसंख्या पन्नास कोटींच्या घरात गेली असून त्यांपैकी २५ कोटी नागरिक मतदार आहेत. त्यात तेरा कोटी पुरुष व बारा कोटी स्त्रिया आहेत. एवढा प्रचंड समाज आणि तोही शिक्षणाच्या दृष्टीने बव्हंशी मागासलेला. ग्रामीण भागात दळणवळणाची साधने अपुरी. अशा परिस्थितीत ही निवडणूक घेणे सरकारला व ती लढविणे राजकीय पक्षांना किती खर्चाचे जात असेल, याची कल्पना येते. पं. नेहरूंच्या निधनानंतरची पहिली सार्वत्रिक निवडणूक म्हणून तिचे महत्त्व विशेष. पंडितजींना समाजवादाचा दांडगा अभिमान. त्यामुळे ते हयात असताना समाजवादविरोधी शक्ती कार्यरत असल्या तरी त्यांना यशाची फारशी आशा

# विधानाच्या निमित्ताने

नसे. या निवडणुकीत संस्थानिक व उद्योगपती एवढ्या मोठ्या संख्येने उतरले आहेत की सरकारच्या समाजवादी वाटचालीला उघडउघड आव्हान देण्याइतके सामर्थ्य आणि धैर्य त्यांना प्राप्त झाले आहे. या निवडणुकीत भाग घेणाऱ्या पंचवीस कोटी मतदारांपैकी सोळा कोटी मतदार २१ ते ४० वयोमर्यादेतील आहेत. या सोळा कोटींपैकी एक कोटी मतदार तर २१ ते २५ या वयोगटातील आहेत. १९४२ चा शेवटचा स्वातंत्र्यलढा झाल्यास या वर्षी पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत. याचा अर्थ असा की, या एक कोटी मतदारांना स्वातंत्र्यपूर्व काळातील काँग्रेसच्या कार्याची प्रत्यक्ष अशी काहीही माहिती नाही. आतापर्यंत काँग्रेस नेते आपल्या स्वातंत्र्यलढ्यांच्या पुण्याईवर मतदारांपुढे जात असत. यापुढील निवडणुकांत ती पुण्याई फारशी उपयोगी पडणार नाही हे या तरुण मतदारांची संख्या जसजशी वाढत जाईल तसतसे आढळून येईल.

या निवडणुकीत कोणत्या पक्षाला किती जागा मिळतील हे आज सांगणे कठीण असले तरी काँग्रेसमधील उजव्या गटास आणि काँग्रेसबाहेरील उजव्या पक्षांना, डाव्या गटाच्या आणि डाव्या पक्षांच्या तुलनेने अधिक यश मिळेल असे सर्वसाधारण वातावरण दिसते. याचे एक कारण असे की, डाव्या पक्षांची शक्ती एकसंध राहिलेली नाही. फुटीरतेचा शाप जास्त कोणाला भोवला असेल तर तो डाव्या पक्षांनाच. काँग्रेसमधला डावा गट निष्प्रभ झाला याचे कारण म्हणजे डोळेझाक करून केवळ सैद्धांतिक दृष्टिकोनातून समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला की अपयश कसे येते हे गेल्या पंधरा वर्षांतील नियोजनाने दाखवून दिले आहे. नेहरूंच्या राजवटीत समाजवादाच्या घोषणेला चलती होती. परंतु केवळ घोषणांनी प्रश्न सुटत नाहीत हे अवमूल्यनाने दाखवून दिले आहे.

### शेवटच्या निवडणुकीचे भाकीत

भारतातील सध्याच्या परिस्थितीचा आढावा घेताना लंडनच्या 'टाईम्स' पत्राच्या दिल्लीतील प्रतिनिधीने ही शेवटचीच निवडणूक ठरणार आहे असे भाकित वर्तविल्यामुळे बरेचजण त्याच्यावर रुष्ट झाले आहेत. नेव्हिल मॅक्स्वेलचे हे भाकित खरे ठरावे असे कोणीच इच्छिणार नाही. त्यांचे दोन्ही लेखांक वाचून त्यांचीही तशी इच्छा आहे असे मला वाटले नाही. आजच्या राजकीय परिस्थितीचे मूल्यमापन केल्यानंतर एखादा परदेशी निरीक्षक कोणत्या निष्कर्षाप्रत येतो एवढाच

दृष्टीने त्याच्या विवेचनाकडे बघावयास हवे. मॅक्स्वेल यांचे मुख्य मत केंद्रसत्ता दुबळी होत आहे. त्यांच्या मताने १९६० पासूनच केंद्रसत्तेच्या सर्वंकष नेतृत्वाला ओहोटी लागू लागली. नेहरू राजवटीच्या शेवटच्या चार वर्षांत केंद्र सरकारच्या दुर्बलतेचे प्रत्यक्ष प्रदर्शन होत नव्हते, तरीही ती हादरे खात आहे एवढे स्पष्ट जाणवत होते. नेहरूंच्या निधनानंतर शास्त्री यांची राजवट सुरू झाली व भाषिक दंगलीच्या वेळी केंद्र सरकारचे दुबळेपण स्पष्टपणे दिसून आले. १९५६ च्या सप्टेंबर-मध्ये शास्त्रींनी पाकिस्तानशी युद्ध झुंजण्याचा निर्णय करून आपली नवी प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न केला व तो यशस्वीही झाला. परंतु त्यानंतर अल्पकाळांतच त्यांचे निधन झाल्यामुळे पुन्हा नव्या प्रधानमंत्र्याची निवड करण्याची पाळी आली. त्या वेळी राज्याच्या मुख्यमंत्र्यांनाच पुढाकार घेऊन इंदिरा गांधी यांच्या विजयाचा मार्ग मोकळा करून घ्यावा लागला. केंद्रीय नेतृत्वाचा भाषावार राज्यरचनेला विरोध होता आणि तरीही लोकमताच्या रेट्यामुळे १९५६ मध्ये भाषावार राज्य-रचना करावी लागली. तेव्हापासून केंद्रसत्तेच्या घसरगुंडीला प्रारंभ झाला असे मॅक्स्वेल यांचे विवेचन आहे. भाषावार राज्यरचना झाल्यानंतर निरनिराळ्या राज्यांतून केंद्रीय मंत्रिमंडळात प्रविष्ट झालेले नेते संपूर्ण भारताच्या प्रश्नांचा विचार करण्याऐवजी आपल्या राज्यात अधिकाधिक सुविधा कशा प्राप्त होतील याच विवंचनेत गर्क झाल्याचे दिसून येते. काही राज्यांत अन्नटंचाई निर्माण झाली असताना शिलकी राज्यांनी आपले राष्ट्रीय कर्तव्य बजावले नाही व त्यांच्या या बंड-खोरीला केंद्रीय नेतृत्व आवर घालू शकले नाही याचे कारण केंद्रीय मंत्रीही आपा-पल्या राज्यांच्या दृष्टिकोनातून या प्रश्नाचा विचार करीत होते हे आहे.

## व्यक्तिगत प्रेरणा

एवढे सारे असूनही भारतात लोकशाहीची वाटचाल चालू आहे याचे मॅक्स्वेल यांनी दिलेले कारण असे आहे की सर्वत्र काँग्रेस या एकाच पक्षाची राजवट चालू आहे. परंतु आता काँग्रेसच अंतर्गत मतभेदांनी इतकी पोखरली गेली आहे की एक-संघ पक्ष म्हणून ती सर्व राज्यांत प्रभावीपणे कार्य करू शकेल अशी परिस्थिती उर-लेली नाही. काही राज्यांत काँग्रेसेतर पक्षांची राजवट आली तर दिल्लीच्या केंद्र-सत्तेला नवे आव्हान मिळेल व या आव्हानाच्या खडकावरच भारतीय लोकशाहीचा चेंदामेंदा होईल, असे मॅक्स्वेल यांना वाटते. त्यांच्या मताने राजकीय पक्ष हा मुळी भारतीय लोकशाहीचा आधारच नाही. गट हा सध्याच्या लोकशाहीचा मूलाधार असून काही जवळिकीने एकत्र आलेले गट म्हणजे पक्ष असे राजकीय पक्षांचे स्वरूप आहे. त्यामुळे वैचारिक संघर्षापेक्षा व्यक्तिमत्त्वांचा संघर्ष हे भारतीय राजकारणाचे वैशिष्ट्य आहे. सर्वसामान्य नागरिक मतदान करताना उमेदवाराच्या वैचारिक भूमिकेचा विचार करण्याऐवजी नात्यागोत्याचा व जातपातीचाच अधिक विचार करतो. या सर्व मनोरचनेमुळे लोकांची, लोकांसाठी लोकांनी चालवलेली अशी

लोकशाही येथे दिसत नसून राजकारणी लोकांची राजकारणी लोकांसाठी राजकारणी लोकांनी चालविलेली राजवट असे येथल्या सत्तायंत्रणेचे स्वरूप आहे असा निष्कर्ष मॅक्स्वेल यांनी काढला आहे. एखादा राजकीय विचार घेऊन राजकारणात ठामपणे उभे राहावयाचे व त्या विचाराला कृतिरूप देण्यासाठी निवडणूक लढवावयाची असे दृश्य दिसत नसून मंत्रिपदाची वा अन्य अधिकारपदाची खुर्ची मिळवावयाची ती वैयक्तिक महत्त्वाकांक्षेच्या पूर्ततेसाठी आणि या महत्त्वाकांक्षेला झळ लागू नये म्हणून आपल्या गटातील लोकांना मेहेरबानीची खिरापत वाटावयाची असे भारतातल्या सर्वसाधारण राजकीय कार्यकर्त्यांचे जे चित्रण मॅक्स्वेल यांनी केले आहे ते भारत-विरोधाच्या आंधळ्या लेखणीने रेखाटले आहे असे म्हणता येईल काय ?

## सोयीस्कर विपर्यास

सर्वसाधारणत: एखाद्या परदेशी व विशेषत: ब्रिटिश किंवा अमेरिकन वृत्तपत्र-प्रतिनिधीने आपल्या विवेचनात भारतावर काही ठपका ठेवला की त्यातील आशय ध्यानात घेण्याऐवजी त्याला भारत-विरोधी ठरवून त्याचे विवेचन निकालात काढण्याची पद्धत आपल्या येथे रूढ आहे. लंडन टाईम्स किंवा न्यूयॉर्क टाईम्स ही वृत्तपत्रे आपल्या देशातील सत्ताधाऱ्यांविरुद्ध कडक शब्दांत लिहिण्यास कचरत नाहीत. व्हिएटनामबाबतच्या सध्याच्या धोरणाबद्दल जॉन्सन यांच्यावर प्रहार करणाऱ्या अमेरिकन पत्रकाराच्या निर्भयतेची तारीफ करावयाची आणि त्यांनी भारतासंबंधी काही प्रतिकूल विधान केले की साम्राज्यवादी म्हणून त्यांची हेटाळणी करावयाची हे सूत्र सोयीचे असले तरी हितकर खचित नाही. जॉन ग्रिग नावाचे दुसरे एक ब्रिटिश पत्रकार नुकतेच भारतात येऊन गेले. 'गार्डियन'च्या शेवटच्या पानावर दररोज ते एक स्तंभ लिहीत असतात. भारतातील लोकशाही दृढमूल पायावर उभी असल्याचे आपल्याला आढळून आल्याचे त्यांनी आपल्या दौऱ्याच्या अखेरीस जे भाषण केले त्यात सांगितले. याचा अर्थ एवढाच की प्रत्येक निरीक्षक—मग तो देशी असो वा परदेशी असो—आपापल्या दृष्टिकोनातून घटनांचे विश्लेषण करीत असतो. मॅक्स्वेल यांनी केलेले विधान या देशातील राजकीय विचारवंतांपैकीही काहींनी केले आहे. भारताचा फ्रान्स होण्याची भीती आहे, असे ना. ग. गोरे यांनी नुकतेच सांगितले आहे.

देशी आणि परदेशी निरीक्षकांमध्ये एकच फरक असतो आणि तो हा की परदेशी निरीक्षकांनी कितीही सखोल अभ्यास करून विवेचन केले तरी त्यांना या देशाचे मन समजलेले नसते. तर्कशास्त्राच्या फूटपट्ट्या वापरून राजकीय घटनांचे विवेचन करता येत असले तरी लोकमानसाचे मूल्यमापन करावयास या फूटपट्ट्या अपुऱ्या पडतात. परंतु भारतात येणाऱ्या परदेशी निरीक्षकांपुरतीच ही अडचण मर्यादित आहे असे नाही. जेव्हा एखादा भारतीय पत्रकार ब्रिटनमध्ये जातो तेव्हा त्यास तेथील समाजवादी पुढाऱ्यांच्या मनातील राजघराण्याबद्दलच्या आदराचा उलगडा होत नाही यातील मर्महीं हेच असावे असे वाटते.

**— सदाशिव पेठकर**

# मुक्ताफळे



## □ बाई–विश्वकोश !

निवडणूक ही पाच वर्षांनी येणारी गंगा असली तरी त्या निमित्ताने आमच्या थोर लाडक्या पुढाऱ्यांच्या जिभेवर सरस्वतीचा हंगामी तळ पडतो तो महत्त्वाचा होय! हा मुक्काम आता सरूबाई हलवणार या विचाराने आम्ही तूर्त व्याकुळ आहोत. या वेळी पंडितजी नसल्याने सरस्वतीचा संपूर्ण विलास दाखविण्याचे महत्त्वाचे काम प्रांतिक व जिल्हानिहाय पातळीवर पडून या नेतृत्वाला फारच ताण पडला ! परंतु यापुढे ' नेहरूंनंतर कोण ' ही काळजी संपली असून ' यांच्यानंतर ' कोण अशी विवंचना आता उत्पन्न झाली आहे. साईबाबाच्या संनिधी वसलेल्या कोपरगावी ' वाई विश्वकोश ' मंडळाचे अध्वर्यू तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अस्मितेचा मतदारांना साक्षात्कार झाला. त्यांनी एकदम ' टाईट ' भाषण केले. ते म्हणाले–

" काँग्रेस ही वयात आलेली टंच पोरगी व समिती ही काटर्यांची आहे. लहान पोरटयांकडून काँग्रेसच्या टंच पोरीचे समाधान कसे होईल ?"– **नवशक्ती,** ९।२।६७

हे वाचल्यानंतर तर्कतीर्थ हे ' वाई विश्वकोश ' मंडळाचे अध्यक्ष आहेत की ' बाई विश्वकोश ' मंडळाचे अध्यक्ष आहेत, अशा संभ्रमात आम्ही पडलो. हे विश्वदर्शन घडताच श्रोत्यांची काय अवस्था झाली याचे वृत्त देताना दैनिकाचा वार्ताहर लिहितो–

" असा दाखला तर्कतीर्थांनी देताच हजारो श्रोते हसले...! "

नुसते हसले यावर आमचा विश्वास नाही. यांतील अनेकांनी टंच स्त्री-श्रोतृवृंदाला डोळे मारून आपला आनंद व्यक्त केला असला पाहिजे. इतकेच नव्हेतर या विनोदाने काही श्रोते इतके गडबडा लोळले असतील की, दारूबंदी आहे की नाही, असा प्रश्न पडला असला पाहिजे. याच भाषणात तर्कतीर्थांनी आचार्य अत्रे यांची हजेरी घेतली. येऊन जाऊन अत्र्यांच्या सभांचे वर्म काय तर अत्र्यांचे विनोदच ना ! तर्कतीर्थांनी टंच विनोद करून वयात आलेल्या काँग्रेसजनांना ज समाधान दिले, ते केवळ अपूर्व होय.

काँग्रेस...! छे: एक टंच पोरगी! स्लिव्हलेस घातलेली, डोक्यावर अजंठा, डोळे मोडीत मोडीत ब्लाऊजमधून सांडणारे आपले तारुण्य सावरीत ठुमकत चालणारी एक छेलछबेली – आणि तिच्यामागे धावणारा शुभ्र खादीधारी, सदा स्त्रियाळलेला काँग्रेसचा पहिलवान! खूप अंतरावर मिसरूड न फुटलेली चार कारटी आपल्या ताकदीचा व वयाचा अंदाज न घेता चड्डीच्या खिशात हात घालून आशाळभूत नजरेने या छबेलीकडे पाहत आहेत. ती मात्र वळून वळून पाहते आहे आपल्या पहेलवानी प्रियकराकडे!

काँग्रेसचे नवे स्वरूप समजून घ्यायचे असेल तर हे नवे चित्र नीट समजून घेतले पाहिजे. टाईम्सच्या त्या लक्ष्मणाच्या तोंडात मारील असे हे या लक्ष्मणाने काढलेले चित्र पाहा! लक्ष्मणशास्त्रींनी या चित्राच्या रेषा नि रेषा स्पष्ट करून त्यातला टंचपणा श्रोत्यांना सांगताच श्रोते खूष झाले यात नवल ते काय? शास्त्रीबोवांनी निवडणुकीच्या निमित्ताने दिलेला हा ‘जर्क’ महत्त्वाचा आहे. जर्कतीर्थ जोशांनी आपल्या बाई-विश्वकोशाचे काम असेच पुढे न्यावे!

## □ कॅस्ट्रोला इशारा!

इंदिरासरकारने १९७१ अखेर अमेरिकन गव्हाची आयात बंद करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. आमच्या मनात हे फार दिवसांपासून आहे की अमेरिकेचा पोसिजीन आपल्याला गहू देतो– तो इथे बोटीने आणायचा, वाटायचा, साठा करायचा, रेशनकार्डे छापायची, काय हा उपद्व्याप! त्यापेक्षा तिकडून पोळ्या करून आणल्या किंवा ब्रेडच आणला तर ते अधिक सोईचे होईल. हे शक्य नसेल तर १० टक्के तूट आहे ती भरून काढण्यासाठी एक एक कोटी माधुकरे–अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, ॲबिसिनिया, रशिया–या पाच देशांत पाठवून द्यावेत. यांचे काम फक्त तिकडे राहणे व खाणे! म्हणूनच १९७१ अखेर गहू बंद होणार या वार्तेने आम्हांला फार आनंद झाला; निदान आता गहू आणण्याचे तरी बहुधा पुन: ठरणार नाही. १९७१ अखेर अन्नाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याचा निर्णयही इंदिरासरकारने व्यक्त केला आहे. परंतु १९५१ साली पंडित नेहरूंनीदेखील पाच वर्षांत अन्नाच्या बाबतीत आपण स्वयंपूर्ण होणार असे सांगितले होते. ५६ साली तर चीनची स्वारी झालेली नव्हती– पण नाहीच जमले! तेव्हा स्वयंपूर्ण वगैरे जमेलसे वाटत नाही. गहू येणार नाही– पोळ्या येतील किंवा बरेच माधुकरी तिकडे जातील, अशी काही योजना निघेल असा आमचा विश्वास आहे.

वस्तुत: अमेरिकेने या गव्हाच्या मदतीबाबत आपल्याला काहीच अटी घातलेल्या नाहीत. वर्षाकाठी ५५ कोटी रुपयांचा गहू आपल्याला अमेरिका देते म्हणजे माणशी दीड रुपया अमेरिका आपल्यावर खर्च करते.....असे असून ते आपल्याला कामे सांगतात का? काही नाही– इंदिराजींनी सांगितलेच की– “क्यूबाशी आमचा पूर्वीपासून व्यापार आहे तो फक्त तागाचा.”

आता क्यूबाच्या कॅस्ट्रोशी अमेरिकेचे वाकडे असले तरी त्याला ताग द्यायला अमेरिकेची मुळीच हरकत नाही ! कारण ताग लागतो तो पोत्यांसाठी. भारताला पोती करायची काय ? पोती लागायची अन्नधान्य भरपूर असलेल्या देशांत. इथे काय बाहेरून आला गहू की संपला– पुढचा कधी येतो याची धावपळ ! तेव्हा उगाच तागाच्या राशी पडून राहण्यापेक्षा द्या क्यूबाला ! उत्तर व्हिएटनामशी आपला व्यापार बंदच आहे– कारण तिथून माल चीनकडे जाईल ही रास्त धास्ती !

इंदिराजींचा हा खुलासा इतका बिनतोड होता की जॉन्सनसाहेब चाट पडला. अगदी त्या गोष्टीतल्या राजासारखा !

एका राजाकडे एक भिकारी नियमित जाई व भरपूर भिक्षा घेऊन येई. राजाच्या कानी आले की भिकारी गावात आपली निंदा करतो व होणारी टवाळी ऐकत बसतो. त्याने एक दिवशी भिकाऱ्याला जाब विचारला–

"No Nonsense"

भिकाऱ्याने लेखी सांगितले,

" महाराज, मी मुका व बहिरा असताना आपल्या मनात असे किल्मिष का बरे आले ?"

राजा खजिल झाला ! प्रधानाला तो म्हणाला,

" हा इसम घडधाकट असून भीक मागतो त्याअर्थी हा मुका व बहिरा असावा हे कसे माझ्या ध्यानात आले नाही कुणास ठाऊक ? याची भिक्षा वाढवा–!"

सांगायची गोष्ट जॉन्सनसाहेब खजिल झालेला असतानाही १९७१ अखेर– म्हणजे १९७२ पर्यंत– अमेरिकेकडून गहू न आणण्याचा जो धाष्टर्यपूर्वक निर्णय इंदिराजींनी घेतला आहे त्याचे सर्वांनी कौतुक केले पाहिजे. १९७२ साली अमेरिकेकडून येणारा ब्रेड साठविण्यासाठी किंवा इकडून तिकडे जाणाऱ्या मंडळींच्या वळकट्या बांधण्यासाठी कदाचित क्यूबाशी तागाचा व्यापार बंद होण्याची शक्यता आहे याची कॅस्ट्रोने दखल घ्यावी ! १९७१ अखेर क्यूबाने तागाची सोय दुसरीकडे करावी !

—ग्यानबा

## निवडणुकीतील गंमत

आग्रा येथील बऱ्याच दुकानदार व फेरीवाल्यांनी आपल्या दुकानांपुढे निवडणुकीचा प्रचार करणारी पोस्टर्स वगैरे लावण्यास मनाई केली होती. आपल्या या विरोधाचं समर्थन त्यांनी अशा प्रकारे केलं. एखाद्या पक्षाचा बोर्ड पाहून त्याविरुद्ध पक्षाला अनुकूल असणारा आमचा एखादा ग्राहक आमच्या दुकानावरच बहिष्कार टाकतो व अशा प्रकारे आमच्या धंद्याचं नुकसान होतं !

## उर्दूवार्ता :

**संकलन : हिदायतखान**

### □ बुद्धि-भेद नको !

'इंडियन युनियन मुस्लिम लीगचे अध्यक्ष जनाब महंमद इस्माईल यांनी नुकतेच मुंबईतील मुस्लिमांना दुय्यम दर्जाचे नागरिकत्व असल्याची तक्रार केली. ही तक्रार–नव्हे आरोप तसा नवीन नाही; जुनाच आहे.

खरंच भारतातील मुस्लिमांना दुय्यम दर्जाचे नागरिकत्व आहे काय ? भारत सरकार मुस्लिमांशी सापत्नभावाने वागते काय ? मुस्लिमांना मूलभूत हक्क नाहीत काय ?

उपरोक्त प्रश्नांबाबत निःपक्षपाती दृष्टिकोनातून विचार करणारास असे आढळेल की, मुस्लिमांनाही इतरांप्रमाणेच सर्व हक्क प्राप्त आहेत ! उलट, पर्सनल लॉसारख्या बाबतीत इतरांपेक्षा अधिक सवलती देण्यात आल्या आहेत आणि समंजस व सुशिक्षित मुस्लिमांना याची कृतज्ञतापूर्वक जाणीवही आहे.

मुस्लिमांच्या काही समस्या आहेत, नाही असे नाही; परंतु समस्या कोणत्या धर्मीयांच्या नाहीत ? एखाद्या समस्येबाबतचे असमाधान म्हणजे अन्याय नव्हे ! आणि त्याला अन्याय मानले तरी हा तथाकथित अन्याय काय फक्त मुसलमानांवरच होतो आहे ! अशा अनेक जातिजमाती आहेत, की त्यांना आपापल्या समस्या समाधानकारकरीत्या न सुटल्यामुळे अन्याय झाल्यासारखे वाटत आहे. तेव्हा तो फक्त मुसलमानांवरच होतो आहे, असं म्हणण्यात काय हशील ?

उलट, अन्य देशांपेक्षा भारतात मुस्लिमांना अधिक सवलती आहेत. इतरांप्रमाणे मुस्लिमांनाही निवडणूक लढविण्याचा असलेला हक्क म्हणजे तर त्यांचा बहुमानच नव्हे काय ?

तेव्हा जनाब महंमद इस्माईलसारखे नेते अशा प्रकारचे विकृत वक्तव्य करून मुसलमानांची नाहक दिशाभूल करीत आहेत ! मुस्लिम समाजात न्यूनगंडाचे बी पेरीत आहेत !

वस्तुतः, मुस्लिमांनी निर्भयपणानं व आत्मविश्वासानं देशाशी तादात्म्य पावण्याच्या दृष्टीने मुस्लिम नेत्यांकडून प्रयत्न होणे जरूर आहे. कारण मुळातच हा समाज भांबावून गेला आहे, संभ्रमावस्थेत वावरत आहे. अशा वेळी त्याचा बुद्धिभेद करायला नको ! उलट, सुशिक्षित व जाणकार नेत्यांनी त्याची भीती दूर करावयास हवी व त्यांना देशोद्धाराच्या हरएक कार्यात आवर्जून सामील करा-

वयाला हवं. कारण राष्ट्रकल्याणातच त्यांचेही कल्याण अंतर्भूत आहे आणि स्वतंत्र देशातील नागरिकाच्या हक्कांप्रमाणे त्याच्या कर्तव्याचीही जाणीव त्यांना करून द्यावयास हवी. किंबहुना, आपल्यावरील तथाकथित अन्यायाबाबत केवळ सरकारच्या नावाने टाहो फोडण्यापेक्षा स्वतःही तो दूर करण्यात सरकारला साहाय्य करावयाला नको काय ?

सांप्रतच्या मुस्लिम नेत्यांनी हे विधायक कार्य हाती घ्यावयास हवे; त्यामुळे मुस्लिमांचा आत्मविश्वास वाढेल व देशाच्या सर्वांगीण उत्कर्षास ते हितावहही ठरेल !

—' इन्क्लाब ' १९–२–६७

## ☐ अंदर की बात !

डॉ. लोहियांचा विक्षिप्तपणा सर्वश्रुत आहे. त्यामुळे त्यांच्या बेजबाबदार व अचाट वक्तव्याचा गंभीरपणे विचार करण्याचेही काही प्रयोजन नाही. तथापि त्यांनी मुस्लिम लॉविषयी नुकतेच जे तारे तोडले आहेत, त्यामुळे एक महत्त्वाची गोष्ट प्रकाशात आली आहे व ती म्हणजे विरोधी पक्षांच्या मनांत मुस्लिम समाजाविषयी आकस आहे.

निवडणुकीच्या या मोसमात सोशॅलिस्ट पक्ष मुस्लिमांना समान हक्क मिळावे, असं आवर्जून सांगत असता किंवा एस्. एस्. पी. पक्षाच्या व्यासपीठावरून मुसलमानांवर सरकारकडून अन्याय होत आहे, असा ओरडा करण्यात येत असला तरी ' अंदर की बात ' डॉ. लोहियांच्या मुखातून नेमकी बाहेर पडली आहे !

श्रीमती इंदिरा गांधी यांनी यासंबंधी मुस्लिमांना जे आश्वासन दिलं आहे, त्यामुळं काँग्रेसविरुद्ध मुस्लिम समाजाला भडकविण्याची संधी हुकल्याबद्दल खरं म्हणजे डॉ. लोहिया आदींना खंत वाटत आहे. कारण त्यांना माहीत आहे, की पर्सनल लॉला धार्मिक अधिष्ठान आहे, अशी मुस्लिम समाजाची भावना आहे. त्याचं भांडवल करून काँग्रेसविरुद्ध मुस्लिम–मत वळवण्याचा आपला हेतू अशा प्रकारे असफल झाल्यामुळं डॉ. लोहियांसारख्यांनी आता पवित्रा बदलून सरकार मुस्लिम समाजाला खूष करण्यासाठी काय वाटेल ते करीत आहे, अशी हाकाटी सुरू केली आहे.

—' उर्दू टाइम्स '

## ☐ भारत–पाक संबंध

मध्यंतरी फिरोजपूर येथे सरहद्दीचा भंग करणाऱ्या पाकिस्तानचे एक विमान पाडण्यात आले.

याबाबत पाकचे म्हणणे असे, की वैमानिक नवखा व शिकाऊ असल्यामुळे त्याला सरहद्दीचे भान राहिले नाही. उलट भारत सरकारचा खुलासा असा की त्याला खाली उतरण्याबाबत दोन–तीनदा सूचना देऊनही तो त्याप्रमाणं न वागल्यामुळं नाइलाज झाला.

भारत सरकारने केलेली कारवाई योग्यच होय, असं आम्हांला वाटतं. कारण पाकिस्तानच्या हद्दीत जर अशा प्रकारे एखादं भारतीय विमान गेलं असतं तर त्यानंही तसंच केलं असतं ! त्यामुळं पाकची तक्रार अर्थहीन वाटते. कारण ताश्कंद कराराचा जरी कितीही उदोउदो होत असला तरी अजूनही उभय देशांतील संबंध ताणलेलेच आहेत आणि त्यामुळे उभयतांनी आपापल्या सीमेवरील हालचालींकड डोळचांत तेल घालून पाहणं अगत्याचं आहे; किंबहुना, उभय देशांनी सरहद्द-भंगाचे प्रकार थांबविल्यानंच परस्परांतील स्नेहभाव वाढून संबंध सुधारण्याची शक्यता आहे !

—' उर्दू टाइम्स ' ५–२–६७

## ☐ उर्दू शिक्षणातील उणीव

' जमाई मक्तुमे 'च्या विद्यामाने मुंबईच्या महमंद उमर रज्जब रोडवरील म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या उर्दू माध्यमातील एका शाळेत हल्लीच्या शिक्षणाला लोकाभिमुख व सांप्रतच्या गरजा भागविण्यालायक बनविण्याच्या दृष्टीने एक सेमिनार व प्रदर्शन दि. २३–१–६७ पासून तीन दिवस भरविण्यात आले होते. तेथील एका सभेत भाषण करताना उप-राष्ट्रपती डॉ. झाकिर हुसेन यांनी सांगितलं, " हल्ली उर्दू वाङ्मयात बालकांसाठी म्हणून काहीच लिहिले जात नाही. त्यामुळे मुलांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने वाङ्मयाद्वारे आपली कर्तव्यपूर्ती होत नाही. वस्तुतः एका पुस्तकाने मुलांच्या ज्ञानात कितीतरी भर पडत असते. एकाच अर्थाचे अनेक शब्द त्यांच्या शब्दसंपत्तीत मोलाची भर घालू शकतात. " Kings English " या आठशे शब्दांच्या पुस्तकाच्या वाचनाने मुलांना हजारो शब्दांचा परिचय घडतो. ' रिकाम्या जागा भरा ' अशा प्रकारच्या स्वाध्यायानं त्यांची शब्दसंपदा वाढविता येते. वर्तमान घडामोडींवर त्यांना आपले विचार व्यक्त करण्याची संधी मिळावयास हवी. सध्याची उर्दू शिक्षणपद्धती आमच्या सद्यःपरिस्थितीला अनुरूप नाही ! "

प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ श्री. सय्यद शहाबुद्दिन यांचेही भाषण झाले. ते म्हणाले, " भाषा म्हणजे विचार व्यक्त करण्याचे प्रभावी साधन. परंतु हल्ली फक्त चटोर कथा लिहिणे–वाचणे यासाठीच त्याचा उपयोग होत असलेला दिसतो ! बाल-वाङ्मयाचा उर्दूत अभाव आहे. तसेच शास्त्रीय व तांत्रिक विषयांवर उर्दूतून पुस्तके उपलब्ध नाहीत. उर्दू लेखकांनी या उणीवा दूर करावयास हव्यात म्हणजे उर्दू माध्यमातील शिक्षणात सौकर्य येऊ शकेल !

—' मिलाप ' २४–१–६७

●

# विचार वारे

समीर

## □ उद्याचे जग

डॉ. लिनस पॉलिंग यांनी थोड्या दिवसांपूर्वी दिल्लीला 'आझाद स्मारक व्याख्यानमाले'त दिलेल्या पहिल्या भाषणात 'विज्ञान व जागतिक शांतता' या विषयावर जे विचार प्रकट केले, त्यांचा सारांश गेल्या आठवड्यात सांगितला. त्यांचे या मालेतले दुसरे व्याख्यान 'उद्याचे जग' या विषयावर झाले; त्यात त्यांनी व्हिएटनाम युद्धातील अमेरिकेची जबाबदारी आणि हिंदुस्थानचे भवितव्य हे विषय मुख्यत्वे हाताळले.

व्हिएटनाम युद्धाबद्दल ते म्हणाले, " माझ्या स्वतःचा देश (अमेरिका) या युद्धात गुंतला आहे व लोकांना ठार मारण्यासाठी घातक रसायने वापरीत आहे याचे मला दुःख वाटते. या लढाईत आगलावे बाँब व पिके नष्ट करणारे रासायनिक बाँब वापरून माझे देशबांधव दुसऱ्यांना दुःख देत आहेत व स्वतःही दुःख भोगीत आहेत. अमेरिकेचे लष्करी बजेट वाढत जाऊन आता ७,५०० कोटी डॉलर झाले आहे. अमेरिकन लष्करी अधिकाऱ्यांच्या मते सर्व व्हिएटनामवर हो-चि-मिन्हची सत्ता झाली तर आजूबाजूच्या सर्व प्रदेशांत साम्यवादी घुसून पंचमस्तंभी कारवाया सुरू करतील. हे शक्य असले तरी संभवनीय दिसत नाही.

व्हिएटनामी जनतेचे दुःख वाढू नये म्हणून अमेरिकेने व्हिएटनामच्या लढाईत हस्तक्षेप केला, अशी अमेरिकेची तरफदारी केली जाते; पण त्यात अर्थ नाही. कारण या हस्तक्षेपामुळे व्हिएटनामी व अमेरिकन जनतेलाही अधिक दुःख भोगावे लागले आहे. शिवाय साम्यवादी सरकार झाले तर जनतेला अधिक दुःख भोगावे लागेल, असे म्हणणेही खोटे आहे; कारण एकतर पुढे काय होणार आहे, हे कोणीच सांगू शकत नाही व दुसरे म्हणजे एकेकाळी अमेरिकेची वाखाणणी करणाऱ्या हो-चि-मिन्हचे सरकार जनतेचे दुःख वाढविण्याऐवजी हलके करणेही अशक्य नाही. हो-चि-मिन्ह अमेरिकेचा व इतर पाश्चिमात्य देशांचा मित्र झाला असता, १९५४ सालचा जिनेव्हा करार अमेरिकेने स्वीकारला असता व व्हिएटनामी जनतेला

स्वतःचें सरकार निवडण्यासाठी निवडणुका घेऊ देण्यात आल्या असत्या तर आताची दुःखद परिस्थिती निर्माण झाली नसती; परंतु आर्थिक कारणांमुळे अमेरिकेन नकार दिला. जगाला सध्या शांततेची गरज आहे, त्या दृष्टीने व्हिएटनामची ही अनैतिक लढाई घातक आहे; कारण तिचे महायुद्धात पर्यवसान होऊन सबंध मानवजातीवर संकट ओढविण्याची शक्यता आहे.

—लष्करशाही हे मानवाच्या यातनांचे उगमस्थान आहे. लष्करशाहीमुळे युद्धे तर होतातच, पण जगातल्या ज्या नैसर्गिक संपत्तीचा मानवी सुखासाठी उपयोग व्हायला हवा तिचा दुरुपयोग होतो. प्रत्यक्ष अमेरिकेतदेखील जे श्रीमंत आहेत ते अधिक श्रीमंत होत आहेत व जे गरीब आहेत ते अधिक गरीब होत आहेत. अमेरिकेची राष्ट्रीय संपत्ती फक्त सध्याची २० कोटी लोकसंख्या नीट राहू शकेल एवढीच आहे."

हिंदुस्थानच्या भवितव्याबद्दल व सध्याच्या परिस्थितीबद्दल बोलताना पॉलिंग म्हणाले की, हिंदुस्थानने नव-साम्राज्यवाद व आर्थिक शोषण या दोन गोष्टींपासून जपून राहिले पाहिजे. या बाबतीत भारतापुढे चांगली व वाईट अशी दोन्ही उदाहरणे आहेत. चिनी व इतर दक्षिण अमेरिकन देशांनी परकीय भांडवलाचे स्वागत केल्याने ते देश अधिकच गरीब झाले आहेत. उलट स्कॅंडिनेव्हियन देशांनी परकीय मालकीच्या उद्योगधंद्यांना थारा दिलेला नाही. या उदाहरणाचे अनुकरण करून भारताने स्वावलंबी व्हायला हवे.

गेल्या अठरा वर्षांत हिंदुस्थानचे दरडोई वार्षिक उत्पन्न अडीचशे रुपये होते ते पाचशे रुपये झाले आहे, पण त्याचबरोबर १४० टक्के चलनवाढही झाली आहे. सरकार दरवर्षी ४० कोटी डॉलर किंमतीच्या नोटा छापीत आहे. या चलनवाढीमुळे जनतेची क्रयशक्ती कमी झाली आहे. परिणामतः आजच्या सर्वसाधारण भारतीयाची एकूण परिस्थिती त्याच्या बापजाद्यांच्या परिस्थितीहून अधिक वाईट आहे. गेल्या १८ वर्षांचाच विचार केला तरी आजच्या पाचशे रुपयांची किंमत १९४८ च्या २१० रुपयांइतकीच आहे.

इतर बाबतींतली परिस्थितीही अशीच दयनीय आहे. देशातले ७५ टक्के लोक निरक्षर आहेत. सर्वसाधारण माणसाच्या अन्नात २५०० कॅलरी लागतात तर भारतीयांच्या आहारात फक्त १९०० असतात. जननाचे प्रमाण वाढले आहे तर मृत्यूचे कमी झाले आहे. हिंदुस्थानात फक्त ४० कोटी लोक नीट राहू शकतील, अशी देशाची परिस्थिती आहे. तेव्हा सध्याची ५० कोटी लोकसंख्या 'पुढील काही पिढ्यांत' दहा कोटींनी कमी करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. नाहीतर दारिद्र्य व रोगराई भारताचा पिच्छा सोडणार नाहीत.

●

# वणवा

## प्रकाश टंकसाळे

काळ्या आकाशात, अंधाराच्या पार्श्वभूमीवर तारे लुकलुकत होते. ढग आणि चंद्र यांचा पाठशिवणीचा खेळ बघत नर्मदा शिवाची वाट पाहत, अंधाऱ्या रस्त्याकडे डोळे लावून बसली होती. रोजचंच होतं हे. आसपासची मोकाट कुत्री भीतीच्या भासाने येणाऱ्या जाणाऱ्यावर भुंकत. अगदी कंटाळा येईपर्यंत. नर्मदेला त्या भुंकण्याची भीती वाटे.

बराच वेळ ती वाऱ्यामुळे उडणारा आपला पदर सावरीत, कुडाच्या दाराची करकर ऐकत राही. काही वेळानंतर कुत्र्यांची भुंकाभुंक थांबे. रहदारी थांबलेली असे. क्वचित एखादा कुणीतरी रस्त्यावर असे. रस्ता कसला, झोपडया बांधून उरलेली मोकळी जागा !

पण नर्मदा मात्र या वाटेकडे डोळे लावून बसे. शिवाय तिचा नवरा यायचा असे. तिला त्याची वाट पाहायचा कंटाळा येई. पण त्याचा तिला कंटाळा आलेला नसे म्हणून तर वाट पाहावी लागे. मग अगदीच कंटाळा आला म्हणजे ती आत येई. आजही तसंच झालं.

आपल्याच भोगाला शिव्या देत ती आत आली. ताऱ्यांची लुकलुक, चन्द्राच्या ढगांचा पाठशिवणीचा खेळ चालूच असे, पण आत तिला काही दिसत नसे. फक्त ऐकू येई वाऱ्यामुळे होणारी दाराची करकर. या करकराटाची तिला शिवा येईपर्यंत सोबत वाटे. तिला वाटायचं हे दारसुद्धा कुणाची तरी वाट पाहतंय. नर्मदेचं कुरकुरणारं मन दाराला विचारी, पण दार करकरण्याशिवाय काहीच करू शकत नसे. मग कधीतरी ही करकर थांबे वाऱ्याबरोबरच. मग नर्मदेला दाराचा हेवा वाटे. तिला वाटे दार ज्याची वाट पाहत होतं, ते त्याला मिळालं पण अजून शिवा नाही आला. रोजच नर्मदा आपल्या भावना निर्जीव दारावर लादे. पण दार वारा आला म्हणजे करकरे. दाराचा असा आवाज आला म्हणजे ती स्वतःलाच विचारी, " आला का तो ? " पण ती जाणून होती, दार संध्याकाळपासूनच करकरते आणि शिवा संध्याकाळी कधीच येत नाही परत. प्रथम प्रथम तिच्या लग्नानंतर नाना शंका तिच्या

तिला असा नवरा मिळाल्याबद्दल अभिमान वाटायचा; पण हवा भरलेल्या फुग्याला कुठंतरी काहीतरी टोचून भोक पाडावं आणि हवा निघून जावी, तसं तिचं व्हायचं. उणीव बोचायची, अभिमान विरून जायचा.



मनात येत. पण तिला त्याच्या प्रामाणिकपणाची खात्री पटली. तो दोघांचा संसार सुरळीत चालावा म्हणून जास्त श्रम करीत असे.

दाराच्या आवाजानंतर एकदा निराशा झाली म्हणजे ती पुन्हा श्वास रोखून दाराचा आवाज ऐकू येण्याची वाट पाहू लागे. दाराची करकर व्हायची थांबायची; पुन्हा व्हायची हा आशानिराशेचा खेळ बराच वेळ चाले. मग मध्यरात्रीच्या सुमारास नेहमीसारखा दाराचा करकराट व्हायचा. धाडकन दार आपटले जायचे. मग दीर्घ उच्छ्वासाचा आवाज आणि कंटाळलेल्या पावलांची धपधप.

बाहेरून आत आल्यावर तिच्या डोळ्यासमोर रोजचे हे चित्र उभे राहिले. ती वाट पाहतच होती. बऱ्याच वेळाने नेहमीसारखा दाराचा करकराट. धाडकन दार आपटले गेले. मग दीर्घ उच्छ्वास आणि कंटाळलेल्या पावलांची धपधप.

तो आत आला. ती निजली होती त्याच अंथरुणावर बसला. पटकन ती उठली. पदर सावरीत ती म्हणाली, "पाणी काढू का?"

तो होकार देणार हे तिला माहीत असे. मग स्वयंपाकानंतर चुलीवर ठेवलेल्या मोठ्या रॉकेलच्या डब्यात गरम करायला ठेवलेले पाणी ती बाहेर वादलीत नेऊन ओती. आत येऊन त्याच्या जवणाची तयारी करू लाग. घरातलं असं त्याचं हे पहिलं जेवण असे.

अंगातला सदरा काढून त्याने अंथरुणावर टाकला. घामाचा दर्प तिला जाणवला. त्यानं कुडत्याचा खिसा वाजवला. नाण्यांचं गाणं तिला ऐकू आलं. मग खिशातून चुरगळलेल्या नोटा तिच्या हातात दिल्या. तिने मोजल्या. अकरा होत्या. मग खुर्दा तिच्या हातात दिला. हळूच हसल्यासारखे करून समाधानाने ती म्हणाली, "आज काम बरं मिळालं जनु ?"

"त्या बिगर का खुर्दा जमतोय एवढा ?" आणि अंघोळीसाठी बाहेर गेला.

मग ती त्याचं पान मांडी. मध्येच आठवल्यावर कनवटीला लावलेले पैसे ती ट्रंकेत टाकी. गळयात अडकवलेल्या किल्लीने कुलूप बसवून त्याचं जेवण वाढी. आणि त्याची आंघोळ उरकण्याची वाट पाहत राही.

एवढयात आंघोळ आटपून तो आला. अंघोळीनंतर अंग हलकं झालं होतं.

तशीच पोटभर भूक लागलेली असे. अंगात शर्ट चढवून तो जेवायला बसे. जेवणात बदल काहीच नसे; पण तीच चपाती, सांबार त्याला हॉटेलातल्या तवंगदार मिसळीपेक्षा बरे लागे. ती त्याच्याकडे पाहत शेजारी बसे. मध्येच आठवून तो तिला विचारी,– "तू जेवलीस ?"

ती होकार देई. खरं म्हणजे त्यानंच तिला सांगितलेलं होतं.–

"मला काम गावलं बिवलं तर यायला उशीर होईल. तू माज्यासाठी उपाशी नग रहात जाऊ."

पण रोज तो चौकशी करतो याचे तिला समाधान वाटे. मग जेवण संपेपर्यंत तो काही बोलत नसे. मघाप्रमाणंच दाराची करकर अजून चालू असे. पण त्यात तिला आता वेगळाच सूर आढळे. त्याच सुराबरोबर तिचं मन गाऊ लागे गीत समाधानाचे.

चार–पाच चपात्या. गडवाभर सांबार संपवून तो तांब्यात पाणी असेल तर तसाच बसून चूळ ठोकतो. नसेल तर तिच्याकडून मागून घेतो. ती चटकन उठून देई. खळखळून तोंड साफ केल्यानंतर आणखी एक चूळ फेकून तो भिंतीच्या बुडाची चोय काढून दात कोरू लागला.

"दात किती स्वच्छ आहेत यांचे" मनातच ती म्हणाली. कौतुकानं ती त्याच्याकडे पाहत होती. तिला त्याचा अभिमान वाटायचा. स्वतःचाही. असा नवरा मिळाल्याबद्दल. निरोगी, निर्व्यसनी नाहीतर इतर शेजारच्या बायकांच्याकडे पाहतच होती. विडया, चिलमी, सिगारेटी, क्वचित गांजा ओढणारे नवरे. काही दारू पिऊन येत. रात्री अपरात्री येणारे. बायका-पोरांना मारणारे. तिला किळस यायची त्यांची सर्वांची; आणि तिची छाती आणखी थोडी भरून यायची. पण हवा भरलेल्या फुग्याला कुठंतरी काहीतरी टोचून बारीकसं भोक पडावं आणि त्यातली हवा निघून जावी तसं तिचं व्हायचं. मनाला खंत वाटायची. संसारातली उणीव मनाला बोचायची. अभिमान विरून जायचा. आणि रोज नवऱ्याचा मार खाणाऱ्या, पोरे

पाजवणाऱ्या बायकांचा तिला हेवा वाटू लागे.

तिचा नवरा अजून तिचा झाला नव्हता. लग्न होऊन पाच–सहा महिने होत आले होते तरीही.

तिला आठवलं,

" तिचं नुकतंच लग्न झालं होतं. गावाकडून तो तिला शहराकडे घेऊन आला होता. कुणीतरी सोडलेली मोडकी झोपडी पैसे भरून आणि खर्चून दुरुस्त करून आपल्या ताब्यात घेतली होती. बराच पैसा खर्चून त्यांनी इतर झोपडीवाल्यांना हेवा वाटावा असा संसार थाटला. "

दुसऱ्या दिवशी पहाटेच तो उठला. त्याने तिला हाक मारली, " नर्मदा, ए नर्मदा. ऊठ. उजाडलं नव्हे का." ती जागीच होती पण झोपेचं सोंग घेतलं होतं. तिला वाटलं एकदा दोनदा हाक मारेल मग जवळ येईल मग आपणांस हालवून उठवेल. म्हणेल, " नर्मदे, चा पाणी कर काय तरी. कामाला जायच हाय मला. " पण त्याने हाक मारली नाही. त्याने टिपातले पाणी घेतले. मिश्रीतल्या पुडीतून मिश्री घेऊन त्याने दात घासले. खळखळून चूळ भरून तोंडावरूनही गार पाण्याचा हात फिरवला. आणि त्याने चूल पेटवण्यासाठी लाकडांना हात घातला. रॉकेल तेलासाठी चिमणी हुडकू लागला. ती त्याला पाठीमागे दिसली. जळतच होती अजून. त्याने त्यातले रॉकेल लाकडावर ओतले आणि आग लावली. लाकडांनी भक्कन् पेट घेतला. आणि नर्मदा उठली आणि एखादा गुन्हा केल्याच्या आविर्भावात म्हणाली, " लवकर उठायला सांगायचं हुतं मला. मी उठले असते. "

" म्हटलं, तू दमली असशील म्हणून नाही उठवलं. "

" सकाळीसुद्धा. "

" मी उठवलं नाही म्हणून काय तू उठल्या बिगार ऱ्हाणार हुतिस ?"

" चा करू ?"

" नको. तसलं काय लागत नाही मला. रातची भाकरी वाढ. खातो. कामाला जातो चटशिरी."

शिक्यावरच्या भगुल्यात झाकून ठेवलेली भाकरी भाजी त्याला वाढली. हातावरच त्याने ती संपवली. वर तांब्याभर पाणी रिचवलं. म्हणाला, " मी जातो आता कामाला. दुपारी टाईम गावला तर ईन जेवायला. नाही आलो तर तू आपली जेऊन घे. घर सोडून जाऊ नगस बाहेर. "

" मग दुपारी कुटं जेवनार ?"

" बगतो माजं मी. " आणि तो गेला.

त्या दिवशी रात्री आठानंतर आला. इतर बायकांचे नवरे अजून यायचे होते. त्या कुतूहलात लवकर परत येणाऱ्या नव्या नवऱ्याकडे पाहू लागल्या. हे नवं कुटुंब त्यांना वेगळंच वाटत होतं. काही बोलणी चालत. पण तो नीट आत आला. आल्या

आल्या त्याने कमाई तिच्या हातात दिली. " आजपासून तुज्याकडं हे. ब्यॉगत ठेव. कुलुप घालत जा. काय लागलं सवरलं तर मला सांगत जा."

ती पैसे घेत म्हणाली. " दुपारी कुटं जेवलासा तुमी ?"

" जेवतोय कुटला."

" मग ?"

" मिसळपाव खाल्ला दोनदा."

" पोट तरी भरतं का त्यानं. उद्यापासन तुमासंग भाकरी भाजी बांधुन देते."

" मी बी तेच सांगणार होतो तुला."

" वर आत्ता जेवायला चला. गरम हाय तवर."

" नाही, आदी मला अंगुळीला पानी दे. मग जवन."

त्याची आंघोळ झाल्यावर दोघेजण जेवले. मग ती अंथरुण घालू लागली तेव्हा तिच्या मनाला आठवणी गुदगुल्या करू लागल्या. मनातच ती हसू लागली. अंथरुणा-पांघरुणाबरोबरच ती आठवणींच्या घड्या उलगडू लागली होती.

तेव्हा तिला आठवलं होतं, तिच्या गावी शेजारच्या काशीचं लग्न झालं. तिचा नवरा पण शहर गावीच कामाला होता. मध्ये एकदा ती गावाकडे परत आली माहेरी, तेव्हा सगळ्या साळकाया माळकायांनी केलेली नसती चवकशी. तिला विचारलेले नाना प्रश्न. अंथरूण घालता घालता तेच प्रश्न ती स्वतःला विचारू लागली. पण तिने त्या प्रश्नांना सांगितलं होतं, " उद्या या. उद्या सांगते तुम्हांला उत्तर." तेव्हा तिला आणखीही बरंच आठवलं. शहर गावी जाऊन आलेल्या पोरींनी सांगितलेल्या गोष्टी. सिनेमातल्या. एखादी दोन-चार बुक शिकून आलेली पोरगी पुस्तकातल्या गोष्टी सांगत असे. रंगवून खुलवून. त्या सर्व गोष्टींनी तिच्या मनात गर्दी केली होती. पण मनोमन ती म्हणाली, " आता ते सारं मला अनुभवायचं आहे." आणि अंथरुणावरच्या सुरकुत्या दोन्ही हातांनी सरळ करू लागली तेवढ्यात—

तेवढ्यात बाहेर वाऱ्याला उभा राहिलेला नवरा आत आला. एकदम तो म्हणाला, " तिथंच कशाला टाकलीस दोनी हातरुनं ?" सुरकुत्या साफ करणारे तिचे दोन्ही हात तिथंच थांबले. अंथरुणावर हात टेकून तशीच आडवी होत तिनं विचारलं, " मग ?" मनातून लाजतच.

" मी इकडं दाराजवळ झोपतो वाऱ्याला. तू व्हय तिथंच झोप."

ती काहीच बोलली नाही. तशीच उठून उभी राहिली. श्रमानं घातलेले अंथरुण दमात त्याने गुंडाळले आणि दाराजवळ पसरले आणि तो तिथं आडवा झाला. झोपला. क्षणाभरात घोरूही लागला. नर्मदा विचारी एकटीच चुलीजवळ झोपली. रडत, हुंदके देत.

तिचं रडणं त्याच्या कानी गेलं असावं. तो उठला. तिच्याजवळ आला म्हणाला—

" तू का रडतियास मला ठाव हाय. पण जरा थांब. कुटतरी कायमची नोकरी

वगतो. मग सुरळीत चालल सारं."

आणि त्या दिवशीपासून ती मध्यरात्रीपर्यंत एकटीच त्याची वाट पाहत बसे. जवळच्या स्टेशनबाहेर तो हमाली करे. कधी दहापर्यंत कधी अकरापर्यंत परत येई. आल्यावर दिवसभरची कमाई तिच्याकडे देई. आंघोळ करी, जेवण करी, झोपून जाई. नर्मदा तळमळत अंथरुणावर पडे आणि कधीतरी झोपून जाई.

पण एवढ्यात तिला जाणीव झाली. दात कोरताकोरता नवरा आपल्याच अंथरुणावर झोपलाय. दिवसभराच्या श्रमानंतर त्याला पडल्या पडल्या झोप आली होती. मग तिनं ट्रंकेजवळच त्याचं अंथरुण घेतलं. तिच्या अंथरुणाशेजारीच टाकलं. अगदी हळूच. आणि तीही झोपली—त्याच्या शेजारीच. त्याच्या उच्छ्वासाचा आवाज ऐकत. कितीतरी वेळ. काही वेळानंतर तो चुळबुळला. ती घाबरली. तिला वाटलं याला जर जाग आली तर हा रागावेल आपल्यावर. पण तो जागा झाला नाही. कूस बदलून झोपला केवळ. मघासारखाच शांत झोपला होता. त्याच्या चुळबुळीनं आलेली भीती घालवून मघासारखीच पुन्हा ती त्याच्या उच्छ्वासाचा आवाज ऐकत राहिली.

पण झोप येईना. ती हळूच उठली. तिने चिमणी मोठी केली. त्याच्याकडे पाहिले. त्याचे ओठ हळूच कंप पावत होते. काही तरी बोलत असावा असं वाटलं तिला. खात्री करून घेण्यासाठी ती वाकली. आपुले कान ओठांजवळ नेले. पण पुन्हा ती सरळ होत ती आपल्याच वेडाला हसली. स्वतःलाच. मनात हसली. "ही भाषा कानांना समजणारी नाही. ओठांनाच समजणारी भाषा आहे." तिच्या अंगावर काटा आला. तिला आठवलं. गावच्या पाटलाची सरू शहरगावी शिकायला असे. ती एकदा गावी आली तेव्हा तिने सगळ्या मैत्रिणींना सिनेमातल्या गोष्टी सांगितल्या होत्या. एकदा तिने सांगितलं होतं इंग्रजी सिनेमात बाया–मानसं एकमेकांचे मुके घेतात. नर्मदेला वाटलं आपणही याचा मुका घ्यावा. हळूच वाकून पदर सावरत तिने आपले ओठ त्याच्या गालांवर टेकवले. ओझरते. पण त्याच्या दाढीचे खुंट टोचले. मग तिने आपले ओठ त्याच्या ओठावर टेकवले. तिला भीती वाटत होती पण तो जागा झाला नाही. ती आणखी धीट झाली दोन्ही हात बाजूंना टेकले. ती त्या निद्रिस्त शिवाच्या आधीन होणार तोच तो जागा झाला. ओरडला—

"काय करतीयास हे ?"

"काय केलं मी ?" तेवढ्याच धीटपणाने तिने विचारले.

"काय करत हुतिस ? मी सांगतोय ते पटत नाही का तुला ?"

ती काहीच बोलली नाही. पण त्याच्या वटारलेल्या डोळ्यांना नजर देत राहिली. तो चिडला. भडकला. इतर झोपड्यांत होतो तसा फाडकन आवाज तिच्या गालावर झाला. नर्मदेने हंबरडा फोडला. जाग्या असलेल्या झोपड्यांना हा आवाज यांच्या झोपडीतून आला आहे याची कल्पना नव्हती. त्यांना त्याचं विशेष काही वाटलं

नाही. सगळेजण झोपी गेले. शांतपणे. एकटी ती मात्र मुसमुसत होती रात्रभर.

कुठतरी बुट्टीखाली डालून ठेवलेला कोंबडा पहाटेचा आरवला तेव्हा ती उठली. डेचकीभर पाणी घेऊन हात तोंड धुतले. पण अजून ती रडतच होती. शिवानं पूर्वी कधीच तिला मारलं नव्हतं. त्याच म्हणणंही बरोबर होतं. घरात आज आहे तर उद्या नाही अशी परिस्थिती मग उगीच पोरबाळ कशाला ? कायमची नोकरी लागू दे मग सर्व ठीक होईल असं तो म्हणायचा. जर अशा स्थितीत एखादं पोर झालं तर त्यांच्या संसाराची स्थिती इतरांच्यासारखी व्हायला वेळ कितीसा लागला असता ?

तिच्या मनालाही ते पटत होतं. पण शरीरातली ऊब पेटली होती. ते मानायला तयार नव्हतं. ती ऊब शमायला हवी होती. पण तेच तर होतं नव्हतं. काल काही-तरी भलतंच झालं होतं. तिच्या नवऱ्यानं तिला मारलं होतं. कारण काय ? तिनं आपला हक्क मागितला होता.

विचारांच्या रगाड्यातच तिने भांडी घासली. चुलीला पोतेरं घातलं आणि आता नवरा उठेल, त्याला आंघोळीला पाणी पाहिजे, जेवण तयार पाहिजे त्याच्या बरोबर द्यायला म्हणून तिने चुलीतल्या लाकडावर चिमणीतलं रॉकेल ओतलं आणि चिमणीच आडवी करून लाकूड पेटवलं. भक्कन् पेटलं ते लाकूड. पुन्हा तिला विचारांनी घेरलं. तिला डोळ्यांसमोर दिसायला लागली, एक आग. ती वाढत वाढत गेली. आगीचा वणवा झाला आणि त्यात कुणीतरी जळून गेला.

●


लाल महाल प्रतापगड पन्हाळगड

राजगड पुरंदर आग्रा

मुजऱ्याचे मानकरी

लेखक : ब. मो. पुरंदरे : मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण पेठ, पुणे २

# आणि ड्रॅगन जागा झाला

अरुण साधू

उत्तरार्ध

लेखांक : आठवा

१८ सप्टेंबर १९३१ साली मांच्युरिया भागातील एका रेल्वे लाईनवर एक प्रचंड स्फोट झाला. घातपाताचा तो प्रकार होता. मांच्युरियाच्या उत्तरेस दबा धरून बसलेल्या जपानी सैन्याला चीनमध्ये घुसण्यास तेवढे निमित्त पुरे होते. रेल्वे-वरील जपानी हितसंबंध राखण्याचे नाव सांगून जपानी सैन्य सरळ मांच्युरियात घुसले, तिथे असलेल्या मांच्युरियन सेनांना जपान्यांनी खाली दक्षिणेत पिटाळून लावले आणि आपल्या हाताखालचे एक नवेच मांचुकुवो सरकार मांच्युरियात स्थापन केले.

हे सरळ सरळ आक्रमण होते. पण ते चालू असताना चँग-कै-शेकचे तिकडे मुळीच लक्ष नव्हते. त्या वेळी तो कम्युनिस्टांच्या निर्मूलनाच्या एका मोहिमेत मग्न होता. जपानी आक्रमणाची त्याने काहीच दखल घेतली नाही. जपानी सैन्याने हळूहळू आपले हातपाय पसरावयास सुरुवात केली. उत्तर चीनमधील एकेक शहर जिंकीत अनेक प्रांतांचे लचके तोडले जाऊ लागले. चँगच्या सेना इकडे कम्युनिस्टांना नेस्तनाबूद करण्यात गुंतल्या असताना १९३५ पर्यंत जपानी सैन्याने उत्तर चीन-मधील पाच प्रांतांत कोणत्याही प्रखर प्रतिकाराशिवाय आपला अंमल बसविला होता.

जपानी आक्रमणाला विरोध ही चिनी कम्युनिस्टांची सुरुवातीपासूनची घोषणा होती. 'लाँग मार्च 'मध्ये असतानाच १ ऑगस्ट १९३५ साली चिनी कम्युनिस्ट पक्षाने अखिल चिनी-जपान-विरोधी आघाडीची स्थापना केली आणि आक्रमकांचा प्रति-कार करण्यासाठी सर्व चिनी जनतेचे आपले अंतर्गत मतभेद आणि कलह बाजूला ठेवून एकत्र यावे, असे जाहीर आवाहन केले. कोमिन्टांगमधील राष्ट्रीय बाण्याच्या

अधिकाऱ्यांना हे आवाहन होते. 'आपसातील युद्धे थांबलीच पाहिजेत' ही कम्यु-निस्टांची पहिली घोषणा होती.

कम्युनिस्टांची ही आघाडीची योजना आणि घोषणा सबंध चीनभर एकदम लोकप्रिय झाली. विशेषतः, जपानी आक्रमणाच्या दडपणाखाली येत असलेल्या चीनच्या उत्तर प्रांतांमध्ये तर जपानविरोधी भावनांनी एकदम पेट घेतला. ९ डिसेंबर १९३५ ला पेकिंग विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी जपानविरोधी प्रचंड निदर्शने केली. 'परकी आक्रमणाविरुद्ध एक होऊन नागरी युद्ध थांबवा', 'जपानी साम्राज्यवादाचा धिक्कार असो' अशा घोषणा देणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांवर कोमिन्टांग पोलिसांनी जोरदार हल्ले चढविले. दोनशेच्यावर विद्यार्थी जखमी झाले. या बातमीने सर्व चीनभरच जपानविरोधी आंदोलनाने पेट घेतला. कामगार–विद्यार्थी संप करून प्रचंड निदर्शने करू लागले आणि ही निदर्शने दडपून टाकण्याचा आटो-काट प्रयत्न कोमिन्टांग पोलीस करू लागले. सर्व जपान-विरोधी चळवळी मोडून काढण्याची चँग-कै-शेकची आज्ञाच होती.

## माओची नानकिंग सरकारला तार

सर्वत्र पेटून उठलेल्या या जपानविरोधी भावनांचा कम्युनिस्टांनी पुरेपूर उपयोग करून घेतला. आपल्या जपानविरोधी आघाडीमार्फत सर्व चीनमधील लोकांची मने जिंकण्याचा त्यांनी यशस्वी प्रयत्न चालविला. जपानी सैन्याने हाकून लावलेले मांच्युरियन सैन्य शेन्सी सोव्हिएटच्या आसपासच पसरले होते. आक्रमकांना हाकून लावण्यासाठी हे सैन्य उत्सुक होते आणि त्यासाठी जपान्यांवर प्रतिचढाई कर-ण्याची त्यांची तयारी होती; पण जपानी सैन्यावर चालून जाण्याऐवजी या मांच्यु-रियन सैन्यावर कम्युनिस्टांचा बंदोबस्त करण्याची कामगिरी चँग-कै-शेकने सोपविली आणि त्याला विरोध होऊ लागला.

दरम्यान लाल सैन्याचे आणि मांच्युरियन सैन्याचे संबंध भलतेच सुधारले होते. लाल सैन्याच्या जपानविरोधी घोषणा मांच्युरियनांच्या भावनांनाच एकदम हात घालीत होत्या. त्यामुळे त्यांच्यांत एकतऱ्हेचे बंधुत्व निर्माण झाले होते. एकमेकांवर हल्ले न करण्याचा जणू गुप्त करारच या दोन सैन्यांनी केला होता. चँग–कै–शेकच्या इतर जनरलसचे सैन्य आजूबाजूला असल्याने मांच्युरियन सैन्याला ही दोस्ती उघड-पणे दाखवता येत नव्हती, पण उभयतांतील देवाणघेवाण वाढू लागली होती. लाल प्रचारक मांच्युरियन सैन्यात विखुरले जात होते. मांच्युरियन सैन्याची मुख्य कचेरी सियान येथून जवळच एका ठिकाणी; तर लाल प्रचारकांच्या मदतीने जपान-विरोधी आघाडीची एक प्रशिक्षण शाळाच काढण्यात आली होती. हळूहळू साऱ्या मांच्युरियन सैन्याचे स्वरूप बदलू लागले. सैन्याचा कमांडर जनरल चँग-ह्सुये-लियांग याचा या सर्व गोष्टींना पाठिंबा होता. आपली मायभूमी मांच्युरियाही स्वतंत्र

करण्यासाठी आपले सैन्य त्याला बळकट करायचे होते. परंतु त्यालाही चँग-कै-शेकच्या गुप्त हेरांपासून स्वतःला वाचवून हे सर्व करावे लागत होते.

१९३६ च्या मेच्या पहिल्या आठवड्यात माओ-त्से-तुंगने येनानहून जाहीर केले की, "जपानी आक्रमणाच्या छायेखाली असताना आपसात लढून आम्ही चीनची शक्ती खच्ची होऊ देणार नाही. मांचुरियन सैन्याशी न लढण्याचे आम्ही आपणहून ठरवून टाकले आहे."

या घोषणेमागोमाग माओने चँग-कै-शेकच्या नानकिंग सरकारला एक तार पाठवली आणि देशातील अखिल जनतेला उद्देशून ऐक्याचे आवाहन केले. तारेत माओने म्हटले होते–

"चिनी राष्ट्र आणि चिनी जनता धोक्यात आली असताना या आणिबाणीच्या प्रसंगी आपण आपसातील भाऊबंदकी थांबवून शत्रूच्या प्रतिकारासाठी आपली सारी शक्ती एकवटली पाहिजे. आपला भूतकाळ विसरून हे राष्ट्रव्यापी नागरी युद्ध थांबवावे, अशी लाल सैन्याच्या क्रांतिकारी समितीची नानकिंग सरकारला सूचना आहे. ही गोष्ट नानकिंग सरकारच्या हिताची तर आहेच; पण त्याचबरोबर त्यात आपल्या देशाचे आणि जनतेचेही हित आहे. एवढे करूनही नानकिंग सरकारला जाग येत नसेल आणि ते हटवादीपणाने जपान्यांची बाजू घेत राहील तर शेवटी ते कोसळूनच पडेल. अखिल चीनची जनता हे सरकार मग खाली खेचून काढील–"

सर्व चीनभर या तारेची शक्य तेवढी जास्तीत जास्त प्रसिद्धी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. माओने वेळ बरोबर साधली होती आणि चिनी जनतेची नाडी नेमकी हेरली होती. जपानी आक्रमणामुळे जपानविषयी चिनी जनतेच्या मनात विलक्षण तिरस्कार निर्माण झाला होता. आणि अशा वेळी जपान्यांना विरोध करण्याऐवजी चँग–कै–शेक त्यांना उत्तर चीनमधील सारे रान मोकळे सोडत होता. त्यामुळे चँग–कै–शेकच्या हुकूमशाहीमुळे निर्माण झालेला असंतोष आता अधिक उग्र रूप धारण करू लागला होता.

## असंतुष्ट जनता

दहा वर्षांच्या आपल्या हुकूमशाही राजवटीत चँग–कै–शेकने सामान्य जनतेची मने जिंकण्यासाठी खरोखर काहीच केले नव्हते. सर्व चीन आपल्या एका अंमलाखाली आणणे आणि कम्युनिस्टांना कायमचे नेस्तनाबूद करणे या एकाच वेडाने तो पछाडला होता. त्यामुळे त्याचे सारे लक्ष लष्करी कारवायांकडेच होते. शेती, व्यापार, उद्योगधंदे, दळणवळण यांपैकी कोणत्याही बाबीकडे चँगने लक्ष पुरविले नाही. लष्कराच्या सोयीसाठी म्हणून जे जे काही करता येईल ते ते मात्र तो मोठ्या तत्परतेने करीत होता. शांतता, समृद्धी आणि सुरक्षितता या जनतेच्या मूलभूत आकांक्षांकडे चँगचे आणि त्याच्या कोमिन्टांग सरकारचे लक्षच नव्हते. उलट जनते-

तील असंतोष दडपून टाकण्यासाठी अनेक हुकूमशाही दहशतवादी पद्धती वापरायला त्याने सुरुवात केली होती. 'निळे डगले' म्हणून एक गुप्त पोलिसी संघटना चँगने काढली. कोमिंटांग सरकारवर टीका करणारांचे निर्मूलन करण्याचे कार्य ही संघटना अतिशय गुप्तपणे करीत असे. सन–यत–सेनने पुरस्कार केलेल्या लोकशाहीच्या साऱ्या तत्त्वांना कोमिन्टांग सरकारने हरताळ फासला होता.

इतकेच नव्हे तर शेतकऱ्यांना आणि खालच्या वर्गांना दडपून टाकण्याच्या जुन्या वादशाही चिनी पद्धती कोमिटांग सरकारने पुन्हा अंमलात आणल्या. कोमिटांग सैन्यात शेतकऱ्यांना जबरदस्तीने भरती करीत. एखाद्या शेतकऱ्याच्या गुन्ह्याबद्दल साऱ्या खेड्यालाच सामूहिक शिक्षा केली जाई. आणि आपल्या वाटेत येतील ती खेडीपाडी लुटून फस्त करणे हा तर कोमिटांग सैन्याचा गंमतीचा खेळ होता. वृत्त-पत्रांचे स्वातंत्र्य बाद झाले होते आणि मजूर संघटना करायला बंदी घालण्यात आली होती. या साऱ्या गोष्टींमुळे कोमिटांग अंमलाखालील चिनी जनता बेजार झाली होती. मांच्युरियात आणि उत्तर चीनमध्ये घुसलेले जपानी सैन्य याहीपेक्षा अन्यायाने आणि क्रूरतेने वागत होते. पण जपानविरोधी प्रचार करणे हा कोमिटांग अंमला-मध्ये सर्वांत मोठा गुन्हा होता. आणि असा प्रचार करणाऱ्या हजारो लोकांना चँगच्या निळे डगलेवाल्यांनी तुरुंगाची वाट दाखविली होती.

दक्षिण आणि मध्य चीनमधील कियांगसी सोव्हिएटमधून कम्युनिस्टांनी काढता पाय घेतल्यावर कम्युनिस्टांनी ज्या ज्या म्हणून शेती सुधारणा घडवून आणल्या होत्या त्या त्या कोमिटांग सरकारने मोडून काढल्या. शेतकऱ्यांकडच्या जमिनी हिसकावून त्या जमीनदारांना परत केल्या आणि ज्या ज्या शेतकऱ्यांचा कम्युनिस्टांचे साथीदार म्हणून संशय वाटला त्यांना कोमिटांग सैनिकांनी ठार मारून टाकले. या सर्व कृत्यांमुळे जनतेमध्ये कोमिटांग राजवटीविषयी पूर्वी ज्या आशा होत्या त्या सर्व मावळल्या आणि त्यापेक्षा गरिबांची बाजू घेणारे, जपानला जोराचा विरोध कर-ण्याची तयारी असणारे आणि भाषण व वृत्त-स्वातंत्र्याची मागणी करणारे कम्यु-निस्ट बरे, असे लोकांना वाटू लागले.

## अखेरच्या मोहिमेची तयारी

आणि अशा पार्श्वभूमीवरच माओ-त्से-तुंगची ती जाहीर तार लोकांनी वाचली. लोकांमध्ये एक अपेक्षेचे वातावरण तयार झाले. त्यामागोमाग कम्युनिस्ट पक्षाने कोमिटांग सरकारला एक जाहीर पत्र पाठवून चीनमध्ये लोकशाही गणराज्य स्थापन करण्याचा प्रयत्न झाल्यास त्या गणराज्याचा एक भाग म्हणून राहण्यास कम्युनिस्ट तयार आहेत, असे सांगितले. एक लोकशाही गणराज्य चीनमध्ये स्थापावे, अशी मागणी करणारी एक चळवळही त्या वेळी चीनमध्ये जोरात होती.

त्यानंतर एकापाठोपाठ एक अशा अनेक जाहीर तारा आणि पत्रे पाठविण्याच्या

चिनी कम्युनिस्टांनी सपाटाच लावला. जपानी आक्रमण थोपविण्यासाठी कोणत्याही अटी स्वीकारून कोमिटांगशी बोलणी करण्यास कम्युनिस्टांनी तयारी दाखविली होती व प्रचाराचा तसा धडाका लावला होता. परंतु या प्रचाराचा जनरॅलिसिमो चँग-कै-शेकवर काहीही परिणाम झाला नाही. उलट, आता या 'उरल्या सुरल्या' कम्युनिस्टांचा कायमचा बंदोबस्त करावा म्हणून त्याने एका 'अखेरची' निर्मूलन मोहिम आखली. आणि त्यासाठी त्याने तयारी करण्यास प्रारंभ केला आणि त्यातूनच चिनी इतिहासातील एक मोठा रोमांचकारी प्रसंग उद्भवला.

मांच्युरियन सैन्याच्या जपानविरोधी भावना अतिशय तीव्र होत्या आणि मांच्युरियन सैन्याचा अधिपती, यंग मार्शल चँग-ह्सुये-लियांग हा जपानविरोधी चळवळींना उघड उघड पाठिंबा देत होता. जपानविरोधी लढ्यासाठी कम्युनिस्ट आपणहून सहकार्य देत आहेत, ते कोमिटांग सरकारने स्वीकारावे अशी त्याची भूमिका होती. आणि "जपानला विरोध करूनच चीनची खरी एकी साधता येईल. सरकारने जर जनतेच्या या इच्छेला मान तुकविली नाही तर ते टिकू शकणार नाही," असा जाहीर इषाराही यंग मार्शलने दिला होता.

परंतु चँग-कै-शेकने तो ऐकला नाही. उलट आपल्या निर्मूलन मोहिमेच्या निमित्ताने कम्युनिस्टांवर हल्ला चढविण्यासाठी आपले उत्कृष्ट सैन्य त्याने शेन्सी प्रांतांत धाडले. शस्त्रे, दारूगोळा, विमाने मोठ्या प्रमाणात दक्षिण शेन्सी प्रांतात गोळा होऊ लागली. या वेळी जनरल चँग-कै-शेकने सियानला एक धावती भेट दिली. यंग मार्शलने जपानविरोधी आघाडीचा कार्यक्रम स्वीकारण्याची या वेळी चँगला सूचना केली. पण चँग म्हणाला, "जोपर्यंत एकेका लाल सैनिकाला वेचून मारण्यात आलेले नाही आणि जोपर्यंत प्रत्येक कम्युनिस्ट तुरुंगाच्या गजाआड गेलेला नाही तोवर ही भाषा व्यर्थ आहे–"

परंतु शेन्सी भागात कम्युनिस्टांविरुद्ध होत असलेल्या या जय्यत तयारीचा इतर चीनमध्ये वासही येत नव्हता. सरकारी प्रचारानुसार लाल सैन्याचा आधीच खातमा झाला होता. आणि जे थोडेफार उरले होते त्यांची व्यवस्थित काळजी घेतली जात होती. दरम्यान जपानने जर्मनी आणि इटालीशी लष्करी करार केलेले होते. बरेच जर्मन ऑफिसर्स कोमिटांग सैन्यात होते त्यांचा जपान्यांशी तिकडचा संबंध होता. त्यामुळेही असंतोष वाढत होता. त्याच वेळी कम्युनिस्टांच्या बंदोबस्तासाठी पाठविलेल्या जनरल हू-त्सुंग-नान याच्या नेतृत्वाखालील कोमिटांग सैन्याने एका ठिकाणी लाल सैनिकांच्या हातून सडकून मार खाल्ला ही घटना मांचुरियन सैन्याला स्वागतास्पदच वाटली. आता तरी चँग-कै-शेक धडा शिकेल असे त्यांना वाटत होते.

संधी साधून मांच्युरियन सैन्यातील जनरलसनी चँग-कै-शेकला एक मागणीपत्र सादर करावयाचे ठरविले. नागरी युद्ध थांबवावे आणि जपानचा प्रतिकार करावा अशा त्यांच्या मागण्या होत्या. डिसेंबर १९३६ मध्ये निर्मूलन मोहिमेची पाहणी

करण्यासाठी चँग सियानला येणार होता, त्या वेळी हे मागणीपत्र सादर करावे, असे ठरले.

## चँग-कै-शेकची सियान-भेट

सात डिसेंबरला जनरॅलिसिमो चँग-कै-शेक आपल्या सर्व लवाजम्यानिशी विमानाने सियानला आला. त्याआधी पंधरा दिवसांपासून त्याच्या सुरक्षेसाठी निळे डगलेवाल्यांनी सियानमध्ये धुमाकूळ घातला होता. जिकडे तिकडे चँगचे गुप्त हेर फिरत होते. शेकडो संशयास्पद इसमांना अटक करण्यात आली आणि चँग जेथे राहणार होता तेथे कडक बंदोबस्त ठेवण्यात आला. तो आला तेव्हा वातावरण अतिशय तापले होते. ठिकठिकाणी जपानविरोधी निदर्शने होत होती.

चँगच्या संरक्षणाची व्यवस्था त्याच्या शरीररक्षकांनी अगदी कडक ठेवली होती तरी मांच्युरियन सैन्याच्या जनरलसच्या सगळ्या शिष्टमंडळाला एकदम भेटण्यास त्याने नकार दिला. एकेका जनरलची त्याने एकांतात गाठ घेतली. अनेक प्रकारची आमिषे, धाकदपटशा दाखवून त्यांच्यात फूट पाडण्याचा प्रयत्न त्याने केला. पण व्यर्थ. सर्व जनरल्स त्याचे नेतृत्व मानण्यास तयार होते पण कम्युनिस्ट निर्मूलनाची मोहीम बंद करून आपली शक्ती जपानला प्रतिकार करण्यास वापरावी असे सर्वांना वाटत होते. सर्वजण जपानी आघाडीवर जाण्यास उत्सुक होते. त्या सर्वांना चँगने एकच उत्तर दिले– " लाल सैन्याचा नाश करा. लाल दरोडेखोरांविरुद्धची आपली मोहीम आता इतक्या थराला येऊन पोचली आहे की, आपल्या अंतिम यशासाठी शेवटचा धक्का मारण्याचाच फक्त अवकाश आहे. "

शेवटी १० डिसेंबर रोजी जनरॅलिसिमो चँग-कै-शेकने उत्तर भागातील सेनाधिकाऱ्यांची एक बैठक बोलावली आणि त्यामध्ये कम्युनिस्टांविरुद्धच्या सहाव्या निर्मूलनमोहिमेचा आराखडा त्याने पक्का केला. कान्सू आणि शेन्सी प्रांतातील कोमिन्टांग, मांच्युरियन आणि चँगच्या अधिपत्याखाली इतर सैन्यांना तयार राहण्याच्या आज्ञा गेल्या. सोव्हिएट तळावर एकदम चालून जाण्याच्या आज्ञा एक-दोन दिवसांतच निघतील,असे जाहीर करण्यात आले; तसेच मांच्युरियन सैन्याने या आज्ञा पाळल्या नाहीत तर कोमिन्टांगचे सैन्य त्या सैन्याला ताबडतोब निशस्त्र करील असेही जाहीर झाले.

यंग मार्शलने या आज्ञा पाळल्या नाहीत तर त्याच्या जागी दुसरा सेनापती नेमण्याचीही व्यवस्था करण्यात आली. सैन्याला ज्या दिवशी आगेकूच करण्याचा हुकूम होईल त्या दिवशी जपानविरोधी प्रचारकांना हजारोंच्या संख्येनी अटक करण्याचीही तयारी ठेवण्यात आली.

वातावरण तंग होते. प्रचंड शस्त्रास्त्रे, दारूगोळा, विमाने, चिलखती गाड्या, विमाने आणि सुमारे पाच लाखांचे जय्यत सैन्य सोव्हिएटच्या चारी बाजूंनी हल्ला

करणार होते. चँगने या वेळी कम्युनिस्टांचा निःपात करताना कोणतीही गोष्ट नजरेतून सुटू नये याची दक्षता घेतली होती. आता फक्त जनरॅलिसिमोकडून आज्ञा निघण्याचाच अवकाश.

## डिसेंबर ११ ची लष्करी क्रांती

परंतु ती आज्ञा कधीच निघाली नाही. परिस्थिती जेव्हा अशा पेचप्रसंगात येऊन ठपली तेव्हा यंग मार्शल चँग-हसुये-लियांग याने एक वेगळाच मार्ग स्वीकारला. ११ डिसेंबरच्या रात्री त्याने सियानमध्ये मांच्युरियन सैन्याचे जनरल्स आणि खुद्द शेन्सी प्रांतातील जनरल्स यांची एक गुप्त सभा घेतली. या दोन्ही सैन्यांची संख्या सुमारे १ लाख ७० हजार होती. अन्य सैन्याच्या अनेक तुकड्या सियानच्या आवती भोवती होत्या. या बैठकीमध्ये एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला.

दुसरे दिवशी सकाळी सियान शहराला जाग आली तेव्हा शहरावर अंमल होता यंग मार्शलचा. अत्यंत तडफेने आणि हुशारीने यंग मार्शलने एक छोटीशी क्रांती घडवून आणली होती. बंडखोरांच्या योजनेतील अक्षरही बाहेर पडायच्या आत योजना सफल झाली होती. शहरातील सर्व निळे डगलेवाल्या गुप्त पोलिसांना झोपेतच पकडून त्यांना निःशस्त्र करण्यात आले. चँग-कै-शेकबरोबर नानकिंगहून आलेला अधिकारी एकाच इमारतीत होते त्यांनाही अटक करण्यात आली. सियान विमानतळावर नानकिंगची ५० बाँबर विमाने आणि त्यांचे वैमानिक होते, त्यांना पकडण्यात आले.

स्वतः चँग आपल्या शरीररक्षकांसह सियान शहरापासून दहा मैल दूर लिनटुंग नावाच्या एका सुप्रसिद्ध सौंदर्यस्थळी राहण्यासाठी गेला होता. रात्री बारा वाजता यंग मार्शलने आपल्या स्वतःच्या शरीरक्षकांची एक तुकडी लिनटुंगला पाठवली. जाताना वाटेत त्यांनी २०० मांच्युरियन सैनिकांची एक तुकडी बरोबर घेतली. पहाटे पाच वाजता १० सैनिकांचा एक ट्रक मोठा आवाज करीत चँग ज्या हॉटेलात होता त्या हॉटेलच्या आवारात वेगाने शिरला. केलेल्या इशाऱ्याला दाद न देता ट्रक आत शिरतो आहे, असे पाहताच पहारेकऱ्याने एकदम गोळ्या झाडण्यास सुरुवात केली. लगेच चँगचे शरीररक्षक जागे झाले. काय प्रकार आहे हे कळण्याच्या आतच त्यांना निःशस्त्र करण्यात आले; परंतु तेवढ्या गडबडीत चँग मात्र निसटला.

या छोट्याशा चढाईचे नेतृत्व यंग मार्शलच्या शरीररक्षकांचा कॅप्टन सन याच्याकडे होते. सन चँगच्या खोलीत शिरला तेव्हा चँग अगोदरच पळाला होता. हॉटेलच्या अगदी मागे एक लहान डोंगर होता. चार-पाच माणसे घेऊन सनने चँगला शोधण्यास सुरुवात केली; आणि थोड्याच वेळात अनवाणी पायाने पळत असताना पडल्यामुळे ठिकठिकाणी अंग खरचटले आहे, अंगावर फक्त ढिला नाईट कोट आहे,

नकली दात तोंडात नसल्यामुळे तोंडाचे बोळके झाले आहे आणि थंडीने अंग कुड-कुडते आहे अशा परिस्थितीत एका गुहेसारख्या खोवणीत लपून बसलेला जनरॅलिसमो चँग-कै-शेक त्यांना सापडला.

## चँग-कै-शेकला अटक

चँगला पाहताच सनने प्रथम त्याला नमस्कार केला. चँग एकदम ओरडला, " तू जर माझा मित्र असशील तर अगोदर मला गोळी घालून ठार कर. "

" नाही. आम्ही तुम्हांला मारणार नाही. " सन म्हणाला. जपानविरुद्धच्या मोहिमेत तुम्ही देशाचे नेतृत्व पत्करावे एवढीच आमची मागणी आहे. "

चँग थोडा वेळ तसाच बसून राहिला; मग थोड्या कष्टाने म्हणाला, –

" यंग मार्शल चँगला अगोदर इथे बोलवा. मग मी खाली येईन. "

" यंग मार्शल इथे नाही. गावात जरा गडबड चालू आहे. आम्ही तुमच्या संरक्षणासाठी इथे आलो आहोत. " सन म्हणाला.

त्यावर जनरॅलिसिमो चँगला थोडेसे हायसे वाटल्यासारखे दिसले. त्याने एक घोडा आणायला सांगितले.

" इथे जवळपास कुठे घोडा नाही. पण मी तुम्हांला माझ्या पाठीवरून डोंगराखाली नेईन ", असे म्हणून सन चँगच्या पायाशी वाकून बसला. काही वेळाने कसाबसा चँग सनच्या धिप्पाड पाठीवर बसला. पुढे सन त्याच्या पाठीवर चँग आणि मागून काही सैनिक अशी ती मिरवणूक पर्वतावरून खाली उतरू लागली. पायथ्याशी पोचताच आधीच तिथे येऊन पोचलेल्या मोटारीत चँग आणि सन बसले. मोटर सियानच्या दिशेने निघाली.

सन म्हणाला, " झालं गेलं ते आपण विसरून जावं. यानंतर आता आपण चीनसाठी काही नवं धोरण स्वीकारले पाहिजे. आपण काय करणार आहात ? जपानला प्रतिकार करणे हे आपल्यासमोरचे पहिले काम आहे. उत्तर चीनच्या लोकांचीही खास मागणी आहे. जपानला विरोध करण्याऐवजी कम्युनिस्टांशी लढा असे आपण आम्हांला का सांगता ?–"

चँग ओरडला – " मी चीनचा नेता आहे. चीनचे प्रतिनिधित्व मी करतो. आणि माझे धोरण बरोबर आहे–"

मोटर सियानला पोचल्याबरोबर चँगला यंग मार्शलचा पाहुणा म्हणून ठेवण्यात आले. आणि त्याच्या निवासस्थानाभोवती कडक पहारा ठेवण्यात आला. अखिल चीनचा अधिपती हुकूमशाह जनरॅलिसिमो चँग-कै-शेक हा अटकेत होता.

दुसऱ्या दिवशी जगातल्या सर्व वृत्तपत्रांनी ठळक मथळ्यात बातम्या छापल्या ' चँग-कै-शेकला अटक. ' ' चीनमध्ये लष्करी क्रांती. ' ' चँगचा जीव धोक्यात. '

[ अपूर्ण ]




गज्जनसिंग खून खटल्याच्या निकालाबद्दल सर्वत्र औत्सुक्य फारच ताणलं गेलं होतं. कोर्टात आज निकाल ऐकण्यासाठी तुफान गर्दी झाली होती. इन्स्पे. हझारासिंग मनाच्या विलक्षण अवस्थेत होते. कडक पोलिस बंदोबस्तात आरोपी कर्तारसिंग, करमसिंग, सुखनसिंग आणि मागासिंग आपापल्या भवितव्याबाबत अत्यंत साशंकतेनं बसले होते.

शेवटी डोंगर पोखरून उंदीरच निघाला. चौघा आरोपींपैकी तिघांची पुराव्याअभावी निर्दोषी म्हणून सुटका झाली. एकटचा करमासिंगाला फाशी ठोठावली गेली. कर्तारसिंग 'निर्दोषी' म्हटल्याबरोबर कोर्टात जमलेल्या अनेकांची काळजं पुनः भीतीनं लकाकू लागली. इन्स्पेक्टर हझारासिंगांच्या प्रयत्नांवर पाणी पडलं. त्यांना आणखी एक महत्त्वाची बातमी कळली. ती म्हणजे करमसिंगसुद्धा अपिलात निर्दोषी ठरायची शक्यता आहे. विमनस्क मनःस्थितीत ते कोर्टाच्या बाहेर पडले.......

## ॲड. माधव कानिटकर

**लेखांक : आठवा**

"खबरदार! हा रस्ता फक्त जज्जसाहेबांसाठी आहे," अशा अर्थाच्या लाकडी पाटीकडे पंजाब हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश जी. डी. खोसला यांच्या खास शिपायाने कितव्यांदा

पाहिले कुणास ठाऊक ? पंजाब हायकोर्टाच्या भव्य दगडी इमारतीच्या मागच्या बाजूस अगदी सामसूम होते. हायकोर्टाचे जजेस येण्याची वेळ झाली होती. चांदीचा मुलामा दिलेला मानदंड हातात घेऊन शिपाई आपापल्या साहेबांची वाट पाहत होते. फाशीच्या शिक्षेविरुद्ध अपील दाखल व्हायचे असले म्हणजे 'साहेब' लवकर येतात ही गोष्ट शिपायांना ठाऊक झाली होती...अती मंदगतीने डोलत जाणारी आलिशान मोटारगाडी जज्जसाहेबांसाठी असलेल्या खास रस्त्यावरून सरकत आली आणि मानदंड हातात घेऊन शिपाई धावले. दोन्ही बाजूंनी दोन शिपायांनी सलाम ठोकून अदबीने दरवाजे उघडले आणि हायकोर्ट जज्ज या पदाच्या रुबाबाला शोभेल अशा पद्धतीने दोन व्यक्ती बाहेर पडल्या. शिपाई पुढे चालू लागले. लॉबीमध्ये उभ्या असलेल्या कॉन्स्टेबलसनी खांद्यावरच्या बंदुका खाली करून सलामी दली... Their Lordships Mr. Justice Khosla and Mr. Justice Nirmalsingh !

आणि त्याच वेळी पंजाब हायकोर्टाच्या पुढच्या बाजूस तोबा गर्दी जमली होती ! निर्दोष सुटलेल्या कर्तारसिंगाने जणू करमसिंगाची फाशीची सजा म्हणजे आपलेच मरण अशा अर्थाने त्याच्या बचावाची तयारी चालविली होती. पाण्यासारखा पैसा खर्च करून पंजाब हायकोर्टात जास्तीत जास्त प्रॅक्टिस असलेला नामवंत कायदे-पंडित करमसिंगाच्या अपिलासाठी मुक्रर करण्यात आला होता ! सर्वसामान्य लोकांना नेहमीच असं वाटत असतं की, अपील केलं म्हणजे सगळा खटला पुन्हा चालतो ! कर्तारसिंगाला मात्र ठाऊक होते की, केवळ अपील दाखल केले याला काहीच अर्थ नव्हता ! अपील ॲड्मिट व्हावं लागतं... आणि तेदेखील फक्त कायदेशीर मुद्द्यावरच ! याचाच अर्थ असा की, खालच्या कोर्टाने कायद्याच्या दृष्टीने काही महत्त्वाची चूक केलेली आहे, असं दाखवून दिलं तरच अपील दाखल होईल— फक्त दाखल होईल— फाशीच्या शिक्षेत बदल होईल की नाही, ते नंतर ठरणार होतं ! आणि खालच्या कोर्टाने कायद्याच्या दृष्टीने काहीही चूक केलेली नाही, अशी खात्री हायकोर्टाच्या जजेसची झाली तर ?... तर अपीलच फेटाळले जाईल— शिक्षेत बदल करण्याचा प्रश्नच उपस्थित होणार नाही. करमसिंग फासावर लटकेल ! मनातल्या मनात अस्वस्थ झालेल्या कर्तारसिंगाला आज एकच गोष्ट महत्त्वाची होती ती म्हणजे अपील ॲड्मिट करून घ्यायचे ! 'मोटचा' वकिलांना पुन्हा पुन्हा काकुळतीने सलाम करून कर्तारसिंग पुन्हा पुन्हा सांगत होता, "साहब ! करमसिंगकी जान आपके हाथोंमें है ! पैसेकी फिकीर नहीं करना ! "

करमसिंगाचे अपील चालणार होते ते न्यायमूर्ती खोसला आणि न्यायमूर्ती निर्मलसिंग यांच्यासमोर. फाशीच्या शिक्षेविरुद्ध केलेले अपील हे नेहमीच दोन जजेसपुढे चालते.... आणि मुख्य न्यायाधीश खोसला यांच्या चेंबरमध्ये दोन्ही

न्यायमूर्ती करमसिंगाचे अपील व इतर कागदपत्र यांवरच चर्चा करीत होते. न्याय-मूर्ती निर्मलसिंग यांनी खालच्या कोर्टाचे जज्मेंट काळजीपूर्वक वाचले होते.... आणि याच मुद्यावर त्यांचा मुख्य न्यायाधीश श्री. खोसला यांच्याशी थोडा मतभेद झाला होता. खोसलासाहेब खालच्या कोर्टाचे जज्मेंट फक्त वरवर पाहत असत ! कारण त्यांच्या मते हायकोर्टाचा जज्ज हादेखील शेवटी ' माणूस ' आहे. खालच्या कोर्टाचे कागदपत्र फार चिकित्सा करून वाचले तर आपण एका निश्चित निर्णयापर्यंत आधीच पोचतो. तेच निकालपत्र बरोबर आहे असं वाटतं ! आणि आपल्या मनाची कवाडे बंद करण्याची ताकद हायकोर्ट जज्जलादेखील नसते ! पर्यायाने शेवटी तो आरोपीवर अन्यायच करतो ! आरोपी अपील करतो ते न्यायासाठी !

पण अखेर न्यायमूर्ती निर्मलसिंग हेदेखील हायकोर्ट जज्ज होते ! कायद्याच्या क्षेत्रात विद्वान् आणि तज्ज्ञ होते. त्यांच्याशी मतभेद वाढवणे न्यायमूर्ती खोसला यांना योग्य वाटेना. चर्चा आटोपती घेऊन दोन्ही जजेस इतमामात न्यायासनावर बसले. मात्र बसताना दोघांनाही एक महत्त्वाची गोष्ट ठाऊक होती, की करम-सिंगाने बचावासाठी दिलेल्या वकिलाची योग्यता फार मोठी आहे ! कदाचित पुढच्या एक-दोन वर्षांत तो स्वत:च हायकोर्ट जज्ज म्हणून नेमला जाण्याची शक्यता आहे ! त्याचे भाषण काळजीपूर्वकच ऐकून घ्यायला हवे !

आणि झालेही तसेच ! आपल्या तुफानी वक्तृत्वावर, उत्तम इंग्रजीवर व कायद्याच्या सूक्ष्म-ज्ञानाच्या जोरावर करमसिंगाच्या वकिलांनी त्याच्याविरुद्ध सरकारपक्षाने सादर केलेल्या मजबूत पुराव्याच्या भिंतीला भगदाड पाडले !

सरकारपक्षाची ' केस ' काय आहे, आरोपीचा बचाव काय आहे, याचा फक्त ओझरता उल्लेख करून नंतर लगेच सेशन्स जज्जवरच तडाखेबंद हल्ला चढविला ! " मिलॉर्ड ! आरोपी जो बचाव घेतो तो सिद्ध करून द्यायची जबाबदारी त्याची असते ( Onus ) हे एकदम कबूल ! पण याचा अर्थ सेशन्स जजनी फक्त ऐकत राहायचं आणि निर्णय द्यायचा असा मात्र नव्हे ( He cannot sit with folded hands ! ) न्यायाच्या दृष्टीने कोर्टावरदेखील काही ' कर्तव्ये ' आहेत. आणि ती कर्तव्ये कोर्टाच्या इच्छेवर अवलंबून नाहीत ! ती कर्तव्ये करायलाच पाहिजेत अशी आहेत. आरोपीच्या बचावाला उपयोगी पडेल किंवा नाही हा प्रश्न तूर्त बाजूस ठेवू ! पण स्वत:च्या अखत्यारात ' कोर्ट ' काही साक्षीदार बोलवू शकते ते साक्षीदार आणण्याची जबाबदारी फक्त आरोपीवर टाकून चालणार नाही.— विशेषत: फाशीची शिक्षा देण्याच्या लायकीच्या गुन्ह्याच्या आरोपाची (!) (Alledged Offence ! ) चौकशी करताना तर नाहीच नाही. ८ एप्रिल १९५४ ला करमसिंग कुठे होता ही गोष्ट सगळ्यात चांगल्या तऱ्हेने कोण सांगू शकेल ?— आग्र्याचा मॅजिस्ट्रेट— या मॅजिस्ट्रेटची साक्ष खालच्या कोर्टात झालीच नाही ! का ? कारण सेशन्स जज्ज सगळी जबाबदारी आरोपीवर टाकून मोकळा झाला.

कोर्टाचा साक्षीदार म्हणून मॅजिस्ट्रेटलाच साक्ष देण्यासाठी बोलावण्याचा हुकूम न काढता निकालपत्र देणं— फाशीची शिक्षा ठोठावणं— ही कायद्याच्या दृष्टीने फार गंभीर चूक आहे ! " ...बघता बघता वकीलसाहेबांच्या बोलण्यात उपहास डोकावू लागला— " मिलॉर्ड, आता जे साक्षीदार तपासले गेले त्यांची योग्यता बघू ! खालच्या— म्हणजे मॅजिस्ट्रेच्या कोर्टात क्रॉस करणाऱ्या वकिलाची साक्ष ! जो वकील ५–१० रुपयांसाठी कुणालाही आयडेंटिफाय करतो ! तोच वकील आपली प्रॅक्टिस वाढावी किंवा आपल्यावर बालंट येऊ नये यासाठी पोलिसांच्या बाजूने साक्ष देणारच ! पण ती साक्षदेखील केवळ साक्षीदार वकील आहे म्हणूनच ग्राह्य मानली गेली आणि करमसिंगावर अन्याय झाला ! दुसरी गोष्ट ! ज्या शपथनाम्यावर (Affidavit) करमसिंगाचे अंगठे आहेत, असं तो म्हणतो ते त्याचेच आहेत की नाहीत, याची खात्री पटवण्याचा प्रयत्न झालेला नाही. का झाला नाही ? कारण ते अंगठे त्याचेच आहेत म्हणून ! हस्तरेषा तज्ज्ञांची (Finger-print expert) साक्ष सरकार पक्षाने खुनासारख्या महत्त्वाच्या केसमध्ये का काढली नाही, याचा काळजीपूर्वक विचार झाला पाहिजे. मिलॉर्ड ! ही साक्ष सरकारपक्ष फडतूस गुन्ह्यांसाठीदेखील काढते, ही गोष्ट विसरून चालणार नाही. मग एक्सपर्टची साक्ष का काढली नाही ? कारण, मग असं सिद्ध झालं असतं की, त्या शपथनाम्यावरचे अंगठे करमसिंगाचेच आहेत ! असं सिद्ध झालं असतं की ८ एप्रिल १९५४ ला करमसिंग आग्र्यालाच होता ! सिंघावाला खेड्यात नव्हता ! आणखी एक कायदेशीर मुद्दा सांगतो मिलॉर्ड ! की ज्या स्टँपपेपरवर करमसिंगाने ॲफिडेव्हिट केले तो स्टँपपेपर करमसिंगाने स्वतः आग्र्यापासूनच जवळ असलेल्या हथरस या गावी विकत घेतलेला आहे. स्टँपव्हेंडरचे तसे सर्टिफिकेट त्या स्टँपपेपरवर आहे. त्या स्टँपव्हेंडरची साक्ष खालच्या कोर्टात का झाली नाही ? कशी होईल ? कारण या गोष्टी आरोपीच्या ज्ञानाच्या— कायद्याच्या ज्ञानाच्या— पलीकडे होत्या ! सेशन्स-जज्ज निःपक्षपातीपणाने बसले असते तर त्यांचे कर्तव्य त्यांनी चोख केले असते. माझी खात्री आहे मिलॉर्ड ! की, खालच्या कोर्टात ज्यांना जाणून बुजून तपासले गेले नाही, असे मी सांगितलेले तीन आणि आणखी सांगेन ते इतर साक्षीदार जर का ह्या नामदार हायकोर्टाने तपासले– आणि तसा खास अधिकार ह्या कोर्टाला आहे– तर मिलॉर्ड झालेला अन्याय अजूनही दूर होऊ शकेल ! कारण त्यामुळे एक गोष्ट सिद्ध होईल की ८ एप्रिल १९५४ या दिवशी आरोपी करमसिंग सिंघावाला खेड्यात नव्हता तर तो आग्र्याला होता ! सिंघावाला खेड्यात गज्जनसिंग आणि हरजितसिंगाचे खून पाडणारा 'तो' करमसिंग 'हा' नव्हे. हा करमसिंग उगाच मृत्यूच्या दरवाजात आणला गेलेला आहे. आरोपीला दोषी ठरवत असताना जेवढी काळजी सेशन्स जज्जनी घ्यायला पाहिजे होती तेवढी त्यांनी घेतलेली नाही ! ८ एप्रिल १९५४ ला संध्याकाळी आरोपी करमसिंग हा आग्र्याला असेल, असा

संशय येण्याइतपत पुरावा जरी या कोर्टापुढे आला तरीदेखील त्याचा फायदा करमसिंगाला मिळालाच पाहिजे – That's all Milord ! "

अपील ऐकणाऱ्या दोन्ही न्यायमूर्तींची खात्री पटली की करमसिंगाच्या वकिलाच्या भाषणात तथ्य आहे ! अपिलात महत्त्वाचा मुद्दा एकच आहे की ८ एप्रिल १९५४ ला संध्याकाळी आरोपी करमसिंग सिंघावाला खेड्यात होता, की तिथून ४०० मैल लांब असलेल्या आग्र्यात होता ? ... आपल्या खास अधिकारांचा उपयोग करून दोन्ही न्यायमूर्तींनी करमसिंगाच्या वकिलांनी सांगितलेल्या व्यक्तींना हायकोर्टात हजर राहून साक्ष देण्यासाठी समन्स काढले व त्या दिवशीचे कामकाज संपले ... करमसिंगाचे नशीब जोरावर म्हणूनच अपील ॲड्मिट झाले ! घामाने भिजून गेलेल्या बचावाच्या वकिलाला कोर्टाच्या लॉबीत कर्तारसिंगाने अक्षरशः मिठी मारली ! आणि इन्स्पेक्टर हझारासिंगांचा चेहरा काळाठिक्कर झाला ! करमसिंग संशयाचा फायदा घेऊन निर्दोष सुटला तर ? ... तर त्यांनी दाखल केलेल्या खुनासारख्या महत्त्वाच्या केसमधले सर्व आरोपी निर्दोष सुटणार होते. ... त्यांचे सगळे कष्ट फुकट जाणार होते ... कीर्ती धुळीला मिळणार होती ... आणि मुख्य म्हणजे एका हुशार पोलीस अधिकाऱ्यापेक्षा कर्तारसिंगासारखा गुन्हेगार अधिक बुद्धिमान ठरणार होता ! हायकोर्टाच्या शिक्क्यांनी ! कारण, या खटल्यात काम करमसिंगाचे होते, पण डोके कर्तारसिंगाचे होते ! कर्तारसिंग खालच्या कोर्टात निर्दोष सुटला आणि करमसिंग अपिलात सुटण्याची शक्यता निर्माण झाली होती !

नव्याने बोलावण्यात आलेल्या साक्षिदारांच्या साक्षीनंतर व त्यांच्या उलट तपासणीनंतर न्यायमूर्ती खोसला यांनी सत्य शोधून काढले होते. गज्जनसिंग व हरजितसिंगाचा ८ एप्रिल १९५४ ला खून करणे हा कर्तारसिंग व करमसिंग यांचा कटच होता !

६ एप्रिल १९५४ ला मोघाहून आग्र्याला जाण्यासाठी म्हणून निघालेले कर्तारसिंग आणि करमसिंग प्रथम आग्र्याजवळच्या हथरस या गावी ७ एप्रिलला उतरले ! कारण, ज्या पेपरवर करमसिंगाचे ॲफिडेव्हिट झाले तो स्टँपपेपर स्टँपव्हेंडरने करममसिंगाला ७ एप्रिललाच विकला आहे, असं त्या पेपरवरच्या तारखेवरून सिद्ध होत आहे. ॲफिडेव्हिटसाठी स्टँपपेपर आग्र्यालादेखील मिळू शकला असता ! मग तो आरोपींनी हथरस या लहानशा गावी का घेतला असावा ? बचावासाठी साक्षीदार मिळावा म्हणून ! मात्र या गडबडीत स्टँपव्हेंडरने स्टँप विकल्याची तारीख मात्र खरी टाकली ७ एप्रिल १९५४ ! ज्या ॲफिडेव्हिटवर भर टाकून करमसिंग बचाव करू पाहत आहे ते ॲफिडेव्हिट फक्त एका वाक्याचे आहे ! " मी करमसिंग शपथपूर्वक सांगतो की, मी पूर्वी कधीही व कुठेही ड्रायव्हिंग लायसेन्ससाठी अर्ज केलेला नाहीं व माझ्याकडे मोटर ड्रायव्हिंगचे लायसेन्स

नाही ! " ॲफिडेव्हिट वकिलांनी केलेले नाही. ते R. T. O. स्टँडर्ड ॲफिडेव्हिट-प्रमाणेदेखील नाही ! वकिलांची मदत फक्त ओळख पटवण्यापुरती पर्यायाने आणखी एक बचावाचा साक्षीदार तयार करण्यापुरती ! त्या ॲफिडेव्हिटवर अंगठे उठवून करमसिंगाने ते ॲफिडेव्हिट त्याच दिवशी म्हणजे ७ एप्रिल १९५४ ला कर्तारसिंगाकडे दिले व तो ताबडतोब ' कामगिरी 'साठी सिंघावाला खेड्याकडे वळला. ' ते ' ॲफिडेव्हिट घेऊन कर्तारसिंग आग्र्याला गेला व तिथे करमसिंगाला वाचवण्याच्या हेतूने त्यांनी जाणून बुजून खून होण्याच्याच वेळेला संध्याकाळी ५ वाजता मॅजिस्ट्रेट श्री. शर्मा यांच्यापुढे ॲफिडेव्हिट केले. मॅजिस्ट्रेट श्री. शर्मा आपल्या साक्षीत सांगतात की, त्या ॲफिडेव्हिटवरचे अंगठे माझ्यासमोर झालेले नाहीत. फक्त हे अंगठे माझेच आहेत असं पिंजऱ्यात उभ्या असलेल्या शिखानं कबूल केलं आणि म्हणून मी सही–शिक्का दिला." याचाच अर्थ असा की, त्या ॲफिडेव्हिटवर अंगठे होते ते करमसिंगाचे; पण करमसिंग म्हणून मॅजिस्ट्रेटपुढे उभा होता तो मात्र कर्तारसिंग ! नंतर स्वतःचा बचाव व्हावा म्हणूनच कर्तारसिंगाने आपली बंदूक ' दुरुस्तीला ' टाकली आणि ती फक्त ८ एप्रिलचा सबंध दिवस ! ८ तारखेला बंदूक दुरुस्तीला टाकून स्वतःला अटक करवून घेतली यामुळे कर्तारसिंगाचा स्वतःचा बचाव मात्र पूर्ण झाला (Perfect Alibi) मात्र कर्तारसिंगाने केलेली कृत्ये ही खुनाला मदत करणारी नसून खून घडल्यास करमसिंगाच्या बचावासाठी केली गेलेली आहेत. करमसिंग काही कारणांमुळे खून करू शकला नसता तर कर्तारसिंगाचे कुठलेही कृत्य गुन्ह्याला किंवा बचावाला मदत करणारेदेखील ठरले नसते. सेशन्स जज्जनी कर्तारसिंगाची निर्दोष मुक्तता केली ती कायद्याच्या दृष्टीने योग्य आहे व अयोग्य असली तरी त्यावर आता विचार करता येणार नाही; कारण त्याला निर्दोषी म्हणून जाहीर करणाऱ्या निकालपत्राविरुद्ध सरकारने अपील केलेले नाही ! आपल्याला विचार करायचा आहे तो फक्त करमसिंगाच्याच अपिलाचा. करमसिंगाचा बचाव मात्र त्याला अपुरा ठरला आहे (Imperfect Alibi) कारण कागदपत्रांवरून असं दिसतं की, करमसिंगाने लायसेन्सबद्दल ॲफिडेव्हिट करण्याचा कितीही बहाणा केला असला तरी त्याने ड्रायव्हिंग लायसेन्ससाठी रीतसर अर्ज केलेला नाही ! आधी अर्ज की आधी ॲफिडेव्हिट ? करमसिंगाने ॲफिडेव्हिटवर अंगठे केले ते खोटा बचाव घेता यावा म्हणूनच. सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ८ एप्रिल १९५४ ला आपण दुपारपर्यंत का होईना– पण सिंघावाला खेड्यातच होतो ही गोष्ट त्याने स्वतः कबूल केलेली आहे. आणि ही गोष्ट पोलिसांनी मारहाण केल्यामुळे आपण कबूल केलेली आहे, असं तो स्वतःदेखील म्हणत नाही. करमसिंगाचा अपुरा बचावच त्याला संपूर्ण दोषी ठरवण्यास पुरेसा आहे. या खालच्या कोर्टाच्या मताशी हायकोर्ट सहमत झाले आणि पंजाब हायकोर्टाचे न्यायनिष्ठुर न्यायाधीश जस्टिस खोसला यांनी करमसिंगाची फाशीची शिक्षा अपिलात कायम केल्याचे निकालपत्र

दिले. पुढे नंग्या संगीनी लावलेल्या बंदुका खांद्यावर टाकून कॉन्स्टेबल्सनी करमसिंगाला उभा केला! आणि ... करमसिंग ... कर्तारसिंग एकमेकांकडे दीनवाणेपणाने पाहत राहिले. दोघांनाही एकमेकांशी खूप बोलायचं होतं.... पण आता बोलण्यात काही अर्थ नव्हता. आपण आता काही दिवसांचेच सोबती आहोत, याची जाणीव झालेल्या करमसिंगाने 'आम्ही जातो आमुच्या गावा' अशा अर्थाने केविलवाण्या नजरेने कर्तारसिंगाकडे शेवटचे पाहून घेतले आणि निराशेने त्याने इतका वेळ दाबून धरलेल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली. आणि मग मात्र कर्तारसिंगाला राहवेना. कोर्टाच्या व्हरांड्यातून दूर नेला जात असलेल्या करमसिंगाकडे पाहून त्याने अक्षरश: हंबरडा फोडला.

आणि त्याच वेळी मोघा पोलिस स्टेशनच्या दिशेने वेगाने जाणाऱ्या जीपमध्ये बसलेला एक पोलिस अधिकारी आपल्या मिशांना पीळ भरीत होता. त्याच्या छातीवर लटकणारी पदके नेहमीपेक्षा १-१।। इंच पुढे आल्यासारखी वाटत होती!

## समाप्त

### निवडणुकीतील गंमत

विधानसभेसाठी उभ्या असलेल्या जयपूरच्या एका उमेदवाराला एका बाईनं म्हटलं, "पाहा माझ्या पायात चपलाही नाहीत!"

उमेदवाराने लगेच आपल्या एजंटाला फर्मावलं, "अरे, बाईंना एक जोड आणून दे."

पण बाई म्हणाली, "एकानं काय होणार! सहा जोड हवेत!"

उमेदवार आश्चर्यानं म्हणाला, "कशाला!"

बाई तत्काळ उत्तरली, "त्यांचा हार बनवून मी तुमच्या गळ्यात घालू इच्छिते!"

—च्-च्! त्या वेळचा त्या उमेदवाराचा चेहरा टिपायला त्या वेळी आसपास कोणी फोटोग्राफरच नव्हता!

□

माणूस प्रतिष्ठान

मुक्काम सुपे



प्रा. आनंद यादव

# माती आणि

डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात सहज 'माणूस'च्या संपादकांना भेटलो. बोलता बोलता ते म्हणाले, "सुप्याला विहिरीचे काम सुरू झाले." ऐकून थक्कच झालो. कारण कधीतरी गेल्या वर्षी ह्या संपादकांनी संकल्प सोडला होता, "विक्री झालेल्या 'माणूस'च्या दर अंकामागे चाळीस पैशांतीलच एक पैसा 'माणूस प्रतिष्ठान'साठी वेगळा टाकून, त्यातूनच महाराष्ट्रातल्या मागासलेल्या एखाद्या लहानशा भागासाठी अन्न-धान्य वाढीला उपयुक्त ठरणारी पाणी-पुरवठ्याची (विहिरी, तळी, एखादा छोटासा तलाव इ.) काही कामे पुरी करावयाची." त्या वेळी हा संकल्प वाचून आणि क्षणभर मिस्किल हसून, पान उलटून मी पुढे गेलो होतो.

कारण असले अनेक संकल्प, भावी योजना, व्याख्याने आणि आश्वासने भरघोस शब्दांनी देण्यापलीकडे आजच्या लोकशाहीच्या युगात काही घडत नाही, याची जाणीव पदोपदी होत होती. सभा-संमेलनांतील ठराव, मासिके, विशेषांक आणि रोजची वर्तमानपत्रे अशा प्रकारच्या गोष्टींनी भरून गेलेली असतात. ती पुरी करण्याच्या फंदात कोणी पडायचं नसतं आणि त्यासंबंधी प्रतिविचारणा करण्याच्याही भानगडीत कोणी पडायचं नाही, असे नेत्यांचे ठरून गेलेले आहे आणि जनतेच्याही चांगले परिचयाचे झाले आहे. कारण सगळाच मामला जाहिरातबाजीचा, वेळकाढूपणाचा, पोटात शिरून धंदा आणि निवडणुका साधण्याचा असतो, हे आता सगळ्यांच्याच लक्षात आल्याने अंगवळणी पडलेले आहे...'माणूस'च्या संपादकांनीही



# माणूस

असा काहीतरी खप वाढविण्याच्या दृष्टीने इतर संपादक संकल्प सोडतात तसा हा प्रकार केला असावा असे वाटले होते.

पण ' विहिरीचे काम सुरू झाले, ' हे ऐकून थक्कच झालो; कारण इतक्या झट-पट योजना अंमलातही येत होती. संपादकांनी वापरलेल्या ' सामाजिक कार्य, ' ह्या शब्दांना काहीतरी विलक्षण अर्थ आला होता. वजन आले होते—चार भाषणे, चार आश्वासने, चार सरकारी खात्यांत ओळखी-पाळखी काढून कर्ज-तगाई, फुकटात मिळणारी मदत मिळवून देणे याच्यापेक्षा वेगळा आणि भरीव अर्थ ' सामाजिक कार्य ' या शब्दांना आल्याची जाणीव झाली. ते काम पाहण्याची उत्सुकता माझ्या मनात अनावर झाली.

जानेवारीच्या एक-दोन तारखेला ' माणूस 'च्या संपादकांनी सुप्याला एक घर-गुती सहल काढली. घरची मंडळी होती. काही विद्यार्थी आणि विद्यार्थिनी, वि. ग. कानिटकर, रंगा मराठे, मी असे थोडकेच लोक होते. जाताना साहित्यिक गप्पा-गोष्टी, पत्ते, टाळ्या—नेहमीप्रमाणे सुरू होते. विशेष उत्साह वाटत नव्हता. कारण मंडळी थोडीच. सहलीचा अपेक्षित रंग भरत नव्हता.

रस्त्यावरचे सरकारी हिसके खात खात गाडी जाऊन पोचली. उपरेपणाच्या तटस्थ भूमिकेनेच मी गावात उतरलो. दुष्काळात किंवा सीमेवरील रण—धुमाळीत खाली केलेल्या गावाप्रमाणे सुपे दिसले...इतिहासप्रसिद्ध गाव. दादोजी कोंडदेवाचा

ह्या गावाशी संबंध. तरीसुद्धा असे एकाकी. दूरच्या भूतकाळासारखे ओसाडपणाने उभे राहिलेले. कोलमडलेले जुने उदास वाडे...स्वातंत्र्यानंतरच्या काळातले सुधारणांचे कोणतेच स्पर्श अजूनही तिथे उमटलेले दिसत नव्हते...मला विषण्ण वाटले. शहरात राहणाऱ्या आम्हा छानछोकिनांना खेड्यात आलं की, असंच वाटतं. कारण तिथे आम्हांला सिनेमाची थिएटरं दिसत नाहीत, बागा दिसत नाहीत. रंगीत रंगीत किराणामालांची, सौंदर्यप्रसाधनांची दुकानं, तशाच स्त्रिया, व्हरायटीचे वैभवशाली क्लॉथ सेंटर्स, रंगदार जाहिराती आणि बोर्डस्, तूप सांडले तरी पुसून घ्यावे, असे डांबरी गुळगुळीत रस्ते, त्यांच्यावरची झकपक माणसे मनासमोरून गेली आणि अशा ओसाड गावात फोंड्या माळरानावर एका बाजूला आलं की काहीतरीच वाटायला लागतं. म्हणूनच शहरांची ओढ. आमच्या ट्रिप्ससुद्धा महाबळेश्वर, गोवा, काश्मीर, ताजमहाल इकडे धावत असतात.

## ढासळलेले बुरूज !

मन सुप्यात आल्यावर फाटून गेलं. सगळं गावच ढासळलेलं...माणसांकडं पाहिलं तर तीही दारिद्र्य, अज्ञान, कष्ट, निराशा आणि पावसावरचा अविश्वास यांनी ढासळलेली. ती घरं नि ती माणसं बघताना गलबलून आलं...पण काय करणार ? अशाच खेड्यापाड्यांनी भरलेला भारत. तशात महाराष्ट्र तर दगडाधोंड्यांचा खड-काळ प्रदेश. ह्याच खेड्यापाड्यांतून आपली जनता पसरलेली, येईल त्याला तोंड देत, मातीत राबत मातीत मिळून जाणारी...अशा खेड्यांतलं एक खेडं ' माणूस ' च्या संपादकांनी ' कार्या ' साठी निवडलं....विहीर खणायची. पाणी फोडून वरती आणायचं, हे त्यांचं स्वप्न. शहरात राहणाऱ्या संपादकांना (त्यांचा वाचकवर्ग वेगळा असतानाही) हे कसं सुचलं कुणास ठाऊक ?...असं घडतं कधी कधी विपरीत. अमरावती-नागपूरकडंही असंच काहीतरी प्रचंड प्रमाणात बाबा आमटे अघटित करून दाखवीत आहेत. प्रामाणिक तळमळीने, काहीही गवगवा न करता, तोंड बंद करून ' हातांनी कार्य ' केलं जात आहे.

त्याच दिवशी म्हणजे रविवारी विहिरीची जागा पाहिली. एका बाजूला दगड-धोंड्यांचा आणि मातीचा रचलेला प्रचंड ढीग. आणि आजवर त्या ढिगाखाली दडपलं गेलेलं नम्र जिवंत पाणी विहिरीत प्रसन्नपणानं आशीर्वाद देत वाहलेलं. पाहता पाहता त्याच्या थंडाव्यानं माझे डोळे निवले. प्रवासाचा शीण गेला.

आसपास उगीचच नजर भिरभिरली. सभोवार बऱ्याच अंतरावर झाड नाही, सगळी रानं ओसाड; उन्हात होरपळत, अंगाची धूळधूळ करून घेत पडलेली. जमीनही फारशी कसदार नाही. त्या सुप्यात भरलेल्या उदास-ओसाड दारिद्र्यासारखीच. बोलता बोलता सहज विहिरीच्या आसपासच्या शेतकऱ्यांची चौकशी केली. बरेचजण दोन-अडीच एकराच्या तांबूळ मातीच्या तुकड्यावरच नशीब फोडत

बसलेले. अंगांवर घामाचे थरच्या थर साचलेले. जन्मभर ते साचत होते. आणि सूर्याचे प्रखर किरण त्यांना काळेपणात घडवून घडवून कठीण करत होते...मातीत विरघळून गेलेलं त्यांचं मन आता ही विहीर हिरवं करील. त्याच्यावर फुलं येतील. कणसं येतील, मोती येतील. रेडिओच्या सुरेख-बायकी चालीच्या समूह-गीतांतील प्रचारी ' मोत्याच्या कणसांपेक्षा ' ती कणसं, ते मोती वेगळे आणि अस्सल असतील. हेच ' माणूस फौंडेशन'चे श्रेय.

## क्रियाशील ध्येयाच्या शोधात !

हे विपरीत पाहता पाहता आणखी एक विपरीत हाताशी लागले...सोन्याजवळच हिऱ्याची खाण सापडली. तिथे गेल्यापासूनच आसपास दहा-बारा शहरी विद्यार्थी–विद्यार्थिनींची गडबड चाललेली होती. गोंडस, उमद्या चेहऱ्यांचे तरुण विद्यार्थी. पँट्स्, बुशशर्टस्, चष्मे असलेले...आसपास काहीतरी बोलत, बडबडत होते. मी चौकशी केली. ' यूथ ऑर्गनायझेशन चे सभासद–विद्यार्थी आहेत. श्रमदानाला आले आहेत, ' असे कळले. मला काही ते फारसे गंभीरपणाने घ्यावे असे वाटले नाही. कारण ' विद्यार्थ्यांचे श्रमदान ' हा प्रकार मला मी विद्यार्थी असल्यापासून ठाऊक आहे. आता तर महाविद्यालयात शिकविण्याचे काम करीत असल्याने चांगलाच परिचयाचा झाला आहे. रात्री ह्या विद्यार्थ्यांनी गावकऱ्यांची करमणूक केली. गाणी, नकला, नाट्य, निरनिराळे बैठे खेळ यांचा करमणुकीत समावेश होता. हे काही त्या विद्यार्थ्यांच्या सिनेमा–नाटकादिकांपासून होणाऱ्या संस्कारसंपन्नतेपासून भिन्न नव्हते. करमणुकीसारख्या ' सांस्कृतिक ' कार्यक्रमात आम्हीही भाग घेतला. वि. ग. कानिटकर, सौ. निर्मला पुरंदरे, त्यांची कन्या, गावातील काही हौशी गायक स्त्री–पुरुष यांनीही भाग घेतला. असल्या कार्यक्रमात भाग घेऊन समाजसेवा करताही येते. आपल्यासारख्या विचारवंत, बुद्धीवाद्यांच्या धोरणात ते चटकन बसतेही.

करमणुकीचा कार्यक्रम झाल्यानंतर आम्ही सगळेजण त्या विद्यार्थ्यांसह गप्पा मारत पहाटे पाच वाजेपर्यंत बसलो. तेव्हा कळले की हेही काही विपरीतच आहे. हे विद्यार्थी स्वच्छ कपड्यांना धक्का न लावता श्रमदान आणि पाच मिनिटे खेड्याशी संपर्क, अशा सवंग कल्पनेने इथे आलेले नाहीत...आठ-दहा दिवस ते सतत घाम गाळून विहीर फोडत आहेत. त्यांच्या मनात काही तरी क्रियाशील ध्येय आणि आकांक्षा आहेत. बुद्धिभेदात गुरफटलेल्या राजकीय तत्त्वज्ञानातून त्यांना पुढे जाऊन पक्षाच्या रंगाने रंगलेला शब्दाळ विजय मिळवावयाचा नाही. कसलीही सत्ताकांक्षा नाही. केवळ मनाच्या समाधानासाठी आणि काहीतरी विधायक करण्यासाठी ते आलेले आहेत. कागदी तत्त्वज्ञानाला मिठ्या मारून त्यांना वाद घालावयाचा नाही, तर काहीतरी स्वत: होऊन घडवायचे आहे. फौजदारी न करता स्वत: कामगार होऊन मनासारखे उभे करावयाचे आहे.

याचा प्रत्यय मला सकाळी साक्षात्काराच्या स्वरूपात झाला. सकाळी नऊ-सव्वा-नऊलाच विहिरीचे काम सुरू झाले. वायफळ शब्दाशब्दी नको म्हणून रात्री अर्ध्यातूनच गप्पातून उठून गेलेला सरळ स्वभावाचा पेठे चाप.च्या तिठ्यावर उभा राहून कसलेल्या कामगाराच्या कौशल्याने झराझर पाट्या झेलत होता. संघटक सप्तर्षी सरावलेल्या वड्डाच्या दणकट हातांनी घण घालून सुरुंगांचे दगड चिबबून पाट्यात भरत होता. डॉक्टर झालेली एरवी सैल अंगाची वाटणारी मुलगी हसतमुखाने भरलेल्या पाट्या अंगावर घेऊन घामाने थबथबत शेजाऱ्याला देत होती, तर एरवी नाजूक दिसणारी दुसरी एल्‌एल्. बी. चा अभ्यास करणारी मुलगी त्या सकाळी लालेलाल होत विजलीच्या गतीने बेमान होऊन मोकळ्या पाट्या झेलत होती. पाहत राहावं असं दृश्य...या सर्वांनाच श्रम-समाधी लागलेली नि त्यांच्या अंगांगांवर घामाची फुले फुलत चाललेली...मला उभे राहण्याची लाज वाटली, म्हणून केव्हा त्या कामात जाऊन मिसळलो ते कळलेच नाही. सौ. निर्मला पुरंदरे, त्यांची कन्या, स्वत: संपादक आणि त्यांच्या पत्नी, अरुण साधू, गणपत्ये, रंगा मराठे, वि. ग. कानिटकर हेही त्या समाधिसुखाशी झोंबत होते.

या श्रमानंतर वाटेवरच्या विहिरीत आंघोळी केल्या. जवळच्याच शेतात शेतकऱ्यांनी मोठ्या आनंदाने दिलेला हुरडा खाल्ला...श्रमानंतरची आंघोळ आणि हुरडा यांची चव त्या मोकळ्या हिरव्या हवेत मोठी रुचकर होती.

दुपारी झालेलं सामुदायिक जेवण साधं होतं. पोटात श्रमानंतरची भूक होती; म्हणून जेवण सपाटून झालं. त्याचाही गोडवा वेगळाच...साधं जेवण असूनही खेड्यातला शेतकरी दणकट आणि तगडा कसा राहू शकतो आणि सुग्रास अन्न खाऊनही आपली पोटं शहरात का बिघडतात याचं रहस्य कळलं. सुप्याच्या महिला-मंडळातील सौ. भाभी भंडारी (रतनलाल भंडारींच्या मातोश्री) यांनी आणि त्यांच्या साथीदारिणींनी जेवणा-पाण्याची, बसण्या-उठण्याची सोय मुलांच्या शाळेत उत्कृष्ट केली होती...जेवता जेवता आणखी एक गंमत कळली. एरवी जुने-पाने दिसणारे सुपे मनाने मोठे श्रीमंत आहे हे जाणवलं. गावातील लोकांनी आपण होऊन आपल्या अर्ध्या भाकरीतला घान्याचा मूठ-पसा विहीरवाल्या लोकांसाठी देऊ केला होता. सायकलीच्या दुकानवाल्यांनी सायकली कामासाठी कमी भाड्यात पुरविल्या होत्या. गिरणीवाल्याने दळणाचे पैसे घेतले नव्हते. उत्स्फूर्त...गावातील लोकांसाठी बाहेरून आलेले लोक काही खरोखरच 'सामाजिक कार्य' करतात असं कळल्यावर कुठल्याही मनुष्याला मदतीची भावना होणे साहजिकच आहे.

## तेच हे ! हेच ते !

त्याच दिवशी म्हणजे सोमवारी दुपारी जेवण करून आम्ही तेथे श्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांसह पुण्यास यायला निघालो. गाडीतल्या गर्दीला पुन्हा सहलीचे स्वरूप आले. विद्यार्थी-विद्यार्थिनी पुन्हा आपल्या रंगात दंग होऊन गेल्या. गाणी-गप्पा,

चेष्टा-मस्करी, भेंड्या-विनोद सगळे सुरू झाले. ते सगळं तटस्थपणानं पाहताना नकळत येणाऱ्या विचारांनी मी भारून चाललो होतो...बेसूर आवाजात असह्य गाणं म्हणणारा विद्यार्थीही हाच आणि गंभीरपणाने नांदेड, मळवलीसारख्या ठिकाणी जाऊन गावकऱ्यांची प्रत्येक रविवारी डॉक्टर म्हणून मोफत सेवा करणारा विद्यार्थीही हाच. भलरी गीत म्हणणारी आणि मिस्किलपणाने टिंगल-टवाळी करणारी हसरी विद्यार्थिनी हीच आणि मनासमोर काहीतरी आगळे ध्येय ठेवून एल्एल्. बी. चा जबाबदारीने अभ्यास करणारी मुलगीही हीच. भेंड्यांसारख्या बाल-खेळात सूर लावून सिनेमातली गाणी म्हणणारी मुलगीही हीच आणि मुलांच्या शाळांतून मुलांना स्वयंस्फूर्तीने अवघड विषय सोपे करून सांगणारी कॉलेजगर्लही हीच. विचारांची नि कार्याची स्वप्न-भरारी मारू पाहणारा विद्यार्थीही हाच आणि चेष्टा–मस्करीत रंगणारा तरुणही हाच...सगळा सुरेख संगम झाला होता. उपरा संकोच नव्हता. तारुण्याचा उपभोग घेण्यातही ते दंग होते आणि तरुण रक्ताला मिळालेलं आव्हानही त्यांनी स्वीकारलं होतं. कॉलेजविद्यार्थ्यांचं रंगेल जीवनही ते जगत होते आणि डॉक्टर-इंजिनिअर, वकील–आर्किटेक्चर होण्यासाठी लागणारे रंगेल ध्येयही त्यांच्यांत होतं...खंत एवढीच वाटत होती की या सर्वांना गुरुस्थानी असणारा एकही प्राध्यापक सुटी असूनसुद्धा यांच्यात नव्हता. दुसरी एक दुर्दैवाची गोष्ट म्हणजे आर्टस्चे विद्यार्थी ह्यात दिसत नव्हते. होती तीही फक्त एक विद्यार्थिनी. अभ्यासाचा सदैव ताण असणारे हे मेडिकल, इंजिनिअरिंग, सायन्स, कॉमर्स, पॉलिटेक्निकचेच विद्यार्थी सगळे आलेले आहेत. आणि त्या मानाने काहीही ताण नसलेले आर्टस्चे विद्यार्थी मात्र दिसत नाहीत. आळशी, सैल, भुसभुशीत आणि छानछोकी जीवनाला चटावलेला ध्येयशून्य विद्यार्थी तर आज बहुसंख्येने आर्टस्कडे येत नसेल ना, असा प्रश्न मनाला कडकडून डसून गेला.

'माणूस'सारखं तशी फारशी परंपरा नसलेलं एकुलतं एक साप्ताहिक, पाच–सात वर्षांतच कुठलाही पक्षीय, राजकीय अगर वर्तमानपत्री प्रचार न करता असल्या घटना घडवू शकतं. असलं कार्य करणारं चिमुकलं साप्ताहिक कुठं आणि प्रचंड इमारती उठवून तरीही 'सर्क्युलेशन' वाढविण्यासाठी प्रतिष्ठा आणि दर्जा सोडून वाहवत जाणारी, पोलादी पायांवरची साखळी-मासिकं आणि पत्रकं कुठं ? आणि या सर्वांच्यामध्ये केवळ टेक्स्टबुकं शिकविण्यात आणि व्याख्यानं देण्यात केवळ पोटासाठी तक्रारी आणि नोकरी करण्यात गुंतलेला तरुण प्राध्यापक कुठं ? ह्या सर्वांत ह्या प्राध्यापकाला काही करता येईल का ? प्रश्नांनी मी अस्वस्थ झालो. पण समोरचे विद्यार्थी धुंदपणाने टाळ्यांच्या तालावर गात होते. गाडी त्यांचा तो झपाटलेला आनंद आणि आमचं ओझं घेऊन पुण्याकडे धावत होती. ●

[ या विषयासंबंधी काही अधिक–पुढील अंकी ]

*सुप्याच्या श्रमशिबिरातील 'त्या' रात्रभरच्या गप्पांत हा शांतिसैनिक पीटरही रंगला होता. सर्वांनी खूपच छेडले. त्याला पण रागावला नाही बेटा ! खूप मनमिळाऊ आहे ही स्वारी ! पुण्यात बरेच मित्रमैत्रिणी जोडले आहेत याने; पुणं फार आवडलं, असंही म्हणतो ! आश्चर्यच आहे ! आता कामगिरी संपवून मायदेशी परत निघाला आहे. जाण्यापूर्वी आपल्या कामाची, आपल्या तोडक्या मराठीत, मोडक्या हस्ताक्षरांत त्यानेच करून दिलेली ही ओळख...*


# पीटर हुक

आमच्या अमेरिकन शांतिसेनेचा स्वयंसेवक जीन मायर ऊर्फ संभाजी महाराज घाईत होता. अंबवडचाला चालला होता. पण एस्. टी. भोरहुन उशिरा निघाली. एस्. टी. तून उतरल्या उतरल्या जीनराव झुलता पूल ओलांडत होता. तो एक नवीन खादी धोतर नेसला होता. त्याचा पांढरेपणा सकाळच्या उजेडात चमकत होता. त्याच्या अंगावर एक लखनवी झब्बा आणि डोक्यावर निळा फटा. एका श्रीमंत शेतकऱ्याच्या अशा अवतारात जीनराव अंबवडचाला आला होता. पण हा शेतकरी कुठल्या जातीचा, कुठल्या धर्माचा होता हे कळायला मार्ग नव्हता. जीनच्या गळयात एक ख्रिस्ती क्रॉस होता. पण तो कुणाला दिसत नव्हता. त्याच्या मुस्लिम मित्रांसाठी जीनने एक चांगली राठ दाढी वाढवली होती. आणि हिंदू मित्रांसाठी एक शेंडी.

वाटेत जीनच्या ओळखीचे काहीजण भेटले. "काय जीनराव ! कसे काय ? बरे हाय का ?"

"काय राव, जेवण झालंय का ?"

"लय दिवसांनी भेटतोय जीन राव ?" प्रत्युत्तराने किंवा नुसत्या स्मिताने जीनने त्यांना प्रेमळपणे वाटेला लावले. तलावापलिकडील टेकडी चढून तो बाळूराव भोसल्यांच्या अंगणात शिरला. शेतकरी बाळूराव त्यांच्या बैलाला धाण्यास जुंपत होता. बैलांच्या गळयातली नवीन घुंगरं वाजत होती. जीनने पटकन् विचारले,



# हे तरुण कां आले ?

" काय आणले बाळूराव ? केवढयाला मिळाले ?"

" ही घुंगरं आहेत जीनराव. पंचवीस रुपयांना आणली आहेत."

" २५ रुपये अशे फुकट उधळवलेत ? ते पैशे जर तुम्ही खत आणायला वापरले असते तर पुढच्या वर्षी नफ्यात शंभर रुपयांची भर पडली असती."

" पण जीनराव, जेव्हा मी शेतात आहे, तेव्हा घुंगरांचा उपयोग आहे. बैल थांबला का न्हाय ते कळतं, मी समोर नसलो तरी."

" हँ, अन् समझा, बैलाने थांबून फक्त मानच हलवली तर."

" जीन राव, बघा, हा फक्त बैल आहे, शांतिसेनेचा स्वयंसेवक न्हाय."

माझ्या मित्राबद्दल अशी दंतकथा भोर तालुक्यातील शेतकरी सांगतात. तुम्ही जर परदेशी असाल न् भोर तालुक्यात गेलात तर, " जीनरावाची ओळख आहे का ? आमचा जीन तुम्हाला कंदी भेटतो का ?" असे प्रश्न तेथील लोक नक्की विचारतील. एखादा शेतकरी तुम्हाला घेवून त्याची मक्याची शेते तुम्हाला दाखवील, " जीनरावाने मका पेरायला सांगितले आम्हाला. त्याने सांगितले तसे आम्ही केले आणि गेल्या वर्षी आम्हाला दुप्पट पैसे मिळाले."

आता तेथील शेतकरी मका पिकवतात, खत वापरतात. जीन येण्याच्या आधी तसे करत नसत. त्याचे मोडके मराठी, त्याचा विचित्र पोषाख, त्याचे विनोद आणि सल्ले अजून त्यांच्या लक्षात राहिले आहेत. जीनला अमेरिकेला परत जावून एक

वर्ष झाले तरी सुद्धा जीन १९६४ च्या जूनमध्ये शेतकी विस्तार योजनेखाली भोर तालुक्यात काम करण्यास आला होता. या एकवीस महिन्यांच्या कारकिर्दीत जीनने इतके काम केले की ' टाइम्स ऑफ इंडिया 'ने त्याच्यावर एक सचित्र लेख लिहिला होता.

## भारतात १४०० शांतिसैनिक

अमेरिकन शांतिसेनेतर्फे सध्या भारतात चौदाशेहून जास्त स्वयंसेवक आले आहेत. हे लोक भारतात का आले ? अमेरिकेत त्यांना उत्तम शिक्षण मिळाले आहे. ते आता येथील निरक्षर लोकांमध्ये मिळून मिसळून राहतात. अमेरिकेत त्यांना शुद्ध, उत्तम जेवण मिळते तर येथे त्यांना मिसळ पाव खावे लागतात. अर्धे दूध, अर्धे पाणी प्यावे लागते. अमेरिकेत मोठ्या शहरात राहून टेलिव्हिजन, नाटक, सिनेमा पाहू शकतात. येथे मात्र लहान गावांत राहताना दर संध्याकाळचा कार्यक्रम फिरायला जाण्यापलिकडचा असू शकत नाही. अमेरिकेत त्यांचे आईवडिल, मित्र मैत्रिणी; पण येथे फक्त एखादा तिरसट जोडीदार आणि दोन का तीन विश्वासू मित्र. आणि मुख्य म्हणजे अमेरिकेत हे लोक दरमहा तीन-चार हजार रुपये सहज मिळवू शकतात पण येथे अमेरिकन सरकारने पाठवलेल्या तीनशे रुपयांच्या भत्त्याच्या खेरीज उत्पन्न नाही. इतके कष्ट नि गैरसोय सहन करण्याची उठाठेव त्यांना कुणी सांगितली ?

सात वर्षांपूर्वी राष्ट्राध्यक्षपदासाठी तरुण जॉन एफ. केनेडी उमेदवार म्हणून उभे होते. त्यावेळेस त्यांचे हे ध्येयवाक्य होते, "तुमचा देश तुमच्यासाठी काय करू शकतो यापेक्षा तुम्ही आपल्या देशासाठी काय करू शकता हे विचारा. ( Ask not what your country can do for you, but what you can do for your country ) त्यांनी देशासमोर आवाहन केले. अमेरिकेतल्या तरुणतरुणींना उद्देशून त्यांनी एक सेवात्मक शांतिसेना उभारण्याची इच्छा व्यक्त केली. तोपर्यंत पैसे आणि कुशल तंत्रज्ञ पाठवून अमेरिका अविकसित देशांना मदत करण्याचे प्रयत्न करतच होती. पण सर्वसाधारण नागरिकांना या कार्यात भाग घेण्याची संधी मिळत नव्हती. शांतिसेनेतर्फे अशा विकसित देशांमध्ये स्वयंसेवक पाठवून त्यांच्या विकास मोहिमांमधून भाग घ्यावा अशी केनेडींनी योजना मांडली.

राष्ट्राध्यक्ष झाल्यावर अमेरिकन काँग्रेसच्या सहकार्याने केनेडींनी शांतिसेना निर्माण केली. "तरुणांनो, या शांतिसेनेत सामील व्हा, जागतिक शांतीच्या सेवेस या." या त्यांच्या आवाहनास हजारो तरुणांनी साद दिली. वॉशिंग्टनमध्ये पत्रांचा आणि अर्जांचा पाऊस पडला. हजारो तरुणांनी या कामाला दोन-दोन वर्षे देण्याची तयारी दाखवली. परदेशातून या योजनेबाबत चौकशी होऊ लागली. मागण्या येवू लागल्या. या योजनेखाली ज्या देशांमध्ये प्रथम स्वयंसेवक पाठवण्यात आले त्यातला भारत एक.

## शांतिसेनेचे तीन अधिकृत हेतू आहेत...

(१) विकासाच्या मार्गावरील देशांत जाऊन त्या देशांत आपले काम करताना शांतिसेनेच्या स्वयंसेवकांनी त्या देशातल्या लोकांना कष्ट करण्याची स्फूर्ती द्यावी. सहकार्याची भावना निर्माण करावी.

(२) त्या देशांच्या भाषा आणि संस्कृतीचा अभ्यास करून आंतरराष्ट्रीय मैत्री वाढवावी.

(३) परदेशात असताना अमेरिकेबद्दल खरी माहिती पसरवावी.

शांतिसेनेचा स्वयंसेवक म्हणून निवडला जाण्यासाठी वय कमीत कमी अठरा वर्षांचे असायला पाहिजे. वयाची कमाल मर्यादा नसते. काही स्वयंसेवक सत्तर ते ऐंशी वर्षांचे आहेत. उमेदवार विवाहित असला तर बायकोने पण स्वयंसेविका व्हायला तयार असलेच पाहिजे.

शांतिसेनेत सामील होऊ इच्छिणाऱ्यांनी अर्ज भरावा आणि एका परीक्षेस बसावे. त्यानंतर गुप्तपोलिस उमेदवाराचे मित्रांना आणि शेजाऱ्यांना भेटून त्यांच्याबद्दलची संपूर्ण माहिती मिळवतात. अमेरिकन काँग्रेसला साम्यवादी स्वयंसेवक नको आहेत म्हणून ही तपासणी. या माहितीवरून उमेदवाराचे स्वाभाविक गुणदोष कळण्यास आणखी मदत होते. माझ्या मित्रांनी माझ्यासाठी खूप खटपट केली असावी असे मला वाटते.

अर्जाचे, परीक्षेचे आणि गुप्त तपासणीचे काम यशस्वीपणे झाल्यावर सरकार उमेदवारांना प्रशिक्षण (Training) घ्यायला बोलावते. आम्ही टेक्सासची राजधानी ऑस्टन येथील विद्यापीठात तीन महिने राहिलो. मराठी भाषा, भारतीय संस्कृती व इतिहास आणि परदेशांना इंग्रजी शिकवण्याच्या पद्धतीचा अभ्यास केला. दररोज पाचपाच तास मराठीचा अभ्यास चालू असायचा. स्वतःच्या शिक्षणासाठी अमेरिकेत आलेले महाराष्ट्रीय गृहस्थ आम्हाला शिकवीत होते. आमचे पहिले शब्द, नमस्कार, ठिक आहे, वाघ आणि साप! आम्ही नेहमी पाण्याचे 'पानी' आणि मिळण्याचे 'मिलने' करायचो. 'म्हणून' या शब्दाच्या बाबतीत तर काही विचारू नका. कुणाला जमेनाच.

## पूर्वतयारी अशी होते

आमचे प्रशिक्षण चालू असताना मानसिक दृष्टीने आमचे पद्धतशीर निरीक्षण चालू असते. कोणी स्वयंसेवक असण्याजोगे आहे, कोणी नाही, हे कळण्यासाठी आम्हाला विशिष्ट परीक्षांना बसावे लागते. मानसशास्त्रज्ञांच्या वाटेल त्या प्रश्नांना उत्तर द्यावी लागतात. त्यामुळे मानसशास्त्रज्ञांबद्दल आम्हाला धाक वाटे. चीड येई. बरोबरच्या मित्रांपैकी एकादा मानसशास्त्रज्ञांचा हेरही असायचा या शंकेने आम्ही बेचैन असू. ही निरीक्षणाची भानगड संपल्यावर आम्हाला खूप हायसे वाटले. पण

काही तीन-चार चांगल्या मित्रांचा निरोप घेताना वाईट वाटले. ते नापास झाले होते.

आम्ही आता स्वयंसेवकाची शपथ घेतली. आमच्या शिक्षकांनी आम्हाला निरोपाची मेजवानी दिली. त्यावेळेला पहिल्यांदा महाराष्ट्रीयन जेवनाची चव बघायला मिळाली. पोळ्या, भाजी, मसाला भात आणि जीलेब्या! मग तमाशा, गज्जल, शास्त्रोक्त गीत, आणि नाच. शास्त्रोक्त संगीत ऐकताना आम्हाला कसेतरी वाटले. ही माणसे त्यांच्या वाद्यांचे स्वर ठीक केव्हा लावणार, हा विचार करता करता कार्यक्रम संपला.

ज्याप्रमाणे भारतातल्या आधुनिक पिढीला परदेशाबद्दल आकर्षण व मोह वाटतो त्याचप्रमाणे आम्हाला भारताबद्दल अत्यंत उत्सुकता वाटत होती. भारतात काय असेल, भारतातले लोक कसे असतील, भारतात राहताना आपल्याला कसले अनुभव येतील ह्याच्या आतूर चिंतनातून आम्ही मुक्त नव्हतो. काहीजण भारताबद्दल सतत काही ना काही वाचत बसायचे. काहीजणांनी आपल्या खोलीच्या भिंती भारतीय कलेच्या रंगीन कलाकृतींनी झाकल्या होत्या. काहीजणांनी भारताचे राष्ट्रगीत पाठ केले. रस्त्यात चालताना ते जणू जप म्हणून परत परत म्हणायचे. मी माझ्या भिंतीला महाराष्ट्राचा एक नकाशा लावला होता. आणि सवडीच्या वेळात तो नकाशा टक लावून बघितल्यामुळे महाराष्ट्रातले सगळे तालुके पाठ झाले. एवढेच नव्हे तर कोणते कोणते तालुके निळ्या रंगाने, कोणते पिवळ्या रंगाने, कोणते गुलाबी रंगाने दाखवले गेलेले होते तीही माहिती मी देऊ शकत होतो.

आम्ही हवाई जहाजाने भारताला आलो. सव्वीस मे १९६५ ला पालम विमानतळावर उतरलो. पहाटे तीन वाजले असूनही भयंकर उकडत होते. आम्ही विमानातून उतरण्याच्या आधी तीन ऑफिसर्स आत शिरले. त्यांनी फायर एक्स्टिंग्विशरसारख्या दिसणाऱ्या गुलाबदाणीतून कसलासा अभिषेक केला. मैत्रीच्या या चिन्हाने आमच्या हृदयांना स्पर्श केला, मात्र त्या 'अत्तराचा' वास विचित्र होता. कुणाला ओळखता आला नाही. मग आमच्यापैकी कुण्या धीट मुलाने विचारले, "हा कोणत्या फुलाचा वास आहे ?"

"फूलांचा वास! आम्हाला कोण समजतोस लेका, भटजी ? आम्ही हिवतापविरोधी तुकडी आहोत आणि आम्ही तुझ्या डोक्यावर जे अत्तर मघाशी शिंपडले ते आपले साधे डि. डि. टि. !"

"परदेशात असताना कशाहीवर विश्वास ठेवू नये" ही म्हण खरी वाटू लागली. परदेशात येऊन तीन मिटानी आम्ही सपशेल फसलो होतो. पुढच्या एकवीस महिन्यांत किती साप दिसून दोऱ्या ठरतील असा गंमतीदार विचार करता करता आम्ही आमच्या आयुष्यातील पूर्व रंगाच्या प्रभातीचे दर्शन घेतले. त्या सौंदर्यात रमून आम्ही जकातनाक्याकडे सुटलो.

## पुण्यातला ‘अफाट’ प्रेमळपणा !

मी प्रथमच पुण्याला आलो त्यावेळेला उन्हाळा जोरात चालत होता. गवताचं एक पानसुद्धा दिसेना. झाडांची हिरवी पानं उन्हात वाळून रस्त्यात पडत होती. देहू रोड, तळेगाव, खडकी, शिवाजीनगर असे एकामागे एक विरळ वस्तीचे लष्करी गाव होवून गेले. पुणे हे एका दशलक्षाचे शहर, औद्योगिक, शैक्षणिक व संस्कृतीचं मोठं केंद्र आहे हे अजून खरं वाटेना. पुणे स्टेशनवर पोहोचल्यावर आमचे अधिकारी आम्हाला एका टॅक्सीत घालून घेवून गेले. शहरात आम्ही एका वाकडया, दोन्ही बाजूंनी जुन्या इमारती असलेल्या, गजबजलेल्या रस्त्याने गेलो. “ हा लक्ष्मी रोड ”–आमच्या अधिकाऱ्याने सांगितले. “ पुण्यातील मुख्य रस्ता. ” मग आमच्या मुक्कामावर पोहोचलो. वारा वाहात होता. जवळच्या क्रीडांगणावरील धूळ उडवित होता. आम्ही हॉस्टेलात शिरलो. आत कोणी नाही. अजून उन्हाळयाची सुट्टी होती. एका खोलीत एक म्हातारी दाण्यांनी खेळत होती. एका ढीगापासून दाणे एकामागोमाग एक काढायचे आणि दुसऱ्या ढिगात टाकायचे. तीचे डोके वयाने फिरले होते का काय ते आम्हाला कळेचना. (म्हातारी धान्य निवडीत होती, दुसरे काय पीटर ! ) एका भयानक घाणेरडया पोराने आमच्या अंगावर धावत येवून आमच्याकडन एक पैसा मागितला. आम्ही खोलीत गेलो. कीती धूळ, कीती कोळींच्या जाळया, पण एक खूर्चीसुद्धा नाही. एका चपराशाने खाट आणली दुसऱ्याने माठ आणला; अशा रीतीने आमचा संसार सुरू झाला. माझा जोडीदार काही बोलेना. मला धुळीने, केसांच्या तेलाने, खडूने मळलेल्या भिंती बघवेना. रूमाल काढून मी वेडेपणे पूसू लागलो. तीस सेकंडानी पुसता पुसता रूमालाचे फाटके फडके झाले, तरी त्या भिंतीवर काहीही परिणाम झाला नव्हता. मग मी माझ्या लोखंडी खाटावर बसून हसू लागलो. माथेफिरू हसतात, तसाच मी हसलो. पोट दुःखेस तो: त्या क्षणात घराची आठवण आली का नाही, सांगा तुम्ही !

तरी अवघ्या तीन दिवसांनी आम्ही आनंदाने नाचत होतो. आमच्या अधिकाऱ्यांनी आम्हाला तीन चांगल्या हवेशीर खोल्या दिल्या. कसल्यातरी सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी मोठ्या विद्यार्थ्यांची तुकडी आली. आम्हाला सोबत मिळाली. ते लोक आम्हाला दररोज कुठेतरी गावात फिरवायचे. आमचे अधिकारी पहाटे ५ वाजता पर्वतीवर घेवून गेले. तेथून सगळे शहर दाखवले. त्यांच्या मिसेसनी आमच्यासाठी स्टेनलेसच्या डब्यातून पुराणपोळी पाठवली. रस्त्यात ओळख बिळख नसूनही लोकांनी आम्हाला थांबवले, आमच्याशी गप्पा मारल्या, घरी बोलावले, चहा पाजला, जेवण दिले, गावात हिंडवले, कार्यक्रमांना नेले. पहिल्यांदा इतक्या प्रेमळ माणसांशी आपण कसे वागायचे हे आम्हाला कळेना. अमेरिकेत इतका अफाट प्रेमळपणा कधी दाखवला जात नाही. तेथे औपचारिक पद्धतीने करून दिलेल्या ओळखीशिवाय मैत्र्या फारशा सुरू होत नाहीत. फक्त तरुणांच्यात होत असल्या तर.

पण येथे चाळीस पन्नास वर्षांची माणसे आपली ओळख नसली तरी आम्हाला रस्त्यात हाक मारतात. स्वत:ची ओळख करून देतात. गप्पा मारीत मारीत स्वत:बद्दल अतिशय खाजगी माहिती देतात न् त्याचा बदला म्हणून आमच्याकडणं त्याच माहिती काढत सुटतात. अमेरिकेत वीस वीस वर्षं मैत्री असलेल्या मित्रांना पण एकमेकाचे पगार माहित नसतात. (अंदाज करत असतील पण मरेपर्यंत प्रत्यक्ष विचारणार नाहीत.) या उलट येथे नवीन ओळख झाल्यावर तिसरा-चौथा प्रश्न म्हणजे, " तुम्हाला पगार किती मिळतो ? " प्रथम राग येई. हे लोक केवळ कुतुहलाने ही चौकशी करतात हे समजायला फार वेळ लागला.

## कामासाठी शोधाशोध

मित्र जरी लगेच मिळाले तरी काम सहज सापडले नाही. ज्या संस्थेत आम्हाला नेमले होते त्या संस्थेला आमचा काही उपयोग नव्हता. त्यामुळे काम शोधायला बाहेर पडावे लागले. तीनएक आठवडे एका छानछोकी मिशनस्कूलमध्ये मी शिकवीत होतो. पण ती शाळा सरासरी अमेरिकन शाळेपेक्षा चांगली व श्रीमंत होती. मग एका शांतिसेनेच्या स्वयंसेवकाने अशा ठिकाणी आपली दोन वर्षे कशाला घालवावीत ? त्याशिवाय तेथील पाद्र्यांशी माझे भांडण झाले व मी ती शाळा सोडली. त्यानंतर कोणाच्या तरी ओळखीने महाराष्ट्रीय मंडळाच्या प्राथमिक शाळेत मला काम मिळाले. तसेच शेतकी कॉलेजातही. हल्ली या दोन ठिकाणी मी इंग्लिश शिकवित असतो. आणखी दोन सहकारी फर्ग्युसन कॉलेज व शाहू कॉलेज व शेतकी कॉलेजमध्ये शिकवीत असतात. एक अमेरिकन मुलगी एस. पी. कॉलेजात जर्मन शिकवते. आणखी एक मुलगा एका माध्यमिक शाळेत गणित शिकवतो.

आम्ही शिक्षणाच्या क्षेत्रात तसे इतर स्वयंसेवक अनेक क्षेत्रात कामं करतात. लघुउद्योग, कुक्कुट पालन, संतती नियोजन, साक्षरता प्रसार, शेती वगैरे ठिकाणी हे स्वयंसेवक प्रत्यक्ष काम व योग्य सल्ला देतात. आमची कार्यक्षमता व परिणामकारकता सुधारण्यासाठी अधणे मधणे शांतिसेना आम्हाला एकत्र करून घेते. दोन-तीन दिवसांसाठी एकदा असे संमेलन आग्रा येथे झाले. त्यानंतर श्रीनगरला. आम्ही तुकडी तुकडीने येतो. ग्रामसेवक, शिक्षण वगैरे अशा संमेलनांना एकत्र जमल्यावर एकमेकांना भेटून आपले अनुभव अडचणी, यश सांगायला मिळते. तसेच रम्य व ऐतिहासिक ठिकाणं पहायला मिळतात.

## पुढे काय ?

आता अमेरिकन शांतिसेनेच्या स्वयंसेवकांच्या भारतातील जीवनाबद्दलचे भारतीयांना वाटणारे कुतुहल समाधानकारकपणे पुरे झाले असले तरी एक मोठा प्रश्न उद्भवू शकतो. ' हे तरुण चांगल्या हेतूसाठी आले पण एकंदरीत भारतावर त्यांच्या कामाचा काय परिणाम होत आहे ? शांतिसेनेचे हेतु व प्रकल्प साकार होत आहेत की ते स्वप्नच ठरणार आहे ? श्री. बाबासाहेब आमटे यांनी असे म्हटले आहे कि

'दान हे नादान बनवते.' शांतिसेनेचे मनहि तसेच आहे. Charity destroys Character' अनुभव असे आले कि जेथे स्वयंसेवक खूप काम करतात तेथे नंतर त्याचा परिणाम टिकत नाही. तो चालू करतो ते काम तो गेल्या गेल्या बंद पडते. परंतु जेथे स्वयंसेवक राहून आसपासच्या लोकांकडूनच त्याच्या योजना व कार्य करून घेतो तेथे परिणाम कायम टिकतो. कामाची प्रगती होते. त्यामुळे आम्ही आमच्या कामात खुबीने वागायला पाहिजे.

प्रत्येक शाळेत, प्रत्येक कारखान्यात प्रत्येक खेडेगावात पुढे पाहणारे व मागे पाहणारे इसम असतात. पुढे पाहणारे नवीन कल्पना, नवीन पद्धती स्वीकारायला तयार असतात. मागे पाहणारे या गोष्टींना तयार नसतात. त्यांच्या वादात आम्हाला हळूहळू पुढे पहाणाऱ्यांची बाजू घ्यायची, त्यांना दाद द्यायची, त्यांना एकत्र आणून त्यांचे मतभेद मिटवणे हे काम करायचे असते. त्यांच्यापैकी ज्याच्याजवळ अनेक लोकांना एका हेतूने एकत्र काम करावयाला लावण्याचे कौशल्य असेल त्याला उत्तेजन द्यायचे, त्यांचा आत्मविश्वास वाढवायचा त्याला जास्त जबाबदारी संभाळायला लावायची. थोडक्यांत स्वयंसेवकाने एका ठिणगीसारखे काम करावे.

आमच्या कामाच्या अवघडपणाची तुम्हाला आता कल्पना आली असेल. सबंध अविकसित समाज त्याच्याच सहकार्यानं तळापासून बदलून टाकायचा. हल्ली जगात सहा हजार असे स्वयंसेवक आहेत. त्यांना हा अफाट प्रकल्प जमेल का ? अर्थातच नाही जमणार. शांतिसेना शंभरपट जास्त मोठी असली तरी ही महत्वाकांक्षा पूर्ण होणार नाही. परंतू काहीतरी करायचे. आणि जितके करायला लागेल त्यातला आमचे प्रयत्न हा एखादा अदृश्य भाग असला तरी सुरूवात करायची. आमच्या शांतिसेनेचे उद्देशच आहे कि आपल्याला जग बदलायला नको. पण ते आहे तसेच राहु द्यायचे नाही. (Not to change the world, but not to leave it the same either) आम्ही आमचा अल्पसा वाटा उचलला, आता बाकी तुम्हाला.



## पुस्तके

# मतदान... नव्या युगाचे !

बाबा आमटे यांच्या मूलगामी आणि सृजनशील चिंतनातून निर्माण झालेले हे भव्य शिल्प आहे. कर्तृत्वाच्या क्षितिजांचे आलोडन करणारे प्रभावी विचार या लहानशा पुस्तकात ग्रथित झालेले आहेत. एका मतदाराचा हा जाहीरनामा आहे. जागरूक, विचारी आणि ध्येयवादी मत-दाराचा. आपल्याला पक्षांचे जाहीरनामे ठाऊक असतात, त्यात पोकळ आश्वासनांची खैरात आणि अतिशयोक्त कर्तृत्वाची दर्पोक्ती असलेली आपण पाहिलेली असते. असे जाहीरनामे वाचून विसरून जाण्याची आपल्याला सवय असते. परंतु एका तत्त्व-शोधक मतदाराचा हा जाहीरनामा अशा तऱ्हेने वाचून विसरून जाण्यासाठी नाही. अंतर्मुख करून विचार करावयास लाव-ण्याचे सामर्थ्य त्यात आहे. सुप्त कर्तृत्व-शक्तीला जागृत करण्यासाठी हे तळमळीचे आवाहन आहे. लोकशाही भारतातील मतदाराची भूमिका, तिची व्याप्ती, स्वरूप आणि सामर्थ्य सुरुवातीला स्पष्ट करून श्री. बाबा आमटे यांनी सद्य:कालीन राज-कीय परिस्थिती व विविध राजकीय पक्षांची तौलनिक भूमिका उघड केली आहे. परंतु

एवढ्यावरच ते थांबत नाहीत; तर प्रत्येक पक्षाने अंमलात आणावा यासाठी विधायक प्रकल्पाचा कार्यक्रमही ते पुढे मांडतात.

भारताच्या पहिल्या पंतप्रधानांच्या व्यक्तित्वाचे मर्म श्री. आमटे सुरुवातीलाच भेदकपणे दाखवितात. स्वातंत्र्यपूर्व काळातील जिद्द, आवेश, तळमळ आणि स्वातंत्र्योत्तर काळातील त्यांची विफलता यांतील विरोध फार परिणामकारक शब्दांत त्यांनी दाखविला आहे. काळाबाजारवाल्यांचा नायनाट करण्याचे ध्येय बाळगणाऱ्या या पंतप्रधानांच्या कारकीर्दीत निर्लज्ज काळाबाजारवाले मंदमग्रूर हास्याचा खणखणाटच करीत राहिले होते—

**" दोस्ता,**
**आम्हाला फासावर लटकावले पाहिजे**
**हे कबूल**
**पण तो फासाचा दोर तू आणणार आहेस कुठून ?**
**तोही तुला काळ्या बाजारातच खरेदी करावा लागेल ! "**

अशी उर्मट अरेरावी करीत राहिले होते. इथल्या जनसामान्यांना ती निमूट ऐकून घ्यावी लागे. या जनसामान्यांनी फार पाहिले, फार सोसले. त्यांनी राष्ट्रपित्याचा खून पाहिला, निर्वासितांचे लोंढे पाहिले, वंश, भाषांचे लढे पाहिले, दुष्काळ आणि टोळधाडी सहन केल्या. लोकशाही त्याला अपरिचित नाही. इतक्या गणतंत्राच्या प्राचीन व्यवस्थेवरच परकीय लोकशाहीच्या प्रगत कल्पनांचे कलम करून त्याचा विकास झालेला आहे. त्यामुळेच

**" लोकशाहीचे हे महाशिल्प घडवणारा**
**शंभर कोट हातांचा**
**मी शिल्पकार आहे "**

असा प्रत्ययकारी आत्मविश्वास त्याच्या मनात दुमदुमत आहे.

या सुजाण आणि प्रवृत्तिक्षम मतदाराच्या दृष्टिकोनातून लोकशाही आणि तदंतर्गत राजकीय पक्षोपपक्ष यांचे उचित मूल्यमापन घडते. हुकूमशाही आणि लोकशाही यांच्यातील मूलभूत विरोध खऱ्या अर्थाने स्पष्ट होतो—

**" लोकशाहीतली मतपेटी ही जनतेची हृदयमंजूषा असते**
**तर हुकूमशाहीचा लढाऊ घोडा**
**स्वातंत्र्याची शवपेटिका वाहात असतो "**
**" हुकुमशाहीत प्रत्येकाला**
**अंधारात रोखलेले शस्त्र**
**एकाकी क्षणात भिववीत असते**
**आणि मग ज्याच्यावर प्रीतिपुष्पांचा दुतर्फा वर्षाव होतो**
**त्याचाच मुडदा कबरीतून उखडला जातो "......**

**" हुकूमशहाची दृष्टी खलबतखान्यात बंद असते**
**लोकनेत्याचे डोळे क्षितिज भेदून जाणारे असावे लागतात "**

यासारख्या प्रभावी प्रतिमांच्या सावेश वापरामुळे हा फरक अंतर्यामी जाणवणाऱ्या विचारी मतदाराची भूमिका स्पष्ट होते. या मतदाराला खरी लोकशाही घडवायची आहे. तिला सर्वार्थाने पूर्णत्व द्यावयाचे आहे. ती त्याची आकांक्षा आहे.

मायभूमीच्या सद्य:परिस्थितीची त्याला पुरेपूर जाणीव आहे. आपली मातृभूमी लोकशाहीची कामधेनू असली तरी तिची पूर्ण वाढ व्हावयाची आहे हे त्याला माहिती आहे. मात्र त्याबरोबरच.

**" पण ती नुसत्या उच्छिष्ट गवतांच्या काड्यावर जगणार नाही "**

असा सार्थ अभिमानही त्याला आहे. देशाच्या सीमांच्या पल्याड निकराच्या लढाईचे पडघम झडत असता सीमेच्या आत मात्र सर्वत्र सामसूम असावी, शिळे, शिणलेले वातावरण असावे, राष्ट्र थकलेले असावे हे त्याला मंजूर नाही. म्हणूनच जगातील सर्वांत मोठ्या लोकशाहीच्या सर्व आधारस्तंभांना त्याचे तळमळीचे आवाहन आहे.

**" लोकशाहीतला नागरिक जागरूक पाहिजे**
**कारण तोच मतांचे दाणे टाकून पक्षांचे पोषण करीत असतो "**

असा त्याचा आग्रह आहे. विचारपूर्वक आणि निश्चयाने योग्य पक्षालाच हे दाणे टाकले पाहिजेत असे त्याला वाटते.

सध्याचे विविध पक्ष त्यादृष्टीने सदोष आहेत. जुन्यापुराण्या मतांना चिकटून राहणारा जनसंघ फार मोठी गर्दी जमवीत असला तरी त्या कल्पना आजच्या युगात टिकणाऱ्या नाहीत. हिंदुसभा, रामराज्य परिषद आणि मुस्लीम लीग या फाळणीमुळे घडलेल्या प्रतिक्रिया. त्यांच्या अंगी परिस्थिती काबूत आणण्याचे सामर्थ्य नाही. कम्युनिस्ट पक्ष तर जगावर श्रमिकांचे राज्य प्रस्थापित करण्याच्या आवेशाने निघाला आणि प्रथम श्रमिकांवरच त्याने आपले राज्य स्थापन केले. राष्ट्रांच्या सीमा नष्ट करण्याच्या त्याच्या प्रतिज्ञेचे रुपांतर केवळ काही राष्ट्रांच्या सीमा विस्तारण्यापुरते घडले. गरीब राष्ट्रांना भाकरीचे तंत्र देण्याऐवजी सिद्धांतांची अफू पाजून नग्न स्वार्थाची सुंदोपसुंदी त्याने सुरू केली. प्रजासमाजवादी पक्षाने समाजवादाच्या उगवत्या सूर्याला सामोरे जाण्याचा पहिला मान मिळविला. पण अहंकार आणि यादवी यांमुळे त्यांची वाताहात झाली. " प्रजा एकीकडे, समाजवादी दुसरीकडे आणि पक्ष तिसरीकडे " अशी त्यांची स्थिती झाली. प्रतिभेचे महामेरू असूनही स्वत:च्याच उंचीची अंधारी त्यांच्या डोळ्यांना आली. कॉंग्रेस ही एकेकाळची दमदार, भव्य संघटना. पण ती आज थकली आहे. म्हातारी झाली आहे. हा ऐंशी वर्षांचा म्हातारा आता थकला आहे. ओठात समाजवाद पण मनात भांडवलदारांचे लांगूलचालन अशी तिची परिस्थिती आहे. नोकरशाहीचे जंजाळे सोडविण्याची

ताकद त्यात नाही. संत विनोबांच्या सर्वोदयाने एक महान् विचार पुढे मांडला. निष्ठेने आणि तळमळीने एका अहिंसक क्रांतीचा त्यांनी उद्घोष केला. पण सर्वोदयातही आता आचार आणि विचार यांची फारकत झाली आहे. त्यांच्याही हाती भिकेचे वाडगेच आहे. प्रज्ञा नाही.

असे हे विविध पक्षांच्या तात्त्विक व नैष्ठिक घसरगुंडीचे विदारक चित्र बाबांनी उभे केले आहे. तथापि यामुळे ते निराश झालेले नाहीत. यातूनच आशेची मंगल पहाट ते पाहतात—

> **" मतपेटीशी प्रियाराधन करणाऱ्यांनी**
> **मातीवर धुंद प्रेम कधी केलेच नाही "**

हे त्यांचे खरे शल्य आहे. दु:ख आहे. आणि म्हणूनच " माती जागवील त्याला मत " हे या मतदाराच्या निर्भीड जाहीरनाम्याचे सूत्र आहे. या धरित्रीच्या मातीच्या कणांना निर्मितीची हाक देऊन तो सोन्याचा करण्याची किमया त्यांना राजकीय पक्षांकडून घडावयास हवी आहे.

भूक, अज्ञान आणि दारिद्र्य हे या देशातील स्वास्थ्याचा, आरोग्याचा आणि पर्यायाने लोकशाहीचा ग्रास करण्यास टपलेले भयंकर शत्रू आहेत. तथापि पक्षापक्षांमधील हेवेदावे आणि राजकारणे लढवताना त्यांच्याकडे आपले दुर्लक्ष होते या वर्मावर श्री. आमटे यांनी अचूक बोट ठेवले आहे—

> **" सीमेवरील शत्रूंशी लढताना आपण एक होतो**
> **पण भूक आणि अज्ञान हेही आपले सामान्य शत्रू**
> **त्यांच्याशी लढताना हाजीपीरची जिद्द**
> **आपण दाखवत नाही.**
> **तेथे आम्ही तेजपूरसारखी आघाडी लढवतो ! "**

ही दुरवस्था आहे.

आणि याच दुरवस्थेला दूर करण्यासाठी पुस्तकाच्या अखेरीस बाबांनी विविध पक्षांसाठी एक फार मोठा विधायक कार्यक्रम मांडला आहे. एकमेकांच्या विरुद्ध सत्तास्पर्धा करण्याऐवजी आपल्या मतदारसंघातील बालेकिल्लाच निवडून तेथे विविध पक्षांनी विधायक कार्यक्रमाचे प्रकल्प उभारावेत, शेतीच्या नव्या योजना प्रत्यक्षात आणाव्यात, शिक्षणाचा प्रसार करावा, हायब्रीडचे उत्पादन करावे, सांस्कृतिक उन्नती घडवावी आणि या विधायक प्रगतीची मर्यादा गाठण्यासाठी परस्परांत स्पर्धा करावी अशी त्यांची योजना आहे. या योजनेचे तपशीलही त्यांच्या डोक्यात घोळत आहेत. ही योजना प्रत्यक्षात यायला हवी. (सध्या तरी ते स्वप्नच आहे.) तसे झाले तर वर उल्लेखिलेले तिन्ही भस्मासुर स्वत:च भस्मसात् होतील. विरुद्ध पक्षाची निंदा करण्याऐवजी काही भरीव आणि वास्तव कार्यक्रम प्रत्येक पक्षाला मतदारांच्या पुढे ठेवता येईल. राष्ट्राची प्रगती सर्वांगीण आणि एकसंध घडू शकेल; आणि

यासाठी परस्परांचे अडथळे परस्परांना होणार नाहीत. भाषणबाजी आणि पोकळ आश्वासने यांच्यापेक्षा सहस्रपटींनी चांगला कार्यक्रम आपोआप तयार होईल.

या केवळ हवेतील कल्पना नाहीत. त्यांना सत्याची पार्श्वभूमी आहे.

**" वटवाघळांच्या डोळ्यांचा अभ्यास करून**
**वैज्ञानिक रडारची भेदक नजर शोधून काढतो**
**तशी समाजसेवेच्या प्रयोगशाळेत**
**शोधून काढलेली ही दृष्टी आणि हा कार्यक्रम आहे. "**

आणि

**" स्वप्नरंजन नव्हे, एक सिद्ध सत्य,**
**आणि केवळ उत्तर नव्हे**
**तर ते मिळविण्याची एक रीतही**
**सर्व भारतीय कर्तृत्वापुढे**
**मी मांडीत आहे. "**

अशा विश्वासाने आणि निश्चयाने बाबा आमटे यांनी हा कार्यक्रम मांडलेला आहे.

एखाद्या व्यक्तिमत्त्वाचे नेमके दर्शन बाबा आमटे घडवितात. मग ते व्यक्तिमत्त्व व्यक्तीचे असो वा एखाद्या पक्षाचे. अशा अर्थपूर्ण ओळी आपल्यासमोर येतात की त्या व्यक्तीचें वा पक्षाचे गुणावगुण मेणाच्या प्रतिमेप्रमाणे कोरून उठतात. तितकेच ठाशीव आणि सुबकही. ही व्यक्तिमत्त्वे आकर्षक ' बनविली ' नाहीत; पण त्यांच्या-विषयीच्या मनातील अनिवार उत्कट भावनेमुळे आणि प्रामाणिक आत्मविश्वासा-मुळे शब्दांतून घडणाऱ्या त्यांच्या आकाराला आपोआपच डौल प्राप्त होतो. पंडितजीं-विषयी बोलताना श्री. आमटे म्हणतात—

**" पूर्व आणि पश्चिम संस्कृतीच्या दोन टोकांवर**
**त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे विश्वमोहक इंद्रधनुष्य**
**उभे असलेले मी पाहिले**
**पण त्या कमनीय कमानीखाली**
**एक विराट आणि विषण्ण पोकळी होती. "**

कित्येक ठिकाणी तर त्यांचे लेखन इतके परिणामकारक असल्याचे जाणवते की ही परिणामकारकता अंतरीची तळमळ, प्रभावी शब्दरचना आणि अमोघ वक्तृत्व या साऱ्यांचा परिपाक ठरते. तडफदार, अलंकारिक आणि शिवाय प्रासादिक अशा शब्दांचे तेथे दर्शन घडते—

**" युद्धसिद्धतेच्या स्पर्धेत**
**हा देश विजयी होऊ शकणार नाही**
**परंतु सिद्धांतांच्या युद्धात**
**एकटा पडलेला दिसत असला**

**तरी तो विजयीच होत चालला आहे. "**

अशासारख्या विरोधामुळे समतोल साधणाऱ्या ओळींमागून ओळी बाबा लिहून जातात आणि त्यांच्या भाषेला प्रवाहाचा वेग आणि डौल प्राप्त होतो. कित्येकदा या आवेशामुळे त्यांच्या लिखाणाला उपरोधाची धार चढते आणि काही वेगळेच तेज झळाळू लागते. आपसातील भांडणांमुळे आणि अहंकारामुळे खच्ची झालेल्या समाजवाद्यांविषयी बोलताना

**" दैन्यदारिद्र्याशी लढण्याची तालीम**
**त्यांना न्हाणीघरात व मुदपाकखान्यात चालवावी लागेल**
**विप्लवांचा नगारा त्यांना वाजवता येणार नाही. "**

असे मर्मभेदक उद्‌गार ते काढतात. जनसंघाला ते 'ट्रोजन' चा लाकडी घोडा असे नाव देतात. याच्या पोटात मध्ययुगीन सरंजामदारांची आणि संकृतीच्या तथा-कथित मिरासदारांची सेना दडलेली आहे असे ठणकावून सांगतात.

हेगेल, मार्क्स आणि माओ यांना ते " कारखान्यांकडे जाणाऱ्या विजेच्या तारांवर लोंबणारी थिजलेली वटवाघळे " असे विशेषण देतात. या वाघळांचे परवाचे तत्त्व-ज्ञान हे कालचे व्यवहारज्ञान आणि अखेर आजचे अज्ञान ठरले !

असे बाबा आमटे यांचे हे लिखाण. महानतेचा साक्षात्कार घडविणारे. निदान ती आकांक्षा उरी बाळगणारे. बाणवणारे. क्वचित एखाद्या ठिकाणी हा महत्त्वा-कांक्षेचा आवेश आत्मस्तुतीच्या प्रांतात शिरून अतिशयोक्तीच्या कुंपणावाहेर पाऊल टाकतोही. नाही असे नाही. उदाहरणार्थ, एके ठिकाणी बाबा म्हणतात—

**" एका स्त्रीच्या हातात सत्ता देऊन**
**लोकशाहीच्या इतिहासातले सर्वांत मोठे साहस या देशाने केलेले आहे ! "**

पहिली गोष्ट म्हणजे स्त्रीच्या हाती सत्ता असण्याचे हे काही पहिलेच उदाहरण नाही. दुसरे म्हणचे लोकशाहीत एखाद्या व्यक्तीच्या " हाती सत्ता जाणे " याला वरील वाक्यांतून जाणवणारा अर्थ आज उरलेला नाही. आणि शिवाय सत्ताधारी व्यक्ती स्त्री असणे ही आजच्या प्रगत युगात 'साहसा'ची गोष्ट उरलेली नाही. तथापि हे लिखाण बाजूचे, ओघात आलेले. मुख्य लिखाणाचा गंगौघ, प्रवाही, आणि प्रगतिशीलच आहे.

प्रत्येक सुजाण मतदाराने अवश्य परिशीलन करावे असे हे पुस्तक आहे. न जाणो, त्यातूनच एखाद्या प्रकल्पाची स्फूर्ती मिळेल!

**— निशिकांत मिरजकर**

●

[**'माती जागवील त्याला मत'** चिंतन : बाबा आमटे
शिल्प : रमेश गुप्ता : साधना प्रकाशन : किंमत एक रुपया : पृष्ठे ७६ ]

# भिंतीच्या वेंबड्या

सुधाकर राजे

## □ हेडक्लार्क की मारकी म्हैस ?

माणसाच्या दैनंदिन जीवनात त्याला पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे फुकटात देणारी एक सल्लागार संस्था दिल्लीत स्थापन होणार आहे. चला, अस्मादिकांचे प्रश्न-चिन्हांकित जीवन तरी जरा सुलभ होईल, अशी आशा करायला आता हरकत नाही. कारण सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत माझ्या काहीशा हलक्या डोक्याला न पेलणाऱ्या प्रश्नांचा माझ्यापुढे क्यूच लागलेला असतो. या प्रश्नांची एक यादीच मी प्रस्तुत संस्थेच्या सर्वज्ञांसाठी तयार केली आहे—

१. बायको चहात साखर घालायला अजिबात विसरली तरी तो गोड मानून प्यावा काय ?

२. सकाळचे वर्तमानपत्र हे बायकोने सिनेमाच्या जाहिराती पाहण्यासाठी असते की मुलाने क्रिकेटर मंडळींचे फोटो कातरण्यासाठी असते ?

३. ब्लेडचे अनेक उपयोग वाचले आहेत—जादूच्या प्रयोगात मिटक्या मारीत खाण्यापासून घरगुती ट्रॅन्झिस्टर रेडिओ तयार करण्यापर्यंत. पण जिने दाढीदेखील करता येईल अशी ब्लेड कोठे मिळेल ?

४. हपिसास नियमाने अर्धा तास उशिरा जाणे हा वक्तशीरपणाचाच एक भाग नाही का ?

५. हेडक्लार्क आणि मारकी म्हैस यांच्यांत अधिक गरीब कोण ?

६. जॉर्ज वॉशिंग्टन आमच्या हपिसात क्लार्क असता तर तो तरी साहेबाला "मी खोटे बोलू शकत नाही. काल रात्री रमी खेळत बसलो त्यामुळे स्टेटमेंट पुरे होऊ शकले नाही," असे उत्तर देऊ शकेल काय ?

७. हपिसातून घरी जाताना रोज गजरा नेलाच पाहिजे असा कायदा आहे काय ?

८. महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात साड्यांच्या सेलच्या जाहिराती ठळक अक्षरांत वर्तमानपत्रांत छापणे हा आक्षेपार्ह मजकूर छापण्याचा गुन्हा नाही का ?

९. "अगदीच कसे हो तुम्ही हे ?" या प्रश्नाचा अर्थ काय व उत्तर काय ?

१०. काहीही म्हणायच्या आधीच "अहो, मी काय म्हणते ?" या प्रश्नाचे उत्तर द्या.

११. "बाबा, तुम्ही टार्झन का नाही झालात ?" या सवालाचा जबाब द्या.

—जाऊ द्या. आणखी असेच कूट प्रश्न विचारले तर उद्घाटनाच्या आधीच ही सल्लागार संस्था संपुष्टात यायची.

## □ गणिताचे इंजेक्शन

तैलबुद्धीचा माणूस कुठले तेल वापरतो हे सांगणे एक वेळ कठीण असेल; पण कुशाग्र बुद्धीचा माणूस इंजेक्शनच्या सुईच्या अग्रामुळेच बुद्धिमान् झाला, असे आता म्हणायला हरकत नाही; कारण एका अमेरिकन शास्त्रज्ञाने असा शोध लावला आहे की, ज्ञानाचे इंजेक्शन देता येते. त्याने शिकवलेल्या उंदरांच्या मेंदूचे इंजेक्शन अशिक्षित उंदरांना दिले, तेव्हा इंजेक्शन दिलेले उंदीर इंजेक्शन न दिलेल्या उंदरांपेक्षा शिकवलेली गोष्ट लवकर शिकले. म्हणजे आतापर्यंत देवीची लस टोचता येत होती तशी आता ज्ञानाची लस टोचता येणार. एकदा एवढे ठरले की, ज्याप्रमाणे निरनिराळ्या रोगांवर निरनिराळी इंजेक्शने असतात, त्याप्रमाणे निरनिराळ्या अज्ञानांवर निरनिराळ्या ज्ञानांच्या लसी आल्याच. आता मी बाजारात निघालो की आमची ही म्हणणार, "जाता जाता कोपऱ्यावर मुन्शीपाल्टीच्या दवाखान्यात जरा बेरीज-वजाबाकीची लस टोचून घ्या. सद्दाचा मेला तो भाजीवाला हिशेबात फसवतो, पण इकडे काही पत्ता आहे का ?" हपिसात साहेब टायपिस्टला म्हणणार, "हे पत्र टाइप केलंय् ते इंग्रजीतच आहे की जर्मन भाषत ? आत्ताच्या आत्ता स्पेलिंगचे इंजेक्शन घेऊन या." तेव्हा देवा, आता मागणे एकच—सुईच्या अग्रावर राहील एवढी जमीन राहायला नाही मिळाली तरी चालेल, पण सुईच्या अग्रावर राहील एवढे ज्ञान दे.

## □ परलोकयात्रेचा सेंड-ऑफ

हिंदुस्थानात मजुरांपासून मास्तरांपर्यंत अन् कारकुनांपासून कारखानदारांपर्यंत सगळ्या प्रकारच्या मंडळींनी संप केलेला आहे. त्यात स्टेशनमास्तर, पत्रकार असले जरा आडवाटेचे प्रकारही आले, पण एवढे असूनही नामुष्कीची गोष्ट अशी की अमेरिकेत एका नव्या वर्गाने संप करून अखेर हिंदुस्थानावर मात केली आहे. न्यूयार्कच्या चाळीस कबरस्तानांत कबरी खणणाऱ्यांनी म्हणे संप केला. घ्या ! माझ्या मते मुडदे आणि मुडदेफरास यांचे नाते अगदी स्मशानशांतिपूर्ण असायला हवे. त्यांतून मुडदेफरासांच्या काही अटी असल्याच तर मुडदे त्या तोंडांतून चकार शब्द न काढता मान्य करतील यातही शंका नाही. तेव्हा या वैमनस्याला जितक्या लवकर मूठमाती मिळेल तितक्या लवकर मुड्यांना मूठमाती मिळू शकेल.

●

# तुमचे भविष्य
# आमचा अंदाज



**श्री. गो. जोशी**
सायनाचार्य, नासिक
मार्च १९६७

**मेष–** मागेच तुम्हांला बजावून ठेवलंय की, ५ महिने तुमच्या राशीसमोर मंगळ खडा उभा राहणार आहे. त्याचे आव्हान स्वीकारण्याचे धाडस करू नका.

व्यावसायिक क्षेत्रात संघर्ष पेटेल, सामाजिक क्षेत्रात तर कोणत्याही क्षणी मतभेदाची वावटळे उठतील. राजकीय क्षेत्र तर तुम्हा साडेसातीतील लोकांना कायमचे बंद झाल्यासारखे जाणवेल. काहीसे जपून, सौजन्याने, शहाणपणाने वागलात तरच हा काळ निभावून न्याल. उगीच धावपळ वडपड करण्याने पश्चात्तापाशिवाय काहीच पदरात पडणार नाही.

पहिला पंधरवडा काहीसा अनुकूल व प्रगतीचा जाणवेल. दुसऱ्या पंधरवड्यात प्रत्येक कामात मागे पाय. खर्चाला तर ताळतंत्रच राहणार नाही. विरोधकांच्या कारवायांना ऊत येईल. प्रकृतीही काहीशी नरमगरम बनेल.

दि. ५ ते १०, १५ ते १८, २५ ते २७. काहीसे अनुकूल दिवस एवढेच.

**वृषभ–**गुरु-शनी त्रिकोणावरच तुमची सारी मदार आहे; आणि तो तुमचे सारे कोडकौतुक पुरवील असा मला भरंवसा आहे. १५ मार्चच्या सूर्य-गुरू योगापासून तर तुमच्या आशा-आकांक्षा पूर्णांशाने सफल झाल्याचा प्रत्यय यायला लागेल. मार्चचा सारा

दुसरा पंधरवडा असंख्य अनुकूल घटना घडू लागल्यामुळे, चिरंतन स्मृतीचा ठरेल.

अनारोग्य मावळेल, धनोत्पादनाचे नवे मार्ग दृष्टिक्षेपात यायला लागतील, राजकीय क्षेत्रात मंत्रिपदाचाही काही भाग्यवानांना लाभ घडू शकेल.

व्यापारधंद्यांत, नोकरीचाकरीत प्रगतीचे अनेक टप्पे सहजासहजी ओलांडून जाल, सांसारिक जीवन आनंदाने बहरेल.

२४ मार्चचा रवि–शनी योग तुमच्या कर्तृत्वाची धार बरीच तीक्ष्ण करील.

दि. ७ ते १५, १७ ते २३ या कालात अनंत प्रगत घटना भराभर घडतील.

**मिथुन**– सूर्य भाग्यातून तर मंगळ पंचमातून या त्रिकोणात्मक ग्रहस्थितीमुळे तुम्हांला हवं ते करता येईल, हवं तेवढं मिळवता येईल आणि तुमचे सारे यश १५ मार्चच्या आसपास केंद्रीभूत झाल्यासारखे दिसेल. सूर्य-गुरुत्रिकोण प्रतिष्ठेची उंची वाढवील, राजकीय व वैद्यकीय क्षेत्रांत घवघवीत यश मिळवून येईल.

तुमच्या कर्तृत्वपूर्ण जीवनात नवा अध्याय लिहिला जाईल असंच या महिन्याचं महत्त्व आहे. सांसारिक जीवनात, व्यायसायिक क्षेत्रात प्रसन्नतेचे वातावरण सदैव दरवळू लागेल. नवे स्थावर आणि वाहन लाभेल किंवा त्या संबंधीच्या योजना आखू लागाल. या काली अनंतापासून स्फूर्ती घेऊन तुम्ही जी लोकोत्तर कामगिरी बजावाल. त्यातच तुमचे जीवनसाफल्य साठविलेले दिसेल.

दि. ९ ते १५, २० ते २४, २६ ते २८ या कालाची नोंद करा.

**कर्क**– चौथा मंगळ असेपर्यंत अन्य ग्रहांना काही विशेष कामगिरी करण्याची संधीच मिळणार नाही, हे जरी खरे असले तरी या महिन्यातील सूर्य-गुरुत्रिकोणासारखे महान ग्रहयोगही अगदीच वाया जातील असे नाही.

आपल्या स्थगित कार्यांना थोडीफार गती मिळू लागेल, रोखलेल्या प्रगतीच्या वाटा काही प्रमाणात मोकळ्या व्हायला लागतील. स्थावराबाबतीत निर्माण झालेला संघर्ष मिटेल, सांपत्तिक पेचप्रसंगही सुटायला लागतील.

यांत्रिक क्षेत्रात पदार्पण घडेल. थोरामोठ्यांच्या मदतीने सांपत्तिक प्रश्न सुटेल. पण या वेळी पैशापेक्षा प्रतिष्ठेचे फार मोठे माप तुमच्या पदरी पडेल.

तुमच्या राशीतील गुरू हा दैवीशक्तीचा उद्गाता आहे. या महिन्यात ईश्वरी साक्षात्कार होतील, दैवी कृपेचा प्रत्यय पदोपदी यायला लागेल.

दि. २ ते ६, १२ ते १७, २४ ते २७ या कालखंडात अनुकूल घटना घडून याव्यात.

**सिंह**– तुमच्या जीवनाचा सूत्रधार सूर्य. तो गुरूशी अंशपूर्ण त्रिकोण करणार असल्यामुळे, (१५ मार्च) शिवाय मंगळासारखा समर्थ ग्रहही पराक्रमस्थानी असल्यामुळे, या वेळी प्रगतीच्या अनेक संधी तुमच्यापुढे उभ्या राहतील. दूरचा प्रवास घडेल, कित्येकांना परदेशी जाण्याची संधी लाभेल, नव्या व्यवसायधंद्याच्या योजना आकार घेऊ लागतील, राजकीय वर्तुळातील फार मोठ्या व्यक्तीचे आपणांस सहकार्य लाभेल.

या वेळी तरी निदान आठव्या शनीची व बाराव्या गुरूची फारशी दखल

घ्यायची गरज भासणार नाही. सर्व काही योजनेबरहुकूम आणि अपेक्षेप्रमाणे घडून यायला लागेल. या काली आपण कुठेही गेलात तरी आपले सत्कार होऊ लागतील.

दि. ५ ते ९, १४ ते १९, २५ ते २७ या काली चांगल्या संस्मरणीय घटना घडू लागतील.

**कन्या—** आपणांस गुरूचे वरदान आधीच लाभलेले आहे. त्यातून सूर्य-गुरु-त्रिकोण योगाची भर.

मार्चच्या मध्याला तुमच्या प्रगतीला उधाण येईल अशा अनंत चांगल्या घटना भराभर घडून यायला लागतील. गुरूच्या गुरुत्वाचा साक्षात्कार या महिन्यात पदोपदी घडू लागेल. गुरू हा चिरंतन कल्याणाचा आणि महन्मांगल्याचा उद्गाता समजला जातो.

प्रगतीची नवी दालने उघडली जातील. प्रज्ञा आणि प्रतिष्ठा विकसेल, व्यक्तिमत्त्व आकर्षक बनेल.

या वेळी समाजातील अत्युच्च मानाचे स्थान आपणांस लाभावे, तुमच्या यशोदुंदुभी सर्वत्र निनादाव्या.

दंत-नेत्र विकाराचा थोडाफार त्रास होण्याचा संभव.

दि. ५ ते १०, १४ ते १८, २४ ते २८ या काली अनेक योजना सिद्धीस जातील.

**तूळ—** मंगळाची अनिष्टता आता ओसरू लागल्यासारखी जाणवेल. त्रस्त व संतप्त विचारांना आळा घालणारी ग्रहरचना अंतरिक्षात निर्माण झालेली असल्यामुळे कोणत्याही प्रसंगाला डरण्याचे कारण नाही.

साहित्याच्या क्षेत्रात, वैज्ञानिक विभागात, कलेच्या रंगभूमीवर तुमचा गौरव होऊ लागेल. १५ मार्च हाच तुमच्या उज्ज्वल यशाचा केंद्रबिंदू ठरेल. अनेक प्रगत घटना त्या कालाच्या आसपासच घडत आहेत, असा प्रत्यय येऊ लागेल.

तुम्हापैकी काही तूळराशी व्यक्ती राजकारणाच्या आखाड्यातही उतरतील आणि अपेक्षित यशही पदरी पाडून घेतील.

या महिन्यात उद्वेग, नैराश्य, अनारोग्य सर्व काही मावळेल. आसमंत प्रसन्नतेने बहरलेला दिसू लागेल.

दि. ५ ते १०, १५ ते १९, २४ ते २९ या काली अनेक समस्या सुटाव्यात.

**वृश्चिक—** तुमच्या प्रगतीची घोडदौड या बाराव्या मंगळाने काहीशी रोखलेली आहे. पण दुसऱ्या पंधरवड्यात सूर्य-गुरुत्रिकोण घडून येताच मार्गातील साऱ्या अडथळ्यांना न जुमानता वेगाने वाटचाल करू लागाल. भाग्यात गुरू आणि पंचमात सूर्य अशी ग्रहस्थिती पुन्हा १२ वर्षे तरी तुमच्या वाट्यास येणार नाही म्हणून म्हणतो की, करा काय ते आता करा.

थोरांची कृपा, सहकाऱ्यांचे साहाय्य, कोणत्याही क्षणी लाभेल. यशस्वी जीवनाचे

नवे तंत्रमंत्र आचरणात आणले जाईल आणि त्यामुळे जगापुढे तुमच्या जीवनाचा आदर्श ठेवला जाईल.

रासायनिक, वैद्यकीय क्षेत्रात नवा विक्रम निर्माण केला जाईल. पैसा अनंत हस्ते मिळू लागेल. खर्चाचे मानही त्याच श्रेणीने वाढायला लागेल.

दि. ७ ते १६, २२ ते २७ हे दिवस चिरंतन स्मृतीचे ठरावेत.

**धनू–** मार्चच्या पहिल्या पंधरवड्यातच फक्त अपेक्षित यश पदरी पडण्यासारखी ग्रहस्थिती आहे. जी धावपळ–धडपड करायची असेल ती याच वेळी करा. यशाचे माप पदरी पाडून घ्या. १५ मार्चचा सूर्य-गुरुत्रिकोण आणण्यास सहकार्य द्यायला उद्युक्त आहे.

२४ मार्चच्या रवि–शनी युतीपासून कालचक्र उलटे फिरू लागल्यासारखे दिसेल. प्रकृती, पैसा, मनःस्थिती यांवर आघात व्हायला लागतील. इष्टमित्रांचे सहकार्यही मिळेनासे होईल. त्याकाली काही धाडसी, साहसी कार्य करायला उद्युक्त व्हाल तर अपेक्षाभंगाशिवाय दुसरे काहीही पदरी पडण्याची शक्यता नाही. सांपत्तिक ताण वाढू लागेल. प्रकृतीही नरमगरम बनेल.

दि. ५ ते १७ एवढाच काल काहीसा अनुकूल जाणवेल.

**मकर–** परवाच्या निवडणुकीतील यशाने तुमचे व्यक्तिमत्त्व आकर्षक झालेच आहे. या महिन्यात आणखी काही महत्त्वाच्या घटना घडू लागतील. १५ मार्चच्या आसपासच्या कालाची नोंद ठेवा.

दशमात मंगळ आला आहे. त्याचे आणखी ४ महिने तरी त्या ठिकाणी वास्तव्य घडणार आहे. कर्तृत्वाला उत्थान देणे, राजकीय क्षेत्रात आवाज उठवणे, सामाजिक क्षेत्रात खूप मोठी प्रतिष्ठा मिळवून देणे हेच त्याचे कार्य. दुसरा पंधरवडा खूपच गाजून जाईल. अधिकार सत्ता हाती येईल. पण म्हणतात की, "अत्युच्ची पदि थोरही विघडतो." तसं काही होऊ नय यासाठी मात्र जपा. या काली दूरचा प्रवासही घडेल. नोकरीत बदली बढती होईल.

दि. २ ते ४, १२ ते १६, २४ ते २९ अनंत प्रगत घटना या काली घडाव्यात.

**कुंभ–** मंगळ भाग्यात आणि सूर्यही पहिला. तुमचा अनिष्ट काल संपल्यासारखाच आहे. आता घाईगर्दीने अनेक कामे भराभर उरकावी लागतील. बरीचशी स्थगित कार्ये हातावेगळी करावी लागतील. आरोग्याची विवंचना मिटेल. पैशाअडक्याचा प्रश्नही सुटेल.

साडेसातीमुळे तुमचे मन दुबळे बनले असेल. हा ९ वा मंगळ त्याला ठाकठीक करील.

शैक्षणिक साहित्यिक क्षेत्रात प्रगतीची लक्षणे दिसायला लागतील. आणि नोकरी–धंद्यांतील हुकलेली प्रगती पुन्हा लाभण्याची लक्षणे प्रकटतील. आगामी २-३ महिन्यांत प्रवास, हिंडणे–फिरणे खूपच घडेल.

नोकरीधंद्यांत बदलही घडून यावा आणि होणारा बदल विशेष प्रगतीचा ठरावा.

दि. ५ ते १५, २० ते २४ या कालावर लक्ष ठेवा. **[ पृष्ठ ६४ वर पहा ]**

## वेडा गोंधळ

# दैव जाणिले कुणी

मराठी चित्रपटांच्या कथांमधून सध्या ' वेडचांना ' भलतेच महत्त्व प्राप्त झालेले दिसते. ' युगे युगे 'मध्ये वेडयाचे सोंग घेतलेल्या शहाण्याची कथा पाहावयास मिळाली तर एक वेडा अपुरा वाटल्यामुळे की काय हेमंत चित्र या संस्थेने आपल्या ' देव जाणिले कुणी 'मध्ये एक वेडा आणि एक वेडाचे झटके येणारी वेडी यांना प्राधान्य देणारी कथा सांगितली आहे.

मानवी जीवनामध्ये शाश्वत काही नसते. उद्या काय होईल याची पुसटती कल्पनाही आज येऊ शकत नाही, त्यामुळेच उद्याचे दैव आज जाणून घेण्याची इच्छा उफाळून येते. स्वप्रयत्नाने दैव घडवण्याचे प्रयत्न मनुष्य सातत्याने करतो. परंतु वेगळेच फासे टाकून दैव माणसाचे अडाखे चुकवत असते. याच विषयाची हाताळणी बी. आर्. फिल्म्सच्या ' वक्त 'मध्ये पाहावयास मिळाली. आणि द. का. हसबनिसांनी ' दैव जाणिले कुणी 'ची कथाही याच विषयाभोवती गुंफली आहे. सर्वसाधारणपणे कोणत्याही चित्रपटाची कथा या मथळचाखाली आली तरी खपून जाण्यासारखी असते हा भाग निराळा.

नंदा (उमा) व वासंती (भारती मालवणकर) या दोन सावत्र बहिणी. घरची कमालीची गरिबी, आणि त्यात घरात सावत्र आई, यांमुळे घरात सावत्र कन्येचे—नंदाचे—भरपूर हाल होत असतात. वासंतीला पौर्णिमेला वेडाचे झटके येत असतात. त्याचा रागही नंदावर निघत असतो. आपल्या वेडीचे लग्न कसे होणार याची मातोश्रींना काळजी असते आणि याच वेळी घरचे गुरुजी (भिक्षुक) मुलगा सांगून आणतात. राधाबाई (अडनाव ज्ञात नाही) नावाच्या धनवान विधवा बाईंना 'बाळ' नावाचा वेडा मुलगा असतो. अचानक धक्का बसून वेड लागले असल्याने बाळचे लग्न केल्यास तो शहाणा होईल, अशी राधाबाईंना वेडी आशा असते. मुलगा वेडा असल्याने व पती नसल्याने घराच्या आर्थिक नाडचा विलास (श्रीकांत मोघे)च्या म्हणजेच बाईंच्या भाच्याच्या ताब्यात असतात.

बाळच्या लग्नाची सूत्रे स्वीकारलेले गुरुजी नेमके नंदाच्या घरी येऊन नंदाच्या सावत्र आईकडे नंदासाठी शब्द टाकतात. नंदाच्या मातोश्री दुहेरी डाव टाकतात. एका हाताने वेडा जावई पदरी घेतात व दुसऱ्या हाताने वेडी लेक—वासंती—राधा-बाईंच्या भाच्याच्या (विलास) गळचात बांधतात.

दोन वेगळचा घरामध्ये राहणारे वेडे एका घरामध्ये आल्यावर गोंधळाला सुरुवात होते. हा वेडचांचा गुंता सोडवण्याचे प्रयत्न मध्यंतरानंतर सुरू होतात. बाळ जसा



**राजा गोसावी, उमा, भारती मालवणकर**

★

अचानक धक्का बसून वेडा होतो, तसाच अचानक धक्का बसून तो शहाणा होतो. वासंतीला वेडेपणाचे भरपूर चाळे करू दिल्यानंतर हॉस्पिटलमध्ये पाठवण्यात येते. मग कथा पुढे कशी जाणार ? पण लेखक थोडाच कचरतोय; आत्येच्याही धाकामध्ये राहणारा विलास, कोण्या भुक्कड मित्राच्या संगतीने विलासी होतो. स्टोरी पुढे चालू राहते. लग्न झाल्यानंतर नंदाला विशेष ' स्कोप ' नसल्याने आता तिला संधी देण्यात येते. विलासला वठणीवर आणण्याची कामगिरी नंदाबाई पार पाडतात.

इकडे शहाणा झालेला बाळ बेबीकडे—आपल्या जुन्या प्रेयसीकडे—धाव घेतो. पण बेबींना ' बेबी ' झाल्याचे लक्षात आल्यावर त्यांच्याकडूनच उपदेशाचे डोस घेऊन गुमान आपल्या अर्धांगीचा स्वीकार करतो. पति-पत्नीच्या मीलनाने सर्वत्र आनंदीआनंद पसरतो इत्यादी. अशी ही हसवनिसांची कहाणी कृष्णा पाटील यांनी पटकथित, संकलित व दिग्दर्शित करून मराठी प्रेक्षकांच्या माथी मारली आहे. हसवनिसांच्या कथेमध्ये फारसे नावीन्य नाही. परंतु वेडयांभोवती गुंफलेल्या या कथेमध्ये दिग्दर्शकाला व संबंधित कलावंतांना भरपूर वाव आहे.

दिग्दर्शक कृष्णा पाटील यांनी काही ठिकाणी या संधीचा लाभ उठवला असला तरी पूर्णांशाने ते यशस्वी होत नाहीत. मांत्रिकाच्या साहाय्याने बाळची आई बाळला शहाणा करण्याचा प्रयत्न करते. तो प्रसंग कितीतरी पटीने चविष्ट करता आला

असता. कथानकाची हाताळणीही अत्यंत ठोकळेबाज पद्धतीने केली आहे.

मात्र कृष्णा पाटलांनी दोन मजेशीर ' शॉक्स् ' दिले आहेत त्यांचा उल्लेख केला पाहिजे. शहाणा झालेला बाळ, आपल्या पत्नीची मनधरणी ऐकून तिचा स्वीकार करणार असे वाटते आणि प्रेक्षकांचा अडाखा साफ चुकतो. अनपेक्षितपणे वासंती विलासच्या थोबाडीत मारते. आणि बिचाऱ्या विलासचा अंदाज चुकतो.

अभिनयाच्या दृष्टिकोनातून उमा (नंदा), भारती मालवणकर (वासंती) व भटजी (दामुअण्णा मालवणकर) यांचा विशेष प्रभाव पडतो. सौ. पद्मा घोटवडेकर (राधाबाई) व विलास (श्रीकान्त मोघे) यांनी काही ठिकाणी चमक दाखवली आहे. वसन्त शिंदे तेच काम आलटून-पालटून वेगवेगळ्या चित्रपटांमध्ये इमाने-इतबारे करीत असतात. तांत्रिक बाजूखेरीज चित्रपट तयार होत नसल्याने याही चित्रपटाला तांत्रिक अंगे आहेत इतकेच.

हिन्दी चित्रपटातील साचेबन्द संगीत, संगीत–दिग्दर्शक कुमारसेन गुप्ते यांनी मन:पूर्वक राबवले आहे. पार्श्वसंगीत व चाली, दोन्हीमध्ये भरपूर उचलेगिरी आहे. श्रवणीय म्हणून फक्त " पतिव्रतेच्या पुण्याईवर बनतो देव पतीचा " या एकाच गाण्याचा उल्लेख करावा लागेल. तत्त्वज्ञानाचा भाग सोडून रंजकता हा एकच या चित्रपटाचा हेतू मानला तर तोही सफल होत नाही. आपलेपणाच्या भावनेने मराठी माणूस विजय-भानुविलासच्या परिसरात घुटमळतो इतकेच.

**–शरद गोखले**

---

## तुमचे भविष्य आमचा अंदाज : पृष्ठ ६१ वरून

**मीन–** रवि-शनि-मंगळ हे सारेच ग्रह तुमच्यावर नाराज झाल्यासारखे दिसतात. कसेही करा, कुठेही जा, मनासारखे काही घडेल तर शपथ !


या काली– विशेषत: पहिल्या पंधरवड्यात–मन विषण्ण, उदास बनेल. प्रकृतीही नरमगरम असेल, वाढत्या खर्चाने मेटाकुटीस याल.

दुसऱ्या पंधरवड्यात मात्र वारे अनुकूल वाहू लागतील. त्या अनुकूल वाऱ्यांचे साहाय्य घेऊन नेटाने वल्हवू लागलात तर तुम्ही इच्छित स्थळी पोचू शकाल.

१५ मार्चचा रवि-गुरू तुम्हांला अनेकांचे सहकार्य मिळवून देईल. पण २-४ मार्चचा रवि-शनी योग अनेक विवंचना वाढवील असा हा बरावाईट काल आहे.

दि. ८ ते १५, १८ ते २२ एवढेच दिवस थोडेफार अनुकूलतेचे आहेत.

●


बाबा, तुम्ही म्हणालात
बँकेत आपले पैसे वाढतात. ते हो कसे, बाबा?
हे बघ, माझ्यासारखे पुष्कळ जण आपले पैसे बँकेत ठेवतात. मग बँकेजवळ खूप खूप पैसे जमतात. बँक त्या पैशांतून कारखान्यांना, दुकानांना, सरकारला कर्ज देते. कर्जाचे पैसे थोड्या दिवसांनी बँकेला परत मिळतात, शिवाय ते पैसे वापरायला दिल्याबद्दल बँकेला व्याजही मिळते. आता बँकेनं तरी काय, माझ्यासारख्यांच्या पैशातनंच कर्ज दिलेलं असतात ना? म्हणून आपल्याला मिळालेल्या व्याजाचा काही भाग बँक मला देते. असे पैसे वाढतात. मी बँकेत पैसे ठेवले नाहीत तर ते वाढायचे नाहीत. वाढतील का?
नाही. तुम्ही आपले पैसे पंजाब नॅशनल बँकेत ठेवता, होय ना?
बरोबर तीच माझी बँक. ही सर्वांत जुनी आणि मोठ्यांत मोठ्या बँकांपैकी एक आहे व तिच्या ४८० पेक्षा अधिक शाखा आहेत.
पंजाब नॅशनल बँक
PR PN 6623 Mar.5

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H–649

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

स्वस्तिक

चप्पल्स



स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**